• पुणे, मंगळवार, १९ मार्च २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 107 • वर्ष ३ रे, अंक १०७ • किंमत ₹ ६ • पाने : १२



भारत ब्लॉकचा जाहीरनामा हा 'शक्ती' पूर्ण करण्यासाठीच! P3

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com
BEYOND THE NEWS



'आरसीबी'ने रचला इतिहास P12

**» At a Glance**

## बिहारमध्ये भाजपला १७ जागा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बिहारमधील भाजपप्रणित रालोआ आघाडीचे जागावाटप निश्चित झाले असून भाजप १७ तर नितीश कुमार यांचा जनता दल १६ जागा लढवणार आहे. चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टीला ५ तर जीतनराम मांझी यांच्या हिंदुस्थानी आवाम मोर्चाला १, उपेंद्र कुशवाहा यांच्या पक्षाला १ जागा देण्यात आली आहे. बिहार भाजपचे प्रभारी विनोद तावडे यांनी याबाबतची घोषणा केली. बिहारमध्ये नितीश कुमार रालोआत सहभागी झाल्यामुळे रालोआची ताकद वाढली असून जागावाटपाचा तिढा प्रमुख नेत्यांनी सोडवला आहे. तावडे यांनी राज्यातील रालोआच्या नेत्यांबरोबर पत्रकार परिषद घेऊन याबाबतची माहिती दिली. तावडे म्हणाले की आजच्या बैठकीत ठरलेला जागााटपाचा फॉर्म्युला आमच्या सर्व पक्षांनी आणि त्यांच्या प्रमुख नेत्यांनी मान्य केला आहे. » पान ९ वर

## २२-१६-१० फॉर्म्युला : उबाठाच मोठा भाऊ

# मविआचं ठरतंय



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीकडून येणारे प्रस्थावांवर प्रस्ताव आणि अटी शर्थींमुळे हैराण झालेल्या महाविकास आघाडीने अखेर वंचित बहुजन आघाडीशिवाय जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित केला आहे. त्यामुळे वंचितकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यास लवकरच महाविकास आघाडीचे जागावाटप निश्चित होऊन जाहीर केलं जाण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणूक जाहीर झाल्याने महाविकास आघाडीकडून जागावाटपावर अंतिम निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

आता महाविकास आघाडीमध्ये ठाकरे गट हा मोठा भाऊ असणार आहे. ठाकरे गट राज्यांमध्ये 22 जागा लढवणार असून शरद पवार गट 10 जागांवर, तर काँग्रेस 16 जागांवर निवडणूक लढवणार आहे. त्यामुळे ठाकरे गटाकडून हातकणंगले जागा राजू शेट्टी यांना सोडली जाऊ शकते. महाविकास आघाडी राजू शेट्टी यांना बाहेरून पाठिंबा देईल, अशी चिन्हे आहेत. दुसरीकडे, सांगली जागेवरून काँग्रेस आणि ठाकरे गटात रस्सीखेच सुरुच आहे.

वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीने अजूनही चर्चेचे दरवाजे खुले ठेवले असले, तरी प्रकाश आंबेडकर यांची भूमिका पाहता महाविकास आघाडीत ते खरंच येत आहेत की न येण्यासाठी कारणांची मालिका उपस्थित करत आहेत? » पान ९ वर

**वंचितचा १७ जागांचा प्रस्ताव**

● वंचित बहुजन आघाडीकडून महाविकास आघाडीकडे तब्बल १७ जागांचा प्रस्ताव आल्याने तो अशक्यप्राय असल्याने तो अमान्य करण्यात आला आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीकडून चार जागांचा प्रस्ताव देण्यात आला आहे. महाविकास आघाडी वंचितला कोणताच नवीन प्रस्ताव देणार नसून त्यांनी निर्णय घेतल्यानंतर विचार केला जाईल, यावर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी एकमत केले आहे.

## भाजपच्या रुळावर मनसेचे इंजिन!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांपासून महायुतीमध्ये लोकसभा जागावाटपाची बोलणी सुरु आहेत. या जागावाटपाच्या चर्चेत आता अधिकृतरित्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची एन्ट्री होण्याची शक्यता आहे. कारण काल मंगळवारी संध्याकाळी मनसेप्रमुख राज ठाकरे आणि अमित ठाकरे हे दोघेही जण चार्टर्ड विमानाने दिल्लीच्या दिशेने रवाना झाले होते. दिल्लीत भाजपच्या कोअर कमिटीची बैठक आहे. त्यासाठी देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे रवाना झाल्यानंतर त्यांच्यापाठोपाठ राज ठाकरे दिल्लीकडे रवाना झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. दिल्लीत दाखल झाल्यावर राज ठाकरे हे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना भेटण्याची शक्यता आहे. यावेळी महायुतीच्या कोट्यातून मनसेला एक किंवा दोन जागा सोडल्या जाण्याची शक्यता आहे. » पान ९ वर

## आ. प्रणिती शिंदेंचा 'वंचित'वर हल्लाबोल...



**मुंबई :** मागच्या निवडणुकीत काँग्रेसला कमी मतदान झालं होतं. जो पक्ष काँग्रेसच्या मतांची विभागणी करण्याचा प्रयत्न करतो, तो भाजपला मदत करतो, डॅमेज करतो. त्यामुळे कोणीही निवडून येत नाही. ज्यामुळे जो विरोधात आहे तो निवडून येतो. म्हणून स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेऊ नका," असं आवाहन करत काँग्रेस आमदार प्रणिती शिंदे यांनी वंचित बहुजन आघाडीवर अप्रत्यक्षरित्या हल्लाबोल केलाय. आगामी लोकसभा निवडणूकीच्या दृष्टीने काँग्रेस आमदार प्रणिती शिंदेंनी सोलापूर लोकसभा मतदारसंघातील गावोगावी कॉर्नर बैठकांचा धडाका लावला आहे. सोलापूर जिल्ह्यातील येणकी गावात कॉर्नर बैठकीत बोलत असताना त्यांनी वंचित बहुजन आघाडीवर नाव न घेता टीका केली आहे.

### सर्वोच्च न्यायालयाने एसबीआयला सुनावले

# २१ मार्च पर्यंत सगळे तपशील द्यावेत!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** निवडणूक रोख्यांचा मुद्दा चर्चेत आहेच. अशात सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारनंतर आज पुन्हा एकदा एसबीआयला खडे बोल सुनावले आहेत. निवडणूक रोख्यांबाबत कुठलीही लपवाछपवी करु नका, २१ मार्च म्हणजेच येत्या तीन दिवसात सगळी माहिती सार्वजनिक करा असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने एसबीआयला दिले आहेत.

सोमवारी निवडणूक रोख्यांबाबत सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांच्या घटनापीठासमोर पुन्हा सुनावणी झाली. त्यावेळी एसीबीआयच्या चेअरमनना सगळी माहिती २१ मार्च पर्यंत सार्वजनिक करा असे निर्देश देण्यात आले आहेत. तसंच ही माहिती निवडणूक आयोगाने त्यांच्या वेबसाईटवर तातडीने प्रसिद्ध करावी असेही निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

निवडणूक रोख्यांचा सगळा तपशील सार्वजनिक करावा त्यात कुठलीही लपवाछपवी नको असं म्हणत सर्वोच्च न्यायालयाने एसबीआयला झापलं आहे. तसंच ठराविक किंवा निवडक अशी माहिती नको तर सगळे तपशील उघड करा असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. एसबीआय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचं पालन करण्यास बांधील आहे. » पान ९ वर

**रोख्यातून ३ हजार ५० कोटी मिळाले**

● निवडणूक रोख्यातून भाजपला सर्वाधिक धनलाभ झाल्याचे एसबीआयच्या ताज्या माहितीमधून समोर आले आहे. रोखे योजनेच्या सुरुवातीपासूनच भाजप सर्वाधिक रोख्यातून पैसे कमावलेला पक्ष आहे. ३,९४१.५७ कोटी रुपयांहून अधिकची रक्कम निवडणूक रोख्यातून भाजपला मार्च २०१८ ते २२ मे २०१९ या कालावधीत ३,९४१.५७ कोटी रुपयांहून अधिकची रक्कम निवडणूक रोख्यातून मिळाली.

## शिरूर तालुक्यात सशस्त्र दरोडा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्ह्यातील इंदापूर येथे एका हॉटेलमध्ये एकाची हत्या करण्यात आल्याची घटना ताजी असतांना रविवारी रात्री शिरूर तालुक्यातील अरणगाव येथील ठोंबरेवस्तीत काही दरोडेखोरांनी सशस्त्र दरोडा टाकत वृद्ध दाम्पत्याला मारहाण करून सोन्याचांदीचे दागिने आणि रोख रक्कम लुटली. दरोडेखोरांच्या मारहाणीत गंभीर जखमी झाल्याने वृद्ध महिलेचा मृत्यू झाला असून वृद्ध व्यक्ती गंभीर जखमी झाली आहे. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण आहे. फुलाबाई आनंदा ठोंबरे (वय ६५, ठोंबरेवस्ती, शिरूर) असे दरोडे खोरांच्या हल्ल्यात ठार झालेल्या वृद्ध महिलेचे नाव आहे. » पान ९ वर

# सहा राज्यातून गृह सचिवांना तातडीने हटवा!

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाने एक मोठा निर्णय घेतला आहे. भारतीय निवडणूक आयोगाने (ECI) BMC आयुक्त इक्बाल सिंह चहल यांच्यासह अनेक अतिरिक्त आयुक्त आणि उपायुक्तांच्या बदलीचे आदेश दिले आहे.

भारतीय निवडणूक आयोगाने अतिरिक्त आयुक्त आणि उपायुक्तांना हटवण्याचे आदेश दिले आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने सहा राज्यातून गृह सचिवांना तातडीने हटवण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या सहा राज्यांमधील गृह सचिवांना हटवण्याचे आदेश जारी केले आहेत. तसेच



मिझोराम आणि हिमाचल प्रदेशमधील सामान्य प्रशासकीय विभागाच्या सचिवांनाही हटवण्यात आले आहे. नवे निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधू यांच्यासह मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय निवडणूक आयोगाची बैठक पार पडली. यावेळी आयोगाने राज्य सरकारच्या निवडणुकीशी संबधित आणि कामाशी संबधित आधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे निर्देश दिले आहेत.

**» निर्देश**

## निवडणूक रोखे हा एक प्रयोग: होसबाळे

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** संघाने आतापर्यंत याबाबत कुठलाही विचार केलेला नाही. मात्र, निवडणूक रोखे हा प्रयोग नव्याने होत असल्याने त्यावर देखरेख राहायला हवी. तसेच देशात कुठलीही नवीन गोष्ट आली की, त्याच्यावर चार प्रश्न उपस्थित होतात. मात्र, प्रयोग करायला काही हरकत नाही असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांनी म्हटले आहे. यावरून आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. नागपूरच्या स्मृती मंदिर परिसरात सुरू असलेल्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेचा रविवारी समारोप झाला. त्यावेळी होसबाळे बोलत होते. गेल्या महिन्याभरापासून देशभरात निवडणूक रोख्यांचा विषय चर्चेत आला असून, » पान ९ वर

### मंत्री चंद्रकांत पाटलांचा खोचक सल्ला

# विरोधकांच्या उमेदवाराने विचार करून उभे राहावे!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे, बारामती, शिरूर लोकसभा क्लस्टरचे प्रमुख म्हणून मंत्री चंद्रकांत पाटील महायुतीतील सर्वपक्षीय प्रमुख नेत्यांसह बैठक घेणार आहेत. त्यानुसार रविवारी बारामती मतदारसंघाची बैठक पार पडली असून आज पुणे लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघांची बैठक पार पडत आहे. या बैठकीदरम्यान चंद्रकांत पाटील यांनी प्रसिद्धिमाध्यमांशी संवाद साधला. आता आमच्यासोबत राष्ट्रवादी आणि शिवसेना या दोन पक्षांची मते आहेत.



उद्धव ठाकरे यांच्या सेनेची एक लाख मते कमी झाली तरी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे दीड लाख मते वाढणार आहेत. त्यामुळे विरोधकांच्या उमेदवाराने विचार करून उभे राहावे, असा खोचक सल्ला चंद्रकांत पाटील यांनी दिला.

चंद्रकांत पाटील म्हणाले, 'पुणे लोकसभेबाबत विरोधक असं पर्सेपन्शन तयार करताहेत की, ही सीट भाजपसाठी अवघड आहे. पण आमचे पुण्यातील मताधिक्य मागीलवेळीपेक्षा वाढेल. » पान ९ वर

## 'माझ्या तमाम हिंदू बांधवांनो...

# हे शब्द कुठे गेले?- मुख्यमंत्री शिंदे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शिवाजी पार्कवरील शिवतीर्थावरील इंडियाआघाडीच्या सभेला संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी जाणीवपूर्वक 'माझ्या तमाम हिंदू बांधवांनो...' हा शब्द टाळला, असा दावा करत उद्धव ठाकरे यांच्या मनातील हिंदुत्त्व कुठे गेले?, असा सवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल (दि. १८ मार्च) पत्रकार परिषदेत केला. आम्ही टीका करण्यापेक्षा विकास कामांना महत्त्व दिले. महायुतीची सर्व कामे जनतेसमोर आहेत, त्यामुळे याचा परिणाम येणाऱ्या लोकसभा निवडणूकीत दिसेल, असा विश्वासही



मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. या वेळी उद्योगमंत्री उदय सामंत, शंभूराज देसाई उपस्थित होते.

माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, असे संबोधून बाळासाहेब ठाकरे शिवाजी पार्कवरील शिवसेनेची सभेला प्रारंभ करत असत. मात्र काल शिवाजी पार्कवर इंडिया आघाडीच्या सभेवेळी उद्धव ठाकरे यांनी जाणीवपूर्वक 'माझ्या तमाम हिंदू बांधवांनो...' हा शब्द टाळला. त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांचा वैचारिक वारसा सोडल्याचे स्पष्ट झाले आहे. आम्ही बाळासाहेब ठाकरे यांच्या वैचारिक बांधिलकीशी ठाम आहोत. आम्ही याबाबत कोणतीही तडजोड केलेली नाही, असेही शिंदे या वेळी म्हणाले.

जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दूल्ला हे जम्मू-काश्मीरमध्ये » पान ९ वर

**इंडिया' आघाडीची सभा म्हणजे 'फॅमिली गॅदरिंग'**

● शिवाजी पार्कवरील शिवतीर्थावरील इंडिया आघाडीच्या सभा झाली. ही सभा म्हणजे इंडिया आघाडीचे फॅमिली गॅदरिंग होते. हद्दपार लोकांनी घेतलेली सभा असल्याचे भासत होते", अशी बोचरी टीकाही मुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

## गांधींचे विधान चूकीचे आणि हास्यास्पद- चव्हाण

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेचे शेवट मुंबई मध्ये शिवाजी पार्क येथे झाले. त्यांच्या यात्रेच्या शेवटी शिवाजी पार्कावर काल इंडिया आघाडीची सभा देखील झाली. या सभेमध्ये राहुल यांनी महाराष्ट्रातल्या एका नेत्याने, ज्याने नुकतीच काँग्रेस सोडली, ते सोनिया गांधींसमोर अक्षरशः रडले असं वक्तव्य केले आहे. या टीकेत त्यांनी कुणाच्याही नावाचा उल्लेख केला नाही मात्र अशोक चव्हाण यांनी यावर उत्तर देताना जर हा उल्लेख माझ्या संदर्भात केला असेल तर राहुल गांधी यांचे हे वक्तव्य हास्यास्पद आणि तर्कशुद्ध नसल्याचं म्हटले आहे. » पान ९ वर

# दादांनी घेतलेली भूमिका महागात पडेल : रोहीत पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एकीकडे राज्यात लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले असतानाच, दुसरीकडे पवार कुटुंबातील वादात आणखी एक ठिणगी पडली आहे. कारण अजित पवारांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांनी देखील अजित पवारांच्या विरोधात भूमिका घेतली आहे. दरम्यान, यावरच आता रोहित पवारांची प्रतिक्रिया येत असून, श्रीनिवास काकांची भूमिका योग्य आहे. अजित पवारांनी घेतलेली भूमिका त्यांना महागात पडेल असे रोहित पवार म्हणाले आहेत. तर, स्वतःच्या भुमिकेमुळे 'दादां'चे कुटुंब एकटे पडले



असेही रोहित पवार म्हणाले.

श्रीनिवास पवार यांच्यावर बोलतांना रोहित पवार म्हणाले की, "श्रीनिवास काकांचा व्हीडिओ मी पाहिला आहे. लोकांना वाटते तीच भूमिका त्यांनी घेतली आहे. दादांना त्यांनी जवळून बघितलं आहे आणि साहेबांनाही बघितलंय. श्रीनिवास पवार यांची भूमिका पवार कुटुंबीय म्हणून सामान्य माणसांना पटणारी भूमिका आहे. पवार साहेब हि पवार कुटुंबीयांची ओळख आहे. श्रीनिवास पवार यांनी पवार कुटुंबीयांची संस्कृती बोलून दाखवली आहे. » पान ९ वर

## रशियात पुन्हा पुतिनराज!

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** व्लादिमीर पुतिन यांनी रशियाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ८८ टक्के मतांनी विजय मिळवला आहे. या विजयामुळे सलग पाचव्यांना पुतिन हे रशियाची सूत्रं हाती घेणार आहेत. रॉयटर्सने या विषयीचं वृत्त दिलं आहे. रविवारच्या निकालांनुसार व्लादिमीर पुतिन यांना ८७.९७ टक्के मतांनी विजय मिळवल्याचं रॉयटर्सने म्हटलं आहे. १९९९ पासून रशियात पुतिनराजच आहे. बोरिस येल्तसिन यांनी १९९९ मध्ये त्यांच्याकडे सत्तेची सूत्र सोपवली होती. तेव्हापासून पुतिन एकही निवडणूक हरलेले नाहीत. शुक्रवारी सुरु झालेलं मतदान तीन दिवस चाललं. » पान ९ वर


### सिम स्वॅप : १ जुलैपासून लागू होणार सिमकार्डबाबतचा नवीन नियम

# ...तर मोबाइल नंबर पोर्ट होणार नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** जर तुम्ही मोबाईल वापरत असाल आणि सिम कार्ड वापरत असाल, तर तुम्हाला काळजी घेणे आवश्यक आहे. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण म्हणजेच TRAI ने सिम कार्डसबाबत मोठा बदल केला आहे, जो १ जुलै २०२४ पासून लागू होणार आहे. हा नियम विशेषतः भारतात सिम कार्ड वापरणाऱ्यांसाठी आहे.

ट्रायने जारी केलेल्या नवीन नियमांचे पालन करणे सर्व



वापरकर्त्यांसाठी अनिवार्य असेल. फसवणुकीच्या वेगाने वाढणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. तुम्ही नुकतेच तुमचे सिम बदलले असेल किंवा तसे करण्याचा विचार करत असाल तर नवा नियम आता लागू होणार आहे. नवीन नियमानुसार, सिम स्वॅप केल्यानंतर, वापरकर्ते त्यांचा मोबाइल नंबर पोर्ट करू शकणार नाहीत, म्हणजेच ते त्यांचा नंबर इतर कोणत्याही टेलिकॉम कंपनीकडे स्विच करू शकणार नाहीत. हा नियम वापरकर्त्यांना सायबर फसवणुकीपासून वाचवण्यात मदत करेल याची खात्री करण्यासाठी असेल. सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये, स्कॅमर वापरकर्त्यांची फसवणूक करण्यासाठी वारंवार सिम स्वॅपिंगचा वापर करतात. सिम स्वॅपिंगनंतर, वापरकर्त्यांचे सर्व कॉल, संदेश आणि OTP इतर फोनवर मिळू लागतात, ज्यामुळे त्यांची फसवणूक होऊ शकते. वापरकर्त्यांनी या नियमाचे पालन करण्यासाठी सावधगिरी बाळगली पाहिजे आणि तुमचे सिम कार्ड सुरक्षित ठेवण्यासाठी अत्यंत जबाबदारीने पावले उचलली पाहिजेत.

सिम स्वॅप करणे म्हणजे डुप्लिकेट सिम काढणे. फसवणुकीच्या या पद्धतीत सायबर गुन्हेगारांना युजरचे डुप्लिकेट सिम मिळते. वापरकर्त्याच्या मोबाईल क्रमांकावर नवीन सिम नोंदणीकृत आहे. » पान ९ वर #रा

## मोक्याच्या ठिकाणी असलेली सरकारी जमीन बिल्डरांच्या घशात?

# आरे डेअरीची १६ एकर जमीन विकण्याचा डाव!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

■ राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पार्टीचे तीव्र आंदोलन







**पुणे :** महाराष्ट्राला लाभलेले द्रष्टे नेते स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांनी महाराष्ट्राच्या भविष्याचा विचार करून सरकारी आस्थापनांची निर्मिती केली. या सरकारी आस्थापनांची मोक्याच्या अर्थात वाकडेवाडी या ठिकाणी असलेली जमीन कवडीमोल भावात विकण्याचं पाप हे तिघाडी सरकार (शिंदे-पवार-फडणवीस) करत आहे. महाराष्ट्रातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ मिळावी, पुण्यासह महाराष्ट्रातील जनतेला सकस दुधाचा पुरवठा व्हावा यासाठी स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनी आरे डेअरीची स्थापना केली.

पुढे राजकीय नेत्यांनीच स्वतःचे दूध संघ काढल्याने हा आरे दूध संघ डबघाईला आला. पुणे शहराच्या अगदी प्रवेशद्वारावर वाकडेवाडी येथे मोक्याच्या ठिकाणी असलेली आरे डेअरीची तब्बल १६ एकर जमीन विकण्याचा डाव आता या तिघाडी सरकारने मांडला आहे. ही जागा फडणवीस, शिंदे, पवार यांच्या मालकीची नसून पुणेकरांच्या मालकीची आहे याचा विसर त्यांना पडला असा आरोप करत प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पार्टीच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने कोविडच्या काळात कोविड सेंटर उभारण्यासाठी सीओईपी संस्थेची जागा मागण्याची वेळ यापूर्वी पुणे महानगरपालिकेवर आली होती. हा भूतकाळ ताजा असतानाच भविष्यात अशी आपत्ती येणारच नाही असं गृहीत धरून एवढा मोठा भूखंड बिल्डरच्या घशात घालण्याचं कारण काय? १० हजार कोटी रुपयांची जमीन ४०० कोटीपेक्षा कमी किंमतीत विकण्यात कोणाचं हित आहे? असा सवाल प्रशांत जगताप यांनी केला.

या जागेवर मोठे सरकारी हॉस्पिटल अथवा शाळा उभारून सामान्य पुणेकरांना दिलासा देण्याऐवजी हे सरकार फक्त बिल्डरांचे घर भरण्यात व्यस्त आहे, हा सरकारने सामान्य पुणेकर जनतेवर घातलेला दरोडा आहे असा आरोपही त्यांनी केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पार्टीचे उदय महाले, गणेश नलावडे, राजू साने, रमीज सैयद, रोहन पायगुडे, प्रसाद गावडे, आशाताई साने, किशोर कांबळे, स्वप्निल जोशी, दिलशाद आतार, हेमंत बधे तथा शहरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे महापालिकेचा ३८.२१ गुणांसह प्रथम क्रमांक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे महापालिकांच्या आरोग्य कार्यक्रमांचे रँकिंग करण्यात येत आहे. यामध्ये आरोग्य कार्यक्रमांमधील महत्त्वाचे निर्देशांक तपासण्यात येत आहेत. यामध्ये पुणे महापालिकेने ३८.२१ गुणांसह राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.राज्यातील पहिल्या पाच क्रमांकांमध्ये पुण्यासह कोल्हापूर (३७.४३), सांगली (३६.०९), नागपूर (३३.५०), नवी मुंबई (३३.११) या शहरांनी कामगिरी केली आहे.

तर, वसई-विरार, धुळे, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि जळगाव या पाच महापालिका शेवटच्या पाच क्रमांकांवर आहेत. पुणे महापालिकेने माता आरोग्य, बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, क्षयरोग दुरीकरण या कार्यक्रमांमध्ये समाधानकारक कामगिरी केल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पत्रात म्हटले आहे.

» Selected

## अद्यापही 'आरटीई'अंतर्गत एकूण चार लाख जागा रिक्त!

**पुणे :** शिक्षणहक्क सुधारित कायद्यानुसार आरटीई अंतर्गत सरकारी शाळांतही प्रवेश घेता येणार आहे. मात्र, बहुतांश सरकारी शाळांमध्ये थेट प्रवेश मिळणे सोयीचे असताना 'आरटीई'अंतर्गत प्रवेश क्वचितच होईल. त्यामुळे 'आरटीई'च्या उद्दिष्टांनाच हरताळ फासला गेल्याची चर्चा पालकांमध्ये आहे. रविवारअखेर 'आरटीई'अंतर्गत एकूण चार लाख जागा रिक्त आहेत. राज्य सरकारने आरटीई कायद्यात सुधारणा केल्यामुळे खासगीसह अनुदानित आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांकडून आरटीई पोर्टलवर नोंदणी केली जात आहे. रविवारी सायंकाळी ७:०० पर्यंत २९ हजार शाळांनी नोंदणी केली होती. त्यानुसार ४ लाख रिक्त जागा आता आहेत. त्यामुळे पालकांना यंदा 'आरटीई'तून शासकीय शाळांतही प्रवेश घ्यावा लागेल अशी शक्यता आहे. 'आरटीई'अंतर्गत पूर्वी खासगी तसेच विनानुदानित शाळांमधील २५ टक्के रिक्त जागांवर आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील मुलांना प्रवेश दिला जात होता. त्यानुसार गतवर्षी 'आरटीई'अंतर्गत ८ हजार ८२३ खासगी शाळांमध्ये सुमारे १ लाख जागा रिक्त होत्या. आरटीई कायद्यात केलेल्या नवीन बदलानुसार खासगी, विनानुदानित शाळांच्या एक किमी परिघात शासकीय, तसेच अनुदानित शाळा असेल, तर त्या खासगी शाळेत 'आरटीई'अंतर्गत २५ टक्के जागांवर प्रवेश घेता येणार नाही.

## रणजीत कुलकर्णी यांची एसेसोमध्ये विभागप्रमुख पदी नियुक्ती



**पुणे :** जीवन विमा क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडवून आणणारी अग्रणी बाजारपेठ निर्मिती कंपनी एसेसोने रणजीत कुलकर्णी यांची संशोधन आणि धोरणात्मक संपादन विभागप्रमुख पदी नियुक्ती करण्याची घोषणा केली आहे. जीवन विमा उद्योगात ३५ वर्षांपेक्षा अधिक अनुभव बाळगणारे रणजीत कुलकर्णी आपल्या समृद्ध अनुभव आणि दृष्टीसह नव्या भूमिकेत असणार आहेत. आपल्या नव्या भूमिकेत रणजीत हे सी टू बी प्लॅटफॉर्मचा पुरेपूर वापर करण्यासाठी एसेसोच्या टीमचे नेतृत्व करतील. एलआयसी पॉलिसी धारकांसाठी त्यांची विशेष रचना करण्यात आली आहे. अलिप (असाइनमेंट ऑफ लाइफ इन्शुरन्स पॉलिसीज) असे त्यांना म्हणतात. ज्या पॉलिसीधारकांना आपल्या एलआयसी पॉलिसी सरेंडर करायच्या आहेत किंवा जिथे पॉलिसी बंद झाली आहे त्यांना हा प्लॅटफॉर्म पर्याय उपलब्ध करून दिला जात आहे, यावेळी सांगण्यात आले. त्यांच्या या निवडीमुळे त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

## योगीराज शंकर महाराज समाधी ट्रस्टच्या अध्यक्षपदी सतीश कोकाटे

**पुणे :** धनकवडी येथील श्री सदगुरू संतवर्य योगीराज शंकर महाराज समाधी ट्रस्टच्या नुकत्याच झालेल्या विश्वस्त सभेत सतीश कोकाटे यांची अध्यक्षपदी तर विश्वस्त सुरेंद्र वाईकर यांची सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली. सतीश कोकाटे हे बांधकाम आणि हॉटेल व्यावसायिक म्हणून सुप्रसिद्ध असून मागील सत्तावीस वर्षांपासून ते भक्त म्हणून मठात येत आहेत. मठातील प्रसाद व अन्नदान प्रक्रियेत त्यांनी आमुलाग्र सुधारणा घडवून आणल्या आहेत. याशिवाय श्री. कोकाटे हे दहा वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रमात हिरीरीने सक्रिय सहभागी आहेत. तर समाधी मठाच्या संकल्पित भक्तनिवास समितीच्या अध्यक्षपदी विश्वस्त डॉक्टर मिहीर कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. धर्मादाय सहआयुक्त, पुणे यांच्या आदेशाप्रमाणे तळजाई रस्त्यावर ट्रस्टतर्फे भक्त निवासाकरीता जागा खरेदी पूर्ण झाली असून पुणे मनपा परवानगी नंतर लवकरच तिथे बांधकाम सुरू होणार आहे.

## भवानी पेठेतील बापूसाहेब पवार प्राथमिक शाळेत 'महिला दिन'



**पुणे :** भवानी पेठेतील बापूसाहेब पवार प्राथमिक शाळेत शनिवार दिनांक ०९/०३/२०२४ रोजी "महिलादिन" साजरा करण्यात आला. मैदानात पालकांच्या बसण्याची व्यवस्था करण्यात आली व रांगोळी घालून सुशोभन करण्यात आले. महिलादिनाची माहिती सौ. जयश्री हंगे यांनी सांगितली. सर्व विद्यार्थी नवीन कपडे घालून आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या खडक पोलीस स्टेशनच्या दामिनी पथकाच्या सी खेता वालेकर मॅडम यांनी पालकांना विद्यार्थी सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. मा. मुख्याद्यापिका सौ. हेमलता कुन्हाडे यांनी पालकांना महिलादिनाच्या शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. सौ. कामिनी शेंगाळे यांनी स्वतःसाठी थोडतरी जग" ही कविता सादर केली. महिलादिनानिमित पालकांचा" उखाण्याचा खेळ" व "उलाहू उलाहू" हा खेळ घेण्यात आला. तसेच पालकांना पोहे व चहा हा अल्पोपहार देण्यात आला. मा. मुख्या. सौ. कु-हाडे हेमलता यांच्या मार्गदर्शनाखाली महिलादिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे नियोजन सौ. जयश्री हंगे आणि सौ. फिलोमिना कसबे यांनी केले.

राष्ट्रसंचार मुदत वाढ रा

## नर्सिंगच्या प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी 31 मार्चपर्यंत वाढवली



**पुणे :** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलतर्फे नर्सिंगच्या प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी करण्याची अंतिम तारीख पुन्हा एकदा ३१ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे. ज्यांना नर्सिंगला प्रवेश घ्यायचा आहे आणि ज्या उमेदवारांनी त्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी अद्याप अर्ज भरला नाही, त्यांना अर्ज करण्याची आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे. नर्सिंगच्या प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी करण्यास येत्या २९ फेब्रुवारीपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु, काही विद्यार्थी आणि पालकांकडून मुदतवाढीबाबत सीईटी सेलला पत्र प्राप्त झाले. त्यात विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन नोंदणीची तारीख वाढविण्यात यावी, अशी विनंती करण्यात आली होती. त्यानुसार राज्य सीईटी सेलने एमएच-नर्सिंग सीईटी-२०२४ च्या ऑनलाइन नोंदणीची तारीख ३१ मार्चपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

ही तिसरी आणि शेवटची मुदतवाढ असल्याचे सीईटी सेलकडून सांगण्यात आले आहे. यानंतर कोणत्याही प्रकारची मुदतवाढ होणार नाही, त्यामुळे इच्छुक उमेदवारांसाठी नोंदणी करण्याची ही शेवटची संधी असणार आहे. इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र (वनस्पतिशास्त्र आणि प्राणिशास्त्र) वगळता राज्यातील एखाद्या संस्थेतून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या परीक्षेस बसण्यास पात्र आहेत. नर्सिंग प्रवेश परीक्षेच्या नोंदणीसाठी ९ ते २९ फेब्रुवारी पहिला टप्पा आणि १ ते १५ मार्च दुसरा टप्पा पार पडला आहे. तर, आता १६ मार्च ते ३१ मार्च यादरम्यान तिसरा टप्पा पार पडत आहे. त्यामुळे अद्यापही अर्ज न भरलेल्या विद्यार्थ्यांना संधी निर्माण झाली आहे. प्रथम सीईटी सेलच्या अधिकृत वेबसाईटmahacet.org ला भेट द्या. मुख्यपृष्ठावर उपलब्ध असलेल्या नर्सिंग सीईटी २०२४ नोंदणी लिंकवर क्लिक करा. नवीन पृष्ठावर स्वतःची नोंदणी करा आणि लॉगिन करा.

## गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या स्मरणार्थ

# विभावरी आपटे-जोशी यांना 'दीदी पुरस्कार'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



• 'विश्वमोहिनी दीदी' सांगीतिक मैफल बुधवारी; हृदयनाथ मंगेशकर, राहुल देशपांडे यांचे सादरीकरण!

**पुणे :** गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त मंगेशकर कुटुंबियांच्या वतीने संगीत क्षेत्रातील सेवेबद्दल दिला जाणारा 'दीदी पुरस्कार' वितरण व भावगंधर्व पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या सादरीकरणातून होणाऱ्या 'विश्वमोहिनी लता दीदी' या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यंदाचा 'दीदी पुरस्कार' प्रसिद्ध गायिका विभावरी आपटे-जोशी यांना प्रदान केला जाणार आहे, अशी माहिती संयोजन समिती सदस्य व गायिका मनीषा निश्चल यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमाची व्यवस्था पाहणारे निश्चल लताड, सत्यजित धांडेकर यावेळी उपस्थित होते.

मनीषा निश्चल म्हणाल्या, "संगीत क्षेत्रामध्ये सातत्याने भरीव, उत्तुंग व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला मंगेशकर कुटुंबियांच्या वतीने लतादीदी मंगेशकर यांच्या नावाचा दीदी हा पुरस्कार दिला जातो. यंदा हा पुरस्कार विभावरी आपटे-जोशी यांना जाहीर झाला असून, येत्या बुधवारी (दि. २०) सायंकाळी ५ ते रात्री १२ या वेळेत कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात दोन सत्रांत होणाऱ्या सांगीतिक कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. भावगंधर्व पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या सादरीकरणातून होणाऱ्या 'विश्वमोहिनी लता दीदी' या सांगीतिक कार्यक्रमात प्रसिद्ध शास्त्रीय गायक राहुल देशपांडे हे विशेष अतिथी म्हणून सहभागी होतील."

"या कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे राहुल देशपांडे एका वेगळ्या स्वरूपात ऐकता येणार आहेत. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या रचना व मंगेशकर आणि देशपांडे कुटुंबियातील जुन्या आठवणी श्रोत्यांना ऐकण्याची संधी मिळणार आहे. तसेच लतादीदींनी काही गाणी व त्यातील बारकावे राहुल देशपांडे यांच्याकडून ऐकता येतील. लतादीदींनी गायलेल्या अजरामर मराठी व हिंदी गाण्यांचे सादरीकरण 'विश्वमोहिनी लता दीदी' या सांगीतिक मैफलीतून होणार असून, यामध्ये विभावरी आपटे-जोशी, प्राची देवल, श्रेयस बेडेकर, मनीषा निश्चल सादरीकरण करणार आहेत. रवींद्र खरे यांचे ओघवते निवेदन, विवेक परांजपे, राजेंद्र दूरकर, प्रसाद गोंदकर, अमृता ठाकूरदेसाई, ऋतुराज कोरे, विशाल थेलकर, विशाल गन्द्रतवार, निलेश देशपांडे यांची वाद्यांवर साथसंगत असणार आहे. हा कार्यक्रम पूर्णतः विनामूल्य आहे," असे मनीषा निश्चल यांनी सांगितले.

सत्यजित धांडेकर म्हणाले, "अखंड विश्वाला सुरेल आवाजाने मोहिनी घालणाऱ्या लतादीदींची प्रेरणा घेत मनीषा निश्चल गेली तीन दशके आपल्या सुमधुर गायनाने संगीतसेवा करीत आहेत. मंगेशकर कुटुंबियांशी त्यांचा स्नेह अतूट आहे. लतादीदींच्या स्मरणार्थ होत असलेल्या या कार्यक्रमाच्या संयोजनाची जबाबदारी मंगेशकर कुटुंबियांच्या वतीने मनीषा निश्चल पार पाडत आहेत. आपल्या महक संस्थेच्या माध्यमातून लतादीदींची गाणी गात राहण्याची इच्छा बाळगून त्या मेहनतीने व सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून कार्यरत आहेत."

# १७ लाख नऊ हजार बालकांचे लसीकरण पूर्ण!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** बालमृत्यू आणि बालकांमधील आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी बालकांचे योग्य वयात संपूर्ण लसीकरण करणे ही अत्यंत सोपी, कमी खर्चाची पण अत्यंत प्रभावी उपाययोजना आहे. राज्यात नियमित लसीकरणांतर्गत वर्षभरात १९ लाख चार हजार बालकांचे लसीकरण करण्याच्या उद्दिष्टांपैकी १७ लाख नऊ हजार बालकांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. म्हणजेच राज्यात सरासरी ९० टक्के लसीकरण पूर्ण झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. दि. १६ मार्च १९९५ ला शासनाने पोलिओ निर्मूलनासाठी पोलिओचा पहिला डोस दिला. तेव्हपासून लसीकरणाबाबत जागृती करण्यासाठी दरवर्षी १६ मार्च हा राष्ट्रीय लसीकरण दिन म्हणून पाळण्यात येतो.

बालकांमधील क्षयरोग, घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला, हिमोफिलस इन्फ्लूएन्झा टाइप बी, रोटा व्हायरस, डायरिया, जापनीज मेंदूदाह, पोलिओ, कावीळ, गोवर व रुबेला या आजारांमुळे होणारे मृत्यू कमी करणे हे नियमित लसीकरण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमांतर्गत बीसीजी लस क्षयरोगासाठी दिली जाते. तर, डीपीटी लस ही घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला, पोलिओ, गोवर-रुबेला, कावीळसाठी या सगळ्या आजारांवर लस उपलब्ध आहे.

**झालेल्या लसीचे उद्दिष्ट पूर्ण**

- पूर्ण लसीकरण केलेली मुले : १७ लाख ९ हजार, ९० टक्के पूर्ण
- एमआर : २ : १६ लाख ३१ हजार, ८७ टक्के पूर्ण
- डीपीटी पहिला बूस्टर डोस : १६ लाख ५७ हजार, ८८ टक्के पूर्ण
- ओपीव्ही बूस्टर : १६ लाख ५५ हजार, ८८ टक्के पूर्ण

"रोटा व्हायरस लस अतिसारावर, जापनीज एन्सेफेलायटिस लस ही जापनीज एन्सेफेलायटिस आजाराच्या प्रतिबंधासाठी, न्यूमोकोकल लस न्यूमोकोकल आजारांपासून प्रतिबंधात्मक साधन म्हणून दिल्या जातात. सर्व आरोग्य संस्थांमध्ये तसेच बाह्यसंपर्क कार्यक्षेत्रात लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात येते आणि लाभार्थींना लसी दिल्या जातात. लसीची क्षमता टिकून राहण्यासाठी लसीची वाहतूक शीतसाखळी अबाधित ठेवून करण्यात येते."
— डॉ. प्रवीण वेदपाठक, राज्य लसीकरण विभागप्रमुख

## कात्रज तलावात तरुणीची उडी मारून आत्महत्या!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कात्रज तलावात तरुणीने उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली. अग्निशमन दलाकडून शोधमोहीम राबविण्यात आली. तलावात बुडलेल्या तरुणीचा मृतदेह सापडला असून तिची ओळख अद्याप पटलेली नाही. तरुणीचे वय अंदाजे २३ वर्षे असल्याची माहिती भारती विद्यापीठ पोलिसांनी दिली. याप्रकरणी अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली. शनिवारी मध्यरात्री एका तरुणीने कात्रज येथील नानासाहेब पेशवे तलावात उडी मारल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. त्यानंतर जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. भारती विद्यापीठ पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. अंधार असल्याने शोधमोहीम थांबविण्यात आली. त्यानंतर रविवारी पुन्हा शोधमोहीम राबविण्यात आली. बोटीतून जवानांनी पाहणी केली. तरुणीचा मृतदेह पाण्यावर तरंगत असल्याचे आढळून आले.मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला. शवविच्छेदनासाठी मृतदेह ससून रुग्णालयात पाठविण्यात आला. आत्महत्या करणाऱ्या तरुणीची ओळख पटलेली नाही.

## घाणीचे साम्राज्य : महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष...

# बेशिस्त नागरिकांमुळे शहरात वाढतोय कचरा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** सिंहगड रस्त्यावर महापालिकेच्या यंत्रणेने स्वच्छता केल्यानंतर पुन्हा कचरा आणून टाकला जात असल्याने स्वच्छतेवर पाणी फेरले जात आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत योजनेंतर्गत महापालिकेकडून शहरात स्वच्छतेची कामे केली जात आहेत. नागरी परिसर पहाटे तर सार्वजनिक ठिकाणे व रस्ते रात्रीच्या वेळी स्वच्छ करून पहाटे सहा सात पूर्वी संपूर्ण कचरा उचलून सर्वत्र स्वच्छता केली जाते. याशिवाय सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, लघुशंका करणे, थुंकणे, कचऱ्याचे वर्गीकरण न करणे, कचरा जाळणे, प्लॅस्टीक पिशव्यांचा वापर, ओला कचरा जिरविण्यासाठी बल्क वेस्ट यंत्रणा कार्यान्वित न ठेवणे आदींवर दंडात्मक कारवाई केली जात आहे.

मात्र, महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने व क्षेत्रीय कार्यालयांच्या कर्मचाऱ्यांनी स्वच्छता केल्यानंतर अनेक बेशिस्त लोकांकडून रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जातो. त्यामुळे महापालिकेच्या उद्दीष्टांवर पाणी फेरले जात आहे. बेशिस्त नागरिकांमुळे शहरात कचरा दिवसेंदिवस वाढत आहे.

सिंहगड रस्त्यावरील धायरी फाटा येथील उड्डाणपुलाखाली रात्री अनेकजण कचरा आणून टाकतात. हा कचरा महापालिकेचे सेवक सकाळी सहा वाजता उचलून संपूर्ण परिसर स्वच्छ करतात. मात्र, परिसर स्वच्छ केल्यानंतर आणि महापालिकेची कचरा संकलित करणारी गाडी तेथून गेल्यानंतरही काही मिनिटांनी लोक पुन्हा कचऱ्याच्या पिशव्या आणून टाकतात. त्यामुळे दिवसभर पुलाखाली कचऱ्याचे साम्राज्य असते. याच रस्त्यावर वडगाव येथील कालव्याच्या पुलावर दुचाकी व चाकीमधून कचऱ्याच्या पिशव्या भिरकावल्या जातात.

#रा



# भारत ब्लॉकचा जाहीरनामा हा 'शक्ती' पूर्ण करण्यासाठीच!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जगतियाल :** भारतीय गटाचा जाहीरनामा 'शक्ती' संपवण्याविषयी बोलतो, असा आरोप करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी सांगितले की, 'शक्ती' नष्ट करू इच्छिणारे आणि त्यांची पूजा करणारे यांच्यात लढा आहे.

येथे एका सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले, त्यांच्यासाठी प्रत्येक आई आणि प्रत्येक मुलगी हे 'शक्ती'चे रूप आहे आणि ते त्यांची पूजा करतात.

ते म्हणाले की, देशाने 'चांद्रयान'चे यश 'शिवशक्ती'ला समर्पित केले आहे आणि विरोधी पक्ष 'शक्ती' नष्ट करण्याच्या बोलत आहेत."मुंबईत रविवारी निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर भारत आघाडीचा मेळावा झाला. मेळाव्यात त्यांनी आपला जाहीरनामा जाहीर केला. मुंबईच्या शिवाजी पार्कमध्ये त्यांनी आपला लढा 'शक्ती' विरुद्ध असल्याचे सांगितले. माझ्यासाठी, प्रत्येक आई, प्रत्येक मुलगी ही 'शक्ती'चे रूप असते. माता-भगिनींनो, मी तुमची 'शक्ती' म्हणून पूजा करतो. मी भारतमातेची 'पुजारी' आहे," तो म्हणाला.

"भारतीय युतीने आपल्या जाहीरनाम्यात शक्तीला संपवण्याची/ नष्ट करण्याची घोषणा केली. मी त्यांचे आव्हान स्वीकारतो. माता-भगिनींच्या सुरक्षेसाठी मी माझ्या प्राणांची आहुती देईन," ते पुढे म्हणाले.

तेलंगणात भाजपला लोकांचा पाठिंबा सतत वाढत असल्याचे सांगून मोदी म्हणाले की, मतदानाचा दिवस जवळ येत असताना तेलंगणात भाजपची लाट आहे, तर काँग्रेस आणि बीआरएस साफ होतील.संपूर्ण देश म्हणत आहे - 4 जून रोजी (मतमोजणीच्या दिवशी) 400 हून अधिक (एनडीएसाठी जागा), ते पुढे म्हणाले.काँग्रेसने तेलंगणाला आपले 'एटीएम राज्य' बनवले आहे, असा आरोप करून ते म्हणाले, "लुटलेला पैसा दिल्लीत जात आहे.भारत जोडो न्याय यात्रेच्या समारोपानंतर मुंबईतील शिवाजी पार्क येथे भारत आघाडीच्या सभेला संबोधित करताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी रविवारी म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी "ईव्हीएम, ईडी, सीबीआयशिवाय लोकसभा निवडणूक जिंकू शकणार नाहीत अशी टिका राहूल गांधी यांनी मुंबई येथील शिवाजी पार्क येथे केली होती.

# राज्यात ६ लाखांहून अधिक निरक्षरांनी दिली चाचणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

> केंद्र सरकारच्या आदेशानुसार नोंदणी केलेल्या निरक्षरांची 'पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी' रविवारी घेण्यात आली. या चाचणीत उत्तीर्ण होणारे साक्षर गटात मोडले जाणार आहेत. त्यांना राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्थेच्या (एनआयओएस) वतीने 'साक्षरता प्रमाणपत्र' दिले जाईल.
> - डॉ. महेश पालकर, संचालक, शिक्षण विभाग (योजना)

**पुणे**- केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नवभारत साक्षरता कार्यक्रम २०२२ ते २०२७ या कालावधीमध्ये राबविण्यात येत आहे. त्यात १५ वर्षे आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या निरक्षरांमध्ये पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, जीवनकौशल्ये विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यात लेखन, वाचन, संख्याज्ञानासह आर्थिक साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्यनिगा, बालसंगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण अशा घटकांचा समावेश आहे. नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत राज्यात सहा लाख २१ हजार निरक्षरांची नोंदणी करण्यात आली. केंद्र सरकारच्या आदेशानुसार नोंदणी केलेल्या निरक्षरांची पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी रविवारी घेण्यात आली. चाचणीत उत्तीर्ण होणाऱ्यांना 'साक्षरता प्रमाणपत्र' देण्यात येणार आहे.राज्यात सहा लाखांहून अधिक निरक्षरांनी चाचणी दिली.

नव भारत साक्षरता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, गटस्तरीय, शाळा स्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली होती. त्याअंतर्गत निरक्षरांची नोंदणी केलेली प्रत्येक शाळा हे मूल्यमापन चाचणीचे परीक्षा केंद्र होते. या केंद्रावर रविवारी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत ही चाचणी घेण्यात आली. वाचन, लेखन, संख्या ज्ञान या तीन भागांसाठी प्रत्येकी ५० अशा १५० गुणांची चाचणी झाली.

चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक भागात किमान ३३ गुण आवश्यक आहेत.

## माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल अडचणीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रायपूर** : सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) सादर केलेल्या तपासाच्या आधारे छत्तीसगडमधील आर्थिक गुन्हे शाखेने माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि इतरांविरुद्ध 'महादेव अॅप'शी संबंधित 'ऑनलाइन' सट्टेबाजी घोटाळाप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. अधिकाऱ्यांनी रविवारी ही माहिती दिली.

'महादेव अॅप'शी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाचा एक वर्षाहून अधिक काळ तपास करत असलेल्या 'ईडी'ने छत्तीसगडमधील विविध प्रतिष्ठित राजकारणी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचा या गैरव्यवहारात सहभाग असल्याचा आरोप अलिकडे केला होता. महादेव अॅप'चे दोन मुख्य प्रवर्तक छत्तीसगडचे आहेत. ईडीच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणातील आर्थिक गुन्ह्यातून अंदाजे सुमारे सहा हजार कोटींचे उत्पन्न लाटण्यात आले.

# सांगलीची जागा आम्ही सोडणार नाही: कदम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सांगली- महाविकास आघाडीच्या जागावाटपावरून अजूनही काथ्याकूट सुरू असतानाच सांगलीच्या जागेवरून महाविकास आघाडीमध्ये मिठाचा खडा पडणार का? अशी शंका निर्माण झाली आहे. सांगलीची जागा आम्ही अजिबात सोडणार नाही. त्यासाठी टोकाची भूमिका घ्यावी लागली तरी चालेल, अशी ठाम भूमिका काँग्रेस आमदार विश्वजित कदम यांनी घेतल्याने सांगलीच्या जागेवरून महाविकास आघाडीमध्ये तिढा निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीमध्ये सांगलीची जागा ठाकरेंना सोडण्याबाबत एकमत झाल्यानंतर सांगलीमध्ये अंतर्गत वाद उफाळून आला आहे. या ठिकाणी डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी काही दिवसांपूर्वीच मातोश्रीवर जाऊन जोरदार शक्तीप्रदर्शन करत ठाकरे गटात प्रवेश केला. यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी चंद्रहार पाटील यांना उमेदवारीचे संकेत दिले होते.

## इमारत कोसळून ४ जणांचा मृत्यू

**कोलकत्ता**- पश्चिम बंगालमधील कोलकातामध्ये रविवारी रात्री इमारत कोसळून मोठी दुर्घटना झाली. या दुर्घटनेत आता मृतांची संख्या वाढली आहे. मृतांचा आकडा ४ वर पोहोचला आहे. त्याशिवाय अजून तेथे बचावकार्य सुरू आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी घटनास्थळाला भेट दिली होती. अपघातानंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले होते. वैद्यकीय, अग्निशमन दल आणि इतर विभागांचे अधिकारी घटनास्थळी जखमींच्या सेवेसाठी दाखल झाले आहेत.

## » Selected

## महिला मतदार ठरवणार रायगडचा खासदार!

**अलिबाग** – देशात लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. मुंबईला लागून असलेल्या रायगड लोकसभा मतदारसंघासाठी निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात म्हणजेच ७ मे रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघात पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या अधिक आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज पत्रकार परिषद घेवून प्रशासनाच्या तयारीची माहिती दिली. रायगड जिल्ह्यात मावळ आणि रायगड अशा दोन लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण आणि कर्जत या तीन विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. तर रायगड लोकसभा मतदारसंघात रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, श्रीवर्धन, महाड तर रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली आणि गुहागर या विधानसभा मतदारसघांचा समावेश आहे. निवडवणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे.

## अरविंद केजरीवालांच्या अडचणीत वाढ!

**नवी दिल्ली**- दिल्ली मद्य घोटाळ्याप्रकरणी ईडीने दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल अरविंद केजरावाल यांना पुन्हा नोटीस पाठवली आहे. या प्रकरणात केजरीवाल यांना पाठवली गेलेली ९वी नोटीस आहे. या नोटीस बरोबरच केजरीवाल यांना दिल्ली जल बोर्ड प्रकरणातही नोटीस देण्यात आली आहे. त्यामुळे आता अरविंद केजरीवाल यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अंमलबजावणी संचालनालयाने २१ मार्च २०२४ रोजी चौकशीसाठी बोलावले आहे. शनिवार १६ मार्च ला सीएम अरविंद केजरीवाल यांना दिल्ली न्यायालयाने त्यांना मागील समन्सवर हजर न राहिल्याप्रकरणी अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. ईडी सतत केजरावाल यांना चौकशीसाठी हजर राहण्यासाठी समन्स पाठवण्यात आला आहे.

## तेलंगणाच्या राज्यपाल तमिलिसाई सुंदरराजन यांचा राजीनामा!

**नवी दिल्ली :** तेलंगणाचे राज्यपाल आणि पुद्दुचेरीचे लेफ्टनंट-गव्हर्नर तमिलिसाई सुंदरराजन यांनी सोमवारी सकाळी दोन्ही पदांचा राजीनामा दिला. सौंदर्यराजन या भारतीय जनता पक्षाच्या तामिळनाडू युनिटच्या नेत्या आहेत. तमिलिसाई सुंदरराजन भाजपचा उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. सुंदरराजन, यांनी नोव्हेंबर 2019 मध्ये तत्कालीन तेलंगणा राज्याचे दुसरे राज्यपाल म्हणून शपथ घेतली होती. तसेच फेब्रुवारी 2021 मध्ये पुद्दुचेरीच्या लेफ्टनंट-गव्हर्नर म्हणून त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला होता. त्या पुद्दुचेरीच्या एकमेव लोकसभा मतदारसंघातून लढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. किरण बेदी यांची हकालपट्टी केल्यानंतर तमिलीसाई सुंदरराजन यांच्याकडे पुद्दुचेरीच्या नायब राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला होता. सौंदराराजन यांचा पुद्दुचेरीतील लोकांशी चांगला संबंध आहे. सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघमच्या कनिमोझी यांच्या थुथुकुडी जागेसह तामिळनाडूमधील तीनपैकी एका जागेवरून त्यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे.

## दरेकरांनी राऊतांना झापले...

# राऊत...हा घ्या पुरावा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई** : फ्युचर गेमिंगवरुन भाजपने उबाठा गटाचे नेते संजय राऊतांना चांगलेच झापले आहे. संजय राऊतांनी फ्युचर गेमिंग कंपनीने भाजपला देणगी दिल्याचा आरोप केला होता. यावर आता भाजप आमदार प्रविण दरेकर यांनी इंडी आघाडीतील एका पक्षाची पोलखोल करत राऊतांवर निशाणा साधला.

संजय राऊतांनी आपल्या 'X' अकाऊंटवर पोस्ट करत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून महाराष्ट्रात सुरू असलेल्या ऑनलाईन लॉटरी जुगार खेळाची माहिती दिल्याचे सांगितले होते. तसेच या ऑनलाईन लॉटरी जुगार अड्ड्यावर अनेक तरुण मुले उध्वस्त होत असून या जुगारात अनेक कुटूंब नष्ट झाली. पोलिस आणि मंत्रालयात मोठे हप्ते मिळत असल्याने या जुगारास ४५० कोटी भाजपला देणगी दिली आहे," असा आरोप त्यांनी केला होता.

यावर आता प्रविण दरेकरांनी ट्विट करत प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, "फ्यूचर गेमिंगने सर्वाधिक ३७ टक्के म्हणजे ५०९ कोटी रुपये तुमच्या इंडी आघाडीतील घटक पक्ष असलेल्या द्रमुकला दिले आहेत. हे स्वतः द्रमुकने सुद्धा जाहीर केले. तुम्ही नाही कुणाचे तर किमान राजदीप सरदेसाई यांचे तर ट्विट एकदा वाचून घेतले असते. पण अर्थात दर महिन्याला १०० कोटी वसुलीचे टार्गेट देणाऱ्यांना ते कसे दिसेल?" असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

## नाशिकमध्ये सुरू होणार ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा

### उत्तर महाराष्ट्रातील पहिलेच केंद्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** उत्तर महाराष्ट्रातील पहिलेच ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर नाशिकमध्ये येत्या एप्रिलपासून सुरू केले जाणार आहे. उत्तर महाराष्ट्रातील हे पहिलेच अत्याधुनिक सोयीसुविधांयुक्त वन्यप्राण्यांचे उपचार केंद्र असून त्याचे बांधकाम पुर्ण झाले आहे. नाशिक वनविभाग आणि रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यामध्ये सामंजस्य करार करत हे केंद्र ( उभारण्यात येत आहे. नाशिकमधील जखमी वन्यप्राण्यांच्या उपचारासाठी केंद्र (Transit Treatment Centre) असावे अशी मागणी सातत्याने वन्यजीव प्रेमींकडून केली जात होती. नाशिकच्या म्हसरूळ येथील वनविभागाच्या जागेमध्ये हे उपचार केंद्र उभारण्यात आले असून यामध्ये पक्ष्यांसाठी एव्हियरीज, फ्लाईट एरिया, लहान मोठे पिंजरे, स्वतंत्र ऑपरेशन थिएटर, स्वतंत्र आयसीयू, तसेच बिबट्यांसाठी स्वतंत्र पिंजऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

या ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटरमध्ये ४५ प्राणी ठेवता येतील अशी व्यवस्था करण्यात आलीय. अनेकदा वन्यप्राणी अपघातात किंवा विहीरीत पडून जखमी झाल्याच्या घटना घडतात. या जखमी प्राण्यांवर उपचार करून त्यांना पुन्हा मुक्त अधिवासात सोडण्यात येते. या प्राण्यांवर त्वरित आणि योग्य उपचार करता यावे यासाठी हे उपचार केंद्र उभारण्यात येत आहे.



**नाशिक :** नाशिक वनविभाग आणि रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यामध्ये सामंजस्य करार करत हे केंद्र उभारण्यात येत आहे. यामध्ये जखमी वन्यप्राण्यांवर उपचार करण्यात येणार आहे.

## अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागणार...

# सावधान: आता प्राण्यांबरोबर सेल्फी नकोच!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय उद्यान किंवा जंगल सफारीला गेल्यानंतर अनेकांना तेथील वन्य प्राण्यांबरोबर सेल्फी किंवा फोटो काढण्याचा मोह आवरत नाही. पण ओडिशा राज्यात आता वन्य प्राण्यांबरोबर परवानगीशिवाय सेल्फी किंवा फोटो काढणाऱ्यांना दंड आणि सात वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सुशांत नंदा यांनी यासंदर्भात विभागीय वन अधिकारी आणि सिमिलिपाल दक्षिण, उत्तर विभाग आणि नंदनकानन प्राणी उद्यानाच्या उपसंचालकांना पत्र लिहिले आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक नंदा म्हणाले की, कायद्यांचे उल्लंघन करून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांना अटक करण्यात येईल. त्यानंतर अशा लोकांना न्यायालयाकडे पाठवून अधिक प्रसिद्धी मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

नंदा यांनी पत्रात लिहिले की, सोशल मीडियावर अनेक लोक वन्य प्राण्यांसह काढलेले सेल्फी किंवा फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत असल्याचे दिसून येत आहे. अशा फोटो घेण्याच्या प्रयत्नामुळे वन्य प्राण्यांचे जीवनचक्र विस्कळीत होते. तसेच वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ च्या तरतुदींचेही उल्लंघन होत आहे. यामुळे प्राण्यांसह फोटो घेणाऱ्या व्यक्तींना कायद्यानुसार सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

याशिवाय वन्य प्राण्यांच्या विविध प्रजाती, त्यांचे मृतदेह, शरीराचे अवयव यांबरोबर सेल्फी आणि फोटो काढणे हा देखील कायद्यान्वये दंडनीय अपराध आहे, असे नंदा यांनी पत्रात म्हटले.

ज्यांना वन्य प्राण्यांचे फोटो काढायचे आहेत त्यांना वन अधिकाऱ्यांच्या परवानगीने लागू असलेल्या कायद्यांचे आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले पाहिजे, असेही नंदा यांनी निदर्शनास आणले. पण वन्यजीवांना मदत करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना माहितीची देवाणघेवाण सुलभ करण्यासाठी क्षेत्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रमुख ठिकाणी आणि सोशल मीडियावर हेल्पलाइन क्रमांक प्रदर्शित करण्यास सांगितले आहे.

## बारावीला २९८, तर दहावीला ७२ कॉपी केसेस...

# बोर्डाच्या पेपरमध्ये कॉपींचा सुळसुळाट!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

> परीक्षेशीसंदर्भात सर्व घटकांशी वारंवार चर्चा करण्यात आली. भरारी पथकांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. त्याचबरोबर पेपर सुरू होण्यापूर्वी दहा मिनिटे देण्याऐवजी पेपरच्या शेवटी दहा मिनिटे जादा देण्याचा निर्णय आणि अफवा पसरविणाऱ्यांवर कारवाईचा इशारा आदी कारणांमुळे यंदा पेपरफुटी किंवा पेपर व्हायरल होणे आदी मोठे गैरप्रकार टाळण्यास राज्य मंडळाला यश आले. सध्या केवळ बारावीचे पेपर संपत आहेत. दहावीचे पेपर सुरूच आहेत. त्यामुळे अजूनही कोणताही गैरप्रकार न होता परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी राज्य मंडळ प्रयत्नशील आहे.
> — शरद गोसावी, अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ


**पुणे**- राज्यात बारावीच्या परीक्षेत २१ फेब्रुवारी ते १६ मार्च या कालावधीत केवळ २९८ कॉपी केसेस झाल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक कॉपी केसेस छत्रपती संभाजीनगर या विभागीय मंडळात १३९ झाल्या आहेत, तर सर्वाधिक कमी कोकण विभागात सात कॉपी केसेस झाल्या आहेत. दहावीच्या परीक्षेत १ मार्च ते १६ मार्चदरम्यान आत्तापर्यंत केवळ ७२ कॉपी केसेस झाल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक कॉपी केसेस छत्रपती संभाजीनगर या विभागीय मंडळात २६ झाल्या आहेत, तर सर्वाधिक कमी मुंबई विभागात आक कॉपी केस झाली आहे. कोल्हापूर आणि कोकण विभागात तर एकही कॉपी केसचे प्रकरण घडले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

मंगळवारी बारावीचा शेवटचा पेपर आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कॉपी केसेस वगळता अन्य गैरप्रकारांना चाप लावण्यात यशस्वी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्य मंडळाकडून नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावीची परीक्षा १ ते २६ मार्च आणि बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९मार्चदरम्यान घेण्यात येत आहे. दहावी-बारावीच्या परीक्षेत दरवर्षी कॉपी केसेस, बोगस विद्यार्थी सापडणे, सामूहिक कॉपी, पेपर फुटणे, पेपर व्हायरल होणे, असे प्रकार सर्रास घडताना दिसतात. यंदा मात्र राज्य मंडळाने गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना केल्या. यामध्ये राज्यमंडळाकडून कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले.दहावी-बारावीच्या परीक्षा म्हटले की, विविध विषयांचे पेपर व्हायरल होणे किंवा पेपर फुटणे, हे प्रकार ठरलेलेच असतात. परंतु, यंदा दहावी-बारावीच्या परीक्षेला या प्रकारांचा फटका बसला नाही.

त्याचबरोबर पेपर सुरू होण्यापूर्वी दहा मिनिटे जादा देण्याऐवजी पेपरच्या शेवटी १० मिनिटे देण्यात आली. यामुळे पेपर व्हायरल होण्याचे प्रकार बंद झाले. रनर म्हणून खात्रीशीर व्यक्तीचीच नियुक्ती केली. रनर अर्थात कस्टोडियनला कस्टडीतून पेपर घेताना जीपीएस ऑन करायचे होते. त्याचबरोबर स्वत:च्या मोबाईलच्या माध्यमातून व्हिडीओ शूटिंग करावे लागले. यातून त्या ठिकाणी होणाऱ्या गैरप्रकारांना आळा बसला. परीक्षा काळात फिरणाऱ्या भरारी पथकातील सदस्यांना नवीन आय कार्ड देण्यात आले होते. त्याचबरोबर पथकात वरिष्ठ शिक्षकांचा समावेश करण्यात आला. त्याचा देखील चांगला परिणाम झाल्याचे दिसून आले.

#रा

"'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट मी सावरकरांवर झालेला अन्याय लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी बनवला आहे. यामध्ये माझी कुणीही मदत केलेली नाही. मी माझे घर दार विकून हा चित्रपट केला आहे.
— रणदीप हुड्डा, अभिनेता



"असंगाशी संग केल्यावर आणखी काय होणार? हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे 'जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो...' अशी हाक देत भाषणाची सुरुवात करायचे. परंतु, उद्धव ठाकरे यांना त्याचा विसर पडलेला दिसतोय.
— सुधीर मुनगंटीवार, सांस्कृतिक मंत्री



पाकिस्तानात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत जनादेश चोरणाऱ्या अधिकाऱ्यांवर देशद्रोहाची कारवाई करण्यात यावी. आमच्या पक्षाला तीन कोटींहून अधिक मते मिळाली, तर उर्वरित १७ राजकीय पक्षांना संयुक्तरित्या तेवढी मते मिळाली.
**इम्रान खान, माजी पंतप्रधान, पाकिस्तान**

आम्हाला तुमची मतं आणि टिप्पण्या हव्या आहेत. कृपया आम्हाला येथे पाठवा
info@rashtrasanchar.com

OPINION PAGE MAILBOX

संपादकीय विशेष

# निझामी कारभार

**लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला असून आचारसंहिताही लागू झालेली आहे. काँग्रेसी युवराज मात्र त्यांच्या 'यात्रे'तच मग्न आहेत. त्याची सांगता शिवतीर्थावर झाली. ज्या मैदानावरून बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाची अंगार जनतेच्या मना-मनात चेतवला, तेथेच ही सभा भरली हे विशेष!**



काँग्रेसी युवराज राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो न्याय यात्रे'चा समारोप मुंबईत झाला. शिवाजी पार्कवर त्याच्या सांगतावेळी फारुख अब्दुल्ला, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन, साडे तीन जिल्ह्यांचे नेते शरद पवार आदी नेते मंचावर उपस्थित होते. ही यात्रा म्हणजे युवराजांचा हट्ट देशातील विरोधक किती लाडाकोडाने पुरवतात, याचे उत्तम उदाहरणच! निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे, आचारसंहिता लागलेली आहे, असे असताना, राहुल गांधी स्वमग्न आहेत, आपल्याच कार्यक्रमावर ठाम आहेत, स्वतःच्या इच्छेसाठी दिग्गज नेत्यांना ते आपल्यासमोर झुकवत आहेत, याचे हे ठसठशीत प्रतिक. बिहारचे नितीश कुमार म्हणूनच 'इंडिया' आघाडीतून बाहेर पडले. युवराजांच्या 'यात्रे'साठी तयारी करायला ते तयार नव्हते. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनीही तेच केले. मात्र, युवराजांचा 'बालहट्ट' कायम राहिला. म्हणूनच देशातील सर्वपक्षीय विरोधकांची ही आघाडी आजअखेरपर्यंत जागावाटपाचा तिढा सोडवू शकलेली नाही. शिवाजी पार्कवरच्या सभेची मोठमोठी छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात सर्वच माध्यमे आघाडीवर राहिली. तसेच मैदानावर 'गाळलेल्या जागा भरा,' असे चित्र ठळकपणे दिसत असताना, प्रेक्षकांची तुडुंब गर्दी असे मथळे बिनदिक्कतपणे दिले गेले आहेत. उद्धव ठाकरे, शरद पवार यांची राजकीय लाचारी समजून येण्यासारखीच. मात्र, माध्यमांनी ही लाचारी का पत्करली आहे? याचे उत्तर त्यांच्यावर जो 'चहा-बिस्किट'चा शिक्का बसला आहे, त्यात आहे. याच शिवतीर्थावर प्रखर हिंदुत्ववादी बाळासाहेब ठाकरे यांच्या लाखालाखांच्या सभा झालेल्या आहेत. याच शिवाजी पार्कवरून बोलताना, बाळासाहेब ठाकरे यांनी असे म्हटले होते की, "सत्तेसाठी मला काँग्रेसच्या वळचणीला जायची वेळ आली तर मी माझे दुकान बंद केलेले असेल." त्यांच्या सुपुत्राने उद्धवने सत्तेसाठी ना केवळ काँग्रेसची मनधरणी केली, तर सोनिया आणि राहुलसमोर लोटांगण घालत, जनादेशाचा अनादर करत महाराष्ट्राच्या बोकांडी महाविकास आघाडी सरकार बसवले. त्याचाच परिणाम म्हणून बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर अनुयायी एकनाथ शिंदे यांनी उद्धव यांचे नेतृत्व अमान्य करत, हे महाविकास आघाडी सरकार उलथवून टाकले. इतके होऊनही उद्धव यांची सत्तापिपासू वृत्ती गेलेली नाही. म्हणूनच बाळासाहेब ठाकरे यांनी जेथून हिंदुत्वाचा अंगार महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या मनात चेतवला, त्याच शिवतीर्थावर ते राहुल गांधी याच्या मांडीला मांडी लावून बसले. इतक्यावरच न थांबता, 'जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो...' अशी भाषणाची सुरुवात करणाऱ्या उद्धवनी तशी ती केली नाही. इतरवेळी बोलताना, प्रत्येकवेळी ते त्यांच्या 'मर्द' असल्याबद्दल ठासून बोलत असतात. रविवारी मात्र त्यांनी ही 'मर्दा'नगी का दाखवली नाही? हाच प्रश्न महाराष्ट्रातील शिवसैनिकांच्या मनात आहे. हिंदू बांधवानो, असे संबोधू नका, हे त्यांना कोणी सांगितले होते? राहुल गांधी हे स्वातंत्र्यवीर सावरकर विरोधी म्हणूनच ओळखले जातात. त्यांना त्यावरून खडसावून जाब विचारणे राहिले बाजूला. 'मर्दा'सारखे भाषणही त्यांना करता आले नाही, असेच खेदाने म्हणावे लागेल. 'आम्ही हिंदुत्व सोडलेले नाही,' असे ते येता-जाता ऐकवत असतात. मात्र, आता त्यांच्या हिंदुत्वाच्या शालीचा रंग हिरवा झाला आहे, हेच त्यांनी दाखवून दिले. आजपासून ते पुन्हा एकदा खंजीर, वाघ, मर्द, कोथळा म्हणायला मोकळे झाले. मंचावर साडे तीन जिल्ह्यांचे नेते शरद पवारही होते. ज्या आघाडीत आजही जागावाटपावरून मतभेद आहेत, नेता ठरलेला नाही, उमेदवार निश्चित नाही अशा आघाडीला विजयी करण्याची स्वप्ने ते पाहत असून, तशी राणा भीमदेवी थाटात घोषणाही मंचावरून करण्यात आली. त्याचवेळी त्यांच्या बालेकिल्ल्यात भाजपने दणदणीत सभा घेतली. बाजीराव पेशवे यांनी निझामाच्या सैन्याचा पालखेडच्या लढाईत दारूण पराभव केला होता. हा लढा पाश्चात्य देशांतही युद्धतंत्राचा भाग म्हणून शिकवला जातो. इतिहास हा केवळ पराक्रमाचे गोडवे गाण्याकरता नसतो, तर त्यातून शिकण्यासारखे खूप काही असते. पुण्यावर हल्ला केला म्हणजे बाजीराव शरण येईल, अशी अटकळ बांधलेल्या निझामाला त्यांनी कसा धडा शिकवला, याचे हे सर्वोत्कृष्ट उदाहरण. आघाडीचे नेते मुंबईत एकवटले असताना, बारामतीत भाजपने दिलेली मात या निमित्ताने याचे स्मरण झाले इतकेच.



**निवडणूक रोख्यांचा तपशील उघड होऊ लागला असून भाजपला सर्वाधिक निधी मिळाला हे स्पष्ट झाले आहे. मात्र, खासदारांची संख्या, भाजपप्रणित राज्यांची संख्या यांच्या तुलनेत अन्य पक्षांना मोठा वाटा गेला असल्याचे दिसून येते. राष्ट्रवादीला कुठेही सत्ता नसताना ६४ कोटी रुपये मिळाले आहेत.**

## निवडणूक रोख्यांचा तपशील उघड होऊ लागला...

# पक्षनिहाय लाभार्थी जाहीर होताना!

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी असे म्हटले आहे की, स्टेट बँक ऑफ इंडियाला निवडणूक रोख्यांच्या योजनेसंदर्भातील कोणतीही माहिती उघड करण्यापासून रोखण्यात आलेले नाही. म्हणूनच स्टेट बँकेने रोख्यांसंदर्भातील सर्व माहिती उघड करावी, असे निर्देश दिले आहेत. गेल्या महिन्यात दिलेल्या ऐतिहासिक निकालात, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारची निवडणूक रोखे योजना रद्द केल्यानंतर, तो चर्चेचा विषय झाला आहे. तसेच १२ एप्रिल २०१९ पासून खरेदी करण्यात आलेल्या सर्व रोख्यांचा तपशील सादर करावा, असे आदेश दिले होते. त्यानुसार, तपशील निवडणूक आयोगाला देण्यात आला आहे.

भाजप हा सत्ताधारी पक्ष असल्याने, तो प्रमुख लाभार्थी असणार हे जगजाहीर होते. मात्र, प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीतून देशातील सर्वच पक्षांना मोठ्या प्रमाणावर या रोख्यांच्या माध्यमातून निधी मिळाल्याचे स्पष्ट झाले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर भाजपच्या विरोधकांना जणू उन्माद चढला होता. त्यातूनच वाट्टेल ते आरोप केले गेले. करण्यात येत आहेत. मात्र, रोख्यांचा तपशील जाहीर होत असून, त्यातून सत्ताधारी भाजपपेक्षा विरोधकांनाच निधी मिळत असल्याचे स्पष्ट होत आहे.



भाजप या सर्वाधिक निधी प्राप्तकर्ता म्हणून उदयास आला आहे. भाजपला ६,९८६.५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. त्याचवेळी अन्य प्रादेशिक पक्षांना मिळालेला निधी हा अचंबित करणारा ठरला आहे. द्रविड मुनेत्र कळघम (डीएमके); अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम (एआयडीएमके); जनता दल (सेक्युलर); राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एनसीपी); जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स (जेकेएनसी); जनता दल युनायटेड (जेडीयू); आम आदमी पार्टी (आप); समाजवादी पक्ष; सिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रंट आणि महाराष्ट्र गोमंतक पक्ष या गोव्यातील पक्षाला रोख्यांच्या माध्यमातून निधी मिळाला असल्याचे स्पष्ट झाले आहे. फ्युचर गेमिंग अँड हॉटेल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, सँटियागो मार्टिन यांनी सर्वाधिक निधी दिला हा तपशील उघड झाला आहे. २०१९ ते २०२४ या कालावधीत डीएमके या तामिळमधील पक्षाला - १,३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी प्राप्त झाला आहे. त्याचप्रमाणे, मेघा इंजिनीअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने, जवळजवळ रु. १,००० कोटींचे रोखे खरेदी केले होते. त्यांनी, कर्नाटकातील जेडीएसला ५० कोटी रुपये दिले. नारायण मूर्ती यांच्या नेतृत्वाखालील इन्फोसिसने २०१८ च्या कर्नाटक निवडणुकीच्या दोन महिने आधी जेडीएसला निधी दिला आहे.

सुनील मित्तल यांच्या भारती एअरटेल, तसेच सिरम इन्स्टिट्यूटचे सायरस पूनावाला यांनी २०१८-१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला देणगी दिल्याचे दिसून येते. भारतीय कम्युनिस्ट पार्टी , कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) आणि कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) लिबरेशन या किमान तीन पक्षांनी आयोगाला माहिती दिली की त्यांनी निवडणूक रोख्यांद्वारे कोणतीही देणगी न स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याचवेळी आणखी एक रोचक तथ्य समोर आले आहे. पक्षनिहाय रोख्यांची आकडेवारी पाहिली तर प्रत्येक खासदारामागे कोणत्या पक्षाला किती निधी मिळाला, याचा तपशीलही आहे. भाजपला २०.०३ कोटी, काँग्रेसला २७.३ कोटी, डीएमके ७९.६९, बीआरएस २००.४३ कोटी, टीडीपी ११०.३ कोटी असा निधी आहे. राजकीय पक्ष, त्यांची सत्ता असलेल्या राज्यांची संख्या, निवडणूक रोख्यांद्वारे मिळालेली देणगी हेही पहावे लागेल. भाजपची केंद्रासहीत १८ राज्यांत सत्ता आहे, त्याला ११,५०० कोटी रुपये मिळाले. टीएमसीच्या हाती एकच राज्य आहे त्याला ३,२१४ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. बीआरएसकडेही १ राज्य असून, त्यालाही २,२७८ कोटी मिळाले. बीजेडीच्या ताब्यात एका राज्याची सत्ता आहे. त्या पक्षालाही १,५५० कोटींचा निधी आहे. द्रमुककडेही एकच राज्य आहे. त्यांना मिळालेला निधी हा १,२३० कोटी रुपयांचा आहे. आता भाजपला मिळालेला निधी ११,५०० कोटी रुपयांना १८ने भागले तर ६३८.८८८ कोटी रुपये होतात. सरासरी काढली तर हा निधी सर्वात कमी आहे. हे आकडे भाजपचे समर्थन करण्यासाठी नाहीत, तर निधी कोणकोणत्या पक्षाला कसा मिळाला, हे स्पष्ट व्हावे हाच आहे.

भाजपने स्वच्छता मोहीमेच्या नावाखाली संस्थांकडून निधी हडपला असा आरोप करणाऱ्यांना हे सणसणीत उत्तर आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार असताना, त्यांना बजाज, पुनावाला एअरटेल हे मोठमोठा निधी देतात. या निधीचे राष्ट्रवादीने काय केले? हा प्रश्न कोणीही विचारणार नाही. राष्ट्रवादीचे खासदार, त्यांचे आमदार यांची संख्या पाहिली तर त्यांना मिळालेलो ६४ कोटी हा मोठा निधी आहे. त्यांची तर सत्ताही नव्हती. म्हणूनच बिगर सत्ताधारी पक्षामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस हा मोठा लाभार्थी ठरला आहे. राष्ट्रवादीने या ६४ कोटींचे काय केले? याचे उत्तर मिळायला हवे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नुकतेच म्हटले होते की, आकडेवारी जाहीर झाल्यानंतर सर्वच चित्र स्पष्ट होईल, विरोधकांची पंचाईत होईल. त्याचे प्रत्यंत्तर येण्यास सुरुवात झाली आहे. संपूर्ण आकडेवारी उघड झाल्यानंतर त्यावर अधिक भाष्य करणे उचित ठरेल.

# भगवंत मैत्रिची शपथ घेतात

॥जय श्री राम ॥
॥ज्ञानेश्वर माऊलींचे दर्शन ॥
!!अ.१८वा./श्लो.६५/
ओ.१३५३ ते १३६८!!

**विवेचन** प्रकाश पागनीस

भगवंत नेहमीच वेगळेपण सोडित नाहीत.याचा अनेक ठिकाणी आपल्याला प्रत्येय येतो.कांही वेळेस मी देव हे सूचित करतात.तर कांही वेळेस मी यादव कुलीन म्हणवतात. तर आता ते मैत्री भाव मांडतात.देव म्हणतात " अर्जुना तुझी शपथ घेऊन बोलतो."कठीण विषय पोहचवण्यासाठी थोडे रुपक,दृष्टांत घेऊन पुन्हा विषयावर यावे लागते. "केवल अद्वैत" हा कठीण विषय आहे.हिन्दुधर्म सोडून कोणताच धर्म अद्वैत स्विकारीत नाही. भक्त भगवंत एक कसे होऊ शकतील?भगवत गीत द्वैताचा आरंभ तर अद्वैतात समापन मानतात.अर्थात देह असे पर्यंत भक्ती खंडित करु नये.

माऊलींच्या ओ.१३५३ ते १३६८:-

तरी बाह्य आणि अंतरा!आपुलिया सर्व व्यापारा!
मज व्यापकातें वीरा!विषो करी!!५३!!
आघवां आंगी जैसा!वायो मिळोनि आहे आकाशा!
तूं सर्व कर्मीं तैसा!मजसीचि अस!!५४!!
किंबहुना आपले मन!करीं माझे एकायतन!
माझेनि श्रवणे कान!भरुनि घालीं!!५५!!
आत्मज्ञाने चोखडी!संत जे माझी रुपडी!
तेथ दृष्टि पडो आवडी!कामिनी जैसी!!५६!!
मी सर्व वस्तीचें वसौटे!माझी नामे जिये चोखटें!
तिये जीवा यावया वाटे!वाचेचिये लावीं!!५७!!
हाताचें करणें!कां पायांचे चालणे!
ते होई मजकारणे!तैसे करीं!!५८!!
आपुला अथवा परावा!ठायी उपकरसी पांडवा!
तेणें यज्ञे होई बरवा!याज्ञिकु माझा!!५९!!
हे एकैक शिकवुं काई!पै सेवकै आपुला ठाई!
उरौनि येर सर्वही!मी सेव्यचि करीं!!१३६०!!
तेथ जाऊनिया भूतद्वेषु!सर्वत्र नमवेन मीचि एकु!
ऐसेनि आश्रयो आत्यंतिकु!लाहसी तूं माझा!!६१!!
मग भरलेया जगाआंतु!जाऊनियां तिजयाची मातु!
होऊनि ठायील एकांतु!आम्हा तुम्हा!!६२!!
तेंव्हा भलतिये अवस्थे!मी तूंतें तें मातें!
भोगसी ऐसे आइतें!वाढेल सुख!!६३!!
आणि तिजें आडळ करितें!निमाले अर्जुना जेथे!
तै मीचि म्हणौनि तूं मातें!पावसी शेखी!!६४!!
जैसी जळीची प्रतिमा!जळनाशीं बिंबा!
येतां गाभागोभा!कांही आहे!!६५!!
पै पवनु अंबरा!कां कल्लोळु सागरा!
मिळतां आडवारा!कोणाचा गा!!६६!!
म्हणौनि तूं आणि आम्ही!हे दिसताहे देहधर्मी!
मग याचा विरामीं!मीचि होसी!!६७!!
यया बोलामाझारीं!होय न होय झणें करीं!
येथ आन आथी तरी!तुझीच आण!!६८!!
अद्वैतबोध:-ओ.५३ ते ६८:-

अर्जुना तु बाह्य देह व अंतरंग कर्म संकल्प व कृती हे माझ्या चिंतनाचे विषय कर. जगात सजीवात एकच वायुच आहे जो आकाशात विसवतो.तसे जे शरीर व कर्मे तू मलाच अर्पण कर.

माझ्याशी एकरुप होण्यासाठी ज्ञानेंद्रिये माझ्या कडे वापर म्हणजे कानाने किर्तन,प्रवचन ऐक रहा. आत्मज्ञानात पारंगत असणारे ऋषी मुनी माझे अंशात्मक अवतार आहेत.हे लक्षात घेऊन संत दर्शन घेत जा.जे कामुक माणूस स्त्रियांचे दर्शनी आनंद मानतो.

हातांनी सतकर्मे कर पायांनी तीर्थ यात्रा करीत जा.


हा माझा आहे.हा परका आहे.हा विचार न करता परोपकार करीत जा. परोपकार माझे साठी केलेला यज्ञ आहे.असे समज. परोपकार ज्यांचेवर केलास तो परोपकाराचे भोक्ते जे भोग घेतात ते भोक्ते मीच आहे असे समज. सर्व जगाविषयीची मैत्री भावना मनात ठाम होते तेंव्हा द्वेष मत्सरादी दोष संपून जातात. सर्वच ठिकाणी मी आहे असे समजून नमस्कार करीत जा.मग देहांत नंतर तु व मी (भक्त भगवंत) वेगळे नसतात.

जीव जीवात्म दोनच इथे जगताचा तिसरा विचार उरत नाही. हाच तुझा माझा एकांत वास समज. अद्वैत साधना स्थळ,काळ,वेळ विचार करीत नाही. ही साधना हेच आत्मसमाधान आहे. मायिक जगत आडगळ वाटल्याने सोडून दिल्याने भक्त भगवंत ऐक्य घडते.

पाण्यात प्रतिबिंब असते पण प्रतिबिंब म्हणजे मी नव्हे. मी वेगळा आहे ज्ञान आहे. या विचारात गुंतागुंतीची गरज नाही. भ्रमण करणारा वारा आकाशात विसवतो.खवळलेल्या लाटा सागराशी एकरुप होतात.तसे देह भेदाने भक्त भगवंत वेगळे पण मृत्युनंतर भगवंत स्वरुपात जीवात्मा विसवतो. भगवंत म्हणतात माझ्यावर विश्वास ठेव कारण मी तुझी शप्पत घेऊन खरे सांगीतले आहे.

Reader Connect

**घरामध्ये काय किंवा बाहेर काय, प्रेमाचा धाक असावा, भीतीचा असू नये.**



# प्रपंचात परस्परांशी प्रेमभाव कसा वाढेल?

**ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज सांगतात...**

निसर्गतःच प्रेम हे प्रत्येक व्यक्तीत आणि प्राणिमात्रांत असते. फार काय, प्रेमाशिवाय मनुष्यप्राणी जिवंत राहू शकणार नाही. प्रेमाने सर्व जग वश करून घेता येते. प्रेम ठेवण्यात पैसा खर्च होत नाही, कष्ट नाहीत. परंतु प्रत्येकाचा अनुभव पाहावा तर प्रेम करणे तितकेसे सोपे आहे असे दिसत नाही. याचे कारण प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा, आवड निराळी आणि दैवयोगाने आलेले ऋणानुबंध निरनिराळे असतात. आपल्या विचाराचे लोक असतील त्यांच्यावर स्वाभाविकच प्रेम जडते; विरुद्ध असतील त्यांच्याबद्दल प्रेम वाटत नाही, किंबहुना द्वेषही उत्पन्न होतो. द्वेष उत्पन्न का होतो, तर आपला आणि दुसऱ्याचा विचार आणि आवड जमत नाही म्हणून. परंतु थोडा विचार केला तर असे दिसते की, आपण ज्या कारणामुळे दुसऱ्याचा द्वेष करतो, तेच कारण दुसऱ्याने आपला द्वेष करायला पुरेसे होते. उदाहरणार्थ, एखादी गोष्ट आपल्याला न आवडली आणि तीच दुसऱ्याला आवडली, तर मला न आवडलेली गोष्ट दुसऱ्याला आवडल्यामुळे दुसऱ्याचा द्वेष करायला मला तेवढे कारण पुरेसे होते. मग त्याच न्यायाने, त्याला न आवडलेली गोष्ट मला आवडते हेच कारण त्याने माझा द्वेष करायला पुरेसे नाही का ? 'व्यक्ती तितक्या प्रकृती' अशी म्हण आहे. त्याचा अर्थच असा की, स्वभावाप्रमाणे प्रत्येकाची आवड ही निराळी असणारच. म्हणून द्वेषबुद्धी नाहीशी करण्याकरिता प्रत्येकाच्या स्वभावाला थोडी सवलत ठेवणे जरूर आहे; आणि प्रेम जडण्याकरिता, सर्वांना आवडणारी जी गोष्ट असेल तिकडे लक्ष देणे जरूर आहे. प्रेम करण्याचा धडा गिरवताना सुरुवात आपल्या घरापासून करावी; घरातली माणसे, नंतर शेजारी आणि त्यानंतर आजूबाजूला आपलेपणाची भावना आपल्या कृतीने वाढवावी; म्हणजे क्रमाक्रमाने प्रेमाची वाढ होऊन सर्व वातावरण प्रेममय होऊन जाईल. सर्वांशी निष्कपट प्रेमाने वागावे; आपल्या बोलण्यामध्ये नव्हे, पाहण्यामध्येसुद्धा प्रेम असावे. आपले बोलणे अगदी गोड असावे. आपल्या अंगी सहजता यावी. घरामध्ये 'अमुक एक गोष्ट कराच' किंवा 'नकाच करू' असे हट्टाने न म्हणता आपण राहावे. जसे घडेल तसे घडू द्यावे. देह असा प्रारब्धावर टाकणे मला फार आवडते.

प्रेम करायला गरिबी आड येत नाही किंवा श्रीमंती असेल तर फार द्यावे लागत नाही. जसे आई आणि मुलाचे प्रेम असते तसे भगवंताचे प्रेम लागावे. ज्याला भगवंताचे प्रेम येईल तो सृष्टीकडे कौतुकाने पाहील. भगवंताचे प्रेम हे कोणत्याही साधनाचा प्राण आहे; ते मागण्यासाठी रोज भगवंताची प्रार्थना करावी आणि त्याच्या अनुसंधानात राहण्याचा प्रयत्न ठेवावा.

PHOTO NEWS

## सुपर सोनिक

**न्यूयॉर्क :** हडसन नदीच्या काठावरील स्टॅच्यू ऑफ लिबर्टीच्या पुढे कॉनकॉर्ड सुपर सोनिक जेट बोटीतून घेऊन जाताना टिपलेले छायाचित्र.



'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# पॉलिटिकल guarantee

विकसित भारताचा पाया रचणाऱ्या महानिवडणूकीची हमी!!!

**News मार्टेम** इम्तियाज जलील यांना 'एमएआयएम' कडून छत्रपती संभाजीनगरमधून उमेदवारी जाहीर

# बाळा भेगडे यांच्या उमेदवारीची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी** -मावळ लोकसभा निवडणुकीत शिवसेनेचे संभाव्य उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या ऐवजी भाजपाचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांनी उमेदवारी द्यावी म्हणून मावळ तालुका भाजपाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. बारणे यांच्या कार्यपध्दतीवर सडेतोड टीका करत लोकसभा मतदार संघातील सहाही विधानसभा क्षेत्रात भाजपाचे निर्विवाद वर्चस्व असून हा मतदार संघ भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारासाठी देण्यासाठीच्या हालचालींमुळे राजकीय वातावरण तापले आहे.

शनिवारी सकाळी माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांच्या निवासस्थानी तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमा झाले होते. मावळ लोकसभेसाठी खासदार श्रीरंग बारणे यांच्या ऐवजी बाळा भेगडे यांना उमेदवारी द्यावी, म्हणून त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.



भेगडे यांच्या निवासस्थानी सुमारे तीन तास चाललेल्या बैठकीत मावळ भाजपा विधानसभा मतदार संघाचे विस्तारक रवी देशपांडे, प्रभारी भास्करराव म्हाळसकर, शहराध्यक्ष अशोक दाभाडे, निवडणूक प्रचारप्रमुख रवींद्र भेगडे, तालुकाध्यक्ष दत्तात्रय गुंड, भाजयुमोचे तालुकाध्यक्ष नितीन मराठे, गुलाबराव म्हाळस्कर शांताराम कदम, दत्तात्रय माळी, बाळासाहेब घोटकुले, उत्तर भारतीय भाजपा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अंशू कुमार प्रेम (पाठक), लहु शेलार आदिंची भाषणे झाली. अब की बार 400 पार करायचे असेल तर बाळा भेगडे यांनांच उमेदवारी देण्याची जोरदार मागणी प्रत्येक वक्त्याने केली.

**लोकसभा निवडणूक '२४**

या निवडणुकीत बारणे निवडून येण्याची शक्यता नाही, त्यांची सहाही विधानसभा मतदारसंघांवर पकड नाही, नागरिकांमधूनही त्यांच्या पराभवाचीच चर्चा होत आहे, भाजपाचे प्राबल्य मावळ लोकसभा मतदार संघावर आहे, बाळा भेगडे यांची प्रतिमा सहाही मतदार संघात पहिल्या पसंतीची आहे अशी कारणे देत वक्त्यांनी त्यांचा रोष व्यक्त केला. बारणे यांना उमेदवारी दिल्यास, भाजपाचा एकही कार्यकर्ता त्यांच्या निवडणूक प्रचारासाठी बाहेर पडणार नाही, भाजपा विक्रमी संख्येने नोटा मतदान करील, शहराध्यक्ष दाभाडे यांनी राजीनामा देण्याचा निर्धारही व्यक्त केला.

शहराध्यक्ष दाभाडे आणि खासदार बारणे यांच्या कार्यपध्दतीवर सडकून टीका केली. एका वृत्तपत्राने नुकत्याच छापलेल्या 'संसदरत्न श्रीरंग आप्पा' या पुस्तिकेत बाळा भेगडे आणि जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे यांच्या नावाचा साधा उल्लेखही नसल्याबद्दलचा नितीन मराठे यांनी खंत व्यक्त केली. बारणेंना दोनदा खासदारकीची उमेदवारी मिळवून देण्यात आणि विजयी करण्यात भाजपाने दिलेल्या योगदानाच्या युतीच्या धर्माचा विसर श्रीरंग बारणेंना पडला असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. युतीचा धर्म मावळ मतदार संघात चालणार नसल्याचे स्पष्ट मत मराठे यांनी मांडले. बहुतांश वक्त्यांनी खा. बारणे यांच्या कार्यपध्दतीवर टीका करताना त्यांनी भाजपाच्या कार्यकर्त्यांना कधीही विश्वासात न घेता काम केल्याचा आरोप केला. मावळ विधानसभा मतदार संघाचे विस्तारक रवी देशपांडे म्हणाले, की पुण्यातील बैठकीत, रघुनाथ कुलकर्णी, मकरंद देशपांडे, रवी अनासपुरे यांनी माझ्यावर सोपविलेल्या मावळच्या विस्तारकपदाची जबाबदारी 11 जानेवारीला मी स्वीकारल्यानंतर, त्यानुसार मावळमधील एकंदरीत परिस्थितीची माहिती घेतली. बाळाभाऊ भेगडे यांच्याशीही बोललो. संघटन मजबूत करण्याची जबाबदारी असल्याने गाव, घर भेटी घेतल्या. 12 फेब्रुवारीला माझा निरीक्षण अहवाल पक्षश्रेष्ठींकडे पाठविला आहे.

## राजकीय 'टिव' टिव...

### सभेत दुय्यम स्थान



मुंबईत इंडिया आघाडीची सभा झाली. प्रत्येकाला सभा घेण्याचा अधिकार आहे. मात्र, शिवतीर्थ हे बाळासाहेबांच्या भाषणांसाठी ओळखलं जायचं. उद्धवजी सभेला संबोधित करताना हिंदू बांधवांनो-भगिनींनो म्हणत करायचे. मात्र, तशी सुरुवात झाली नाही. बहुदा हा संगतीचा परिणाम असावा". याहून पुढे उद्धवसाहेबांचं भाषण 5 मिनिटं झालं राहुलजींचे अधिक वेळ झाले. उद्धवजींना सभेत दुय्यम स्थान दिले असे मला वाटते.

— शंभूराज देसाई

### खुळखुळे वाजायला लागले...



देशाला वाचवायचा असल्याने मी माझ्या भाषणाची सुरुवात, 'जमलेल्या तमाम माझ्या देशभक्त, देशप्रेमी बांधवानो, भगिनींनो आणि मातांनो' अशी केली. भाषणाची अशी सुरुवात केल्याने भाजपचे खुळखुळे वाजायला लागले. काही जणांच्या मानगुटीवर जे भूत बसलेला आहे, असे मोदी भक्त बोंबलायला लागले. मला त्या मोदी भक्तांना विचारायचं आहे, तुम्ही देशभक्त नाहीत का?, आम्ही सर्व देशभक्त आहे. माझ्यावर ज्या भाजपच्या खुळखुळ्यांनी टीका केली, त्यांना मी विचारतो तुमचे हिंदुत्व काय?, तुम्ही मोदी भक्त आहात की देशभक्त आहात?

— उद्धव ठाकरे

## बोगस मतदानाला चाप

### दुबार मतदान रोखणे प्रशासनासाठी आव्हानात्मक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे**: पुणे जिल्ह्यात पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ या चार लोकसभा मतदार संघांचा समावेश होतो. राज्यातच नव्हे, तर देशभरात बारामती लोकसभा निवडणुकीबाबत उत्सुकता आहे. महायुती विरुद्ध महाआघाडी असलेल्या निवडणुकीत या लोकसभा मतदारसंघाचे महत्त्व वेगळे आहे. जिल्ह्यात यावेळच्या लोकसभा निवडणुकीसाठी दोन टप्प्यांत निवडणूक होत आहे. यात बारामती मतदारसंघासाठी दि. ७ मे रोजी मतदान तर पुणे, मावळ आणि शिरुरसाठी दि.१३ मे रोजी मतदान होणार आहे. यात विशेषत: दुबार नावे असलेले मतदार दोन्ही ठिकाणी मतदान करण्याची शक्यता आहे. त्यामुळे असे प्रकार रोखण्याचे आव्हान जिल्हा प्रशासनापुढे असणार आहे.पहिल्या टप्प्यात येथे निवडणूक होणार असल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांचा जोर या मतदार संघात लागणार आहे.

**मतदार याद्यांचे शुद्धीकरण करण्यात आले आहेत. काही नावे यादीतून वगळण्यात आले आहेत. जे दुबार मतदार आहेत, त्यांना नोटीस देऊन एकाच ठिकाणी नाव ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या. तरीदेखील दुबार नावे असतील, तर ती त्या त्या विधानसभा निवडणुकीतील सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. त्यामुळे दुबार मतदान होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली आहे.**

**— डॉ. सुहास दिवसे, जिल्हाधिकारी**

# शंभरहून अधिक मराठा तरुण उमेदवारी अर्ज भरणार...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे**: कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रचार न करता जो समाजासाठी उभा राहील तो आमचा उमेदवार राहील, अशी भूमिका मराठा आरक्षण समन्वयक समिती, हडपसर यांच्या वतीने या वेळी बैठकीत घेण्यात आली. मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाच्या लढ्याला पाठिंबा देण्यासाठी हडपसर विधानसभा मतदारसंघाच्या वतीने सकल मराठा समाजाची बैठक झाली. सरकारने फसवणूक केल्याच्या निषेधार्थ शिरूर लोकसभा मतदारसंघ निवडणुकीत हडपसर विधानसभा मतदारसंघातून शंभरहून अधिक उमेदवारी अर्ज भरण्याचा संकल्प या बैठकीत करण्यात आला.

मराठा आरक्षण समन्वयक समिती, हडपसर यांच्या वतीने आयोजित बैठकीला हनुमंत मोटे, संदीप लहाने पाटील, दत्तात्रय जाधव, अतुल येवले, उत्तम कामठे, राहुल जगताप, राजेंद्र




जगदाळे यांच्यासह मराठा समाजाचे बांधव बैठकीत सहभागी झाले होते.

राज्य सरकारने मराठा समाजाला आरक्षण देतो असे सांगून ज्या मागण्या आंदोलक म्हणून मनोज जरांगे यांनी केल्या त्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. जे मागितलेच नाही ते दहा टक्के आरक्षण देऊन समाजाची बोळवण केली.

तसेच आंतरवाली सराटीत २४ मार्चला जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्याची तसेच देशातील १४ राज्यांतील मराठा बांधवांची बैठक होत असून या बैठकीत हडपसर आणि परिसरातून जास्तीत जास्त संख्येने समाज बांधवांनी जाण्याचे आवाहन समाजाला करण्यात आले.

या बैठकीत काही महत्त्वाचे ठराव पारित करण्यात आले. त्यामध्ये आगामी लोकसभा निवडणुकीत हडपसर विधानसभा मतदारसंघातून शंभरहून अधिक मराठा समाजाच्या बांधवानी उमेदवारी अर्ज भरणे, समाजातील बांधवांवर दाखल केलेले गुन्हे शासनाने मागे घ्यावेत, तसेच २४ मार्च रोजी होणार्या बैठकीत घेण्यात येणार्या निर्णयानुसार पुढील दिशा ठरविली जाईल. त्याचबरोबर हडपसर आणि परिसरातील संपूर्ण मराठा समाज हा मनोज जरांगे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार आहे.

## कसब्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी भाजपचा बैठकीवर धडाका!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे**: कसब्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी भाजपने चांगलाच बैठकीचा धडाका लावला आहे. सर्व पक्षश्रेष्ठी एकत्र येऊन बैठकांवर जोर देत आहेत. उमेदवाराचे नाव जाहीर होताच पुणे भाजपचे कंबर कसली आहे. विधानसभा मतदारसंघनिहाय बैठकांना सोमवारपासून सुरूवात होणार आहे. याशिवाय पुणे, बारामती आणि शिरूर लोकसभा मतदार संघांतही बैठका घेतल्या जाणार आहेत. या बैठकांना महायुतीतील पक्षांचे सर्व प्रमुख या बैठकीला उपस्थित राहणार आहेत.

पुणे, बारामती, शिरूर लोकसभा मतदार संघाचे प्रमुख म्हणून चंद्रकांत पाटील हे बैठका घेणार आहेत. त्यांच्याबरोबर आजी-माजी लोकप्रतिनिधी यामध्ये सहभागी होणार असून, त्यामध्ये शिवसेनेचे संपर्क प्रमुख संजय माशिलकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक मानकर, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, शिवसेनेचे शहर प्रमुख प्रमोद (नाना) भानगिरे, रिपाइंचे शहर अध्यक्ष संजय सोनावणे, शैलेश चव्हाण, लोकजनशक्ती पक्षाचे अध्यक्ष संजय आल्हाट, रिपाइं (खरात गटाचे) सचिन खरात, शिवसंग्रामचे अध्यक्ष भरत लगड, लहुजी शक्ती सेनेचे विष्णू कसबे यांसह रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना, स्वाभिमान संघटना, भीमसेना, राष्ट्रीय स्वराज्य सेना, लहुजी सेना, बहुजन रिपब्लिकन एकता मंच, पीपल्स रिपब्लिक पार्टी (जोगेंद्र कवाडे गट) यांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

शिवाय, पुणे लोकसभा मतदारसंघात विधानसभा मतदार संघनिहाय या बैठका वेगवेगळ्या वेळी होणार आहेत. त्यामध्ये कॅन्टोन्मेंटसह सहा विधानसभा मतदार संघांचा समावेश आहे. या बैठकीत महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचाराची रणनिती ठरवण्यात येणार आहे. तसेच त्यादृष्टीने नियोजनही करण्यात येणार आहे.

# अजित पवारांना आता माझा आवाका समजेल : विजय शिवतारे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : माझा आवाका सांगणाऱ्या अजित पवारांना आता माझा आवाका कळेल, असा इशारा शिवसेनेचे नेते विजय शिवतारे यांनी दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून विजय शिवतारेंनी अजित पवार आणि शरद पवारांविरोधात दंड थोपटले असून बारामतीतून निवडणूक लढवण्याचा निश्चय केला आहे. यानिमित्ताने त्यांनी सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

विजय शिवतारे म्हणाले की, "मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मला आपल्याला युतीधर्म पाळायला हवा, असे सांगितले. पण मी त्यांना सांगितलं की, विधानसभेच्या सगळ्याच मतदारसंघातील मतदारांची उत्सुकता वाढली आहे. कारण ४० वर्षापर्यंत पवारांना विरोध करण्याची कुणाचीही हिंमत नव्हती. त्यामुळे सततच्या सत्तेमुळे त्यांच्यात अराजकता निर्माण झाली आहे. ही अराजकता मोडण्याची जनतेची ईच्छा आहे. त्यामुळे मला उभं राहणं गरजेचं असल्याचे मी त्यांना समजावून सांगितलं आहे," असे ते म्हणाले. मी उभा राहणार नसलो तरी अजित पवार निवडून येणार नाहीत असंही मी मुख्यमंत्री शिंदेंना सांगितलं आहे. परंतू, त्यांनी मला युतीधर्म पाळायचा असल्याचे म्हटले. त्यामुळे येत्या ४ ते ५ दिवसांत याबाबत चर्चा करुन निर्णय घेणार आहे," असे ते म्हणाले.ते पुढे म्हणाले की, "अजित पवार मला म्हणाले होते की, अरे विजय शिवतारे तुझा आवाका किती? तु बोलतोस कोणाबद्दल? आता त्यांना माझा आवाका माहिती पडेल. मी एवढा लहान कार्यकर्ता आहे तर तुम्ही मला का घाबरता?, असा सवाल त्यांनी केला आहे.

# बाणेरमध्ये नागरिकांची अनोखी बॅनरबाजी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे** : निवडणुका जाहीर झाल्यामुळे शहरात आता निवडणुकीचे राजकारण तापले आहे. यामध्ये नागरिकांनी ही उडी घेतली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून सर्वत्र मतदार जागृती केली जात आहे. तर राजकीय पक्षांकडून प्रचाराला सुरुवात झाली आहे. परंतु पुण्याच्या पाषाण भागात राजकीय नेत्यांनी व प्रशासनाने मागील कार्यकाळात सामान्य नागरिकांची कामे न केल्याचे सांगत कंटाळलेल्या नागरिकांनी बॅनरद्वारे आपली नाराजी व्यक्त केली आहे. यात त्यांनी राजकीय नेत्यांसह प्रशासनालाही जबाबदार धरले आहे.तसेच या बॅनरवर 'जेव्हा प्रशासनाला नाही राहिले भान,न राहिली आम्हा मतदारांची जाण,मग आम्ही का करावे मतदान?' अशा आशयाचा मजकूर प्रसिद्ध केला आहे.

पाषाण, सोमेश्वरवाडी, सुतारवाडी या भागात मुलभूत सुविधा पुरविण्यात आल्या नसल्याचे या बॅनरवर मांडण्यात आले आहे. एकवेळ भारत पाकिस्तान प्रश्न सुटेल परंतु पाषाण तलावातील जलपर्णी काढली जाईल का? अशी शंका असल्याचेही बॅनरद्वारे प्रसिद्ध करण्यात आले आहे. पाणी,ड्रेनेज, रस्ते, खेळाचे मैदान यासाठी नागरीकांना झगडावे लागते. तसेच लोकप्रतिनिधींनीही या भागाकडे दुर्लक्ष केल्याने आमचा रोष या बॅनरच्या माध्यमातून जाहिर केल्याचे समीर उत्तरकर व अमित खानेकर यांनी सांगितले. आम्हाला साड्या, भेटवस्तू,जेवण इत्यादी वाटणारे लोकप्रतिनिधी नको तर आम्हाला आमचे प्रश्न सोडवणारे लोकप्रतिनिधी हवे आहेत अशा आशयाचा मजकूर या बॅनरवर झळकला आहे.




## पुणे लोकसभा मतदारसंघ

# काँग्रेसच्या उमेदवारीसाठी मोरे यांची फिल्डिंग!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे** : मनसेकडून पुणे लोकसभेची निवडणूक लढविण्यासाठी मोरे हे इच्छुक होते. मात्र, पक्षांतर्गत कुरघोडीला वैतागून त्यांनी गेल्या आठवड्याला मनसेला रामराम ठोकला. त्यानंतरही लोकसभा निवडणूक लढविण्याच्या भूमिकेवर मोरे ठाम आहेत. मनसे सोडल्यानंतर त्यांना विविध राजकीय पक्षांकडून ऑफर आल्या आहेत. महाराष्ट्र नवनिर्माणसेनेतून बाहेर पडल्यानंतर माजी नगरसेवक वसंत मोरे यांनी पुणे लोकसभा मतदारसंघातून थेट काँग्रेसच्या उमेदवारीसाठी फिल्डिंग लावली आहे. त्यासाठी महाविकास आघाडीतील घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा पाठिंबा मिळविण्याचे मोरे यांचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले.



त्यात त्यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार व शिवसेना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांची भेट घेतली. त्यामुळे मोरे नक्की कोणत्या पक्षात जाणार? अशी चर्चा सुरू आहे. मात्र, पुणे लोकसभेची जागा काँग्रेसकडे आहे. त्यामुळे राष्ट्रवादी आणि शिवसेना ठाकरे गटाच्या पाठिंब्यावर ही जागा मिळविण्याचे मोरे यांचे प्रयत्न सुरू आहेत. पवार यांच्या भेटीतही उमेदवारी मिळविण्यासाठी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्याकडे शब्द टाकावा, अशी विनंती केली होती. त्यावर पवारांनी तो निर्णय काँग्रेसचा असेल, असे सांगितले असल्याची माहिती राष्ट्रवादीच्या पदाधिकार्यांनी दिली. तर, राऊत यांच्या भेटीत नक्की काय चर्चा झाली, हे समजू शकले नाही. दरम्यान, यासंदर्भात मोरे यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

पुणे लोकसभेसाठी काँग्रेसकडून आमदार रवींद्र धंगेकर, मोहन जोशी, अरविंद शिंदे, आबा बागूल हे प्रमुख इच्छुक आहेत. त्यात धंगेकर यांचे नाव आघाडीवर आहे. त्यामुळे धंगेकर यांचा पत्ता कट करण्यासाठी पक्षांतील काही मंडळींनी थेट वसंत मोरे यांना पक्षात घेण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्यावर आत्ता पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात? यावर काँग्रेसच्या उमेदवाराचे भवितव्य ठरणार आहे.

#रा

# प्रशासनाकडून ४४ हजार ईव्हीएमची प्राथमिक तपासणी पूर्ण!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे** : जिल्ह्यातील चारही मतदारसंघांच्या मतदानासाठी महत्त्वाचे असलेले ईव्हीएम निवडणूक आयोगाने जिल्हा प्रशासनाला दिल्या आहे. या मशीन नवीन आहेत. ईव्हीएममध्ये बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट यांचा समावेश होतो. जिल्ह्यात लोकसभेच्या निवडणुकीसाठी मतदानासाठी आवश्यक असलेल्या सुमारे ४४ हजार ईव्हीएमची (इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिन) प्राथमिक तपासणी पूर्ण झाली आहे. कोरेगाव पार्क येथील गोदामामध्ये या सर्व मशिन सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. याठिकाणी त्रिस्तरीय पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली.

जिल्ह्यातील सर्व ईव्हीएम एकाच ठिकाणी म्हणजे कोरेगाव पार्क येथील गोदामात ठेवल्या आहेत. लवकरच त्या पुणे, बारामती, मावळ आणि शिरुर या चार लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे वर्ग केल्या जातील. ईव्हीएम स्थलांतरावेळी आवश्यक तो पोलीस बंदोबस्त सोबत असेल. तसेच वाहनांना जीपीएस ट्रॅकर बसविला जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ.दिवसे यांनी दिली.

**लोकसभा मतदारसंघ ईव्हीएम ठेवण्याचे ठिकाण (स्ट्राँग रुम)**

- पुणे एफसीआय गोदाम कोरेगाव पार्क, पुणे
- बारामती एफसीआय गोदाम कोरेगाव पार्क, पुणे
- मावळ बालेवाडी स्टेडियम, पुणे
- शिरुर वखार महामंडळाचे गोदाम, रांजणगाव (कारेगाव) एमआयडीसी ता. शिरुर

**मतदान प्रक्रियेची स्थिती**

- ८,३८२ : मतदान केंद्र
- बॅलेट युनिट : २० हजार ११७
- कंट्रोल युनिट : १० हजार ५९
- व्हीव्हीपॅट : १० हजार ८९७

## २० मार्च रोजी 'भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचा' २५ वा पदवी प्रदान समारंभ!

**पुणे :** भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचा २५ वा पदवी प्रदान समारंभ २० मार्च रोजी होणार आहे. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल रमेश बैस हे या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून स्नातकांना उद्देशून दीक्षांत भाषण करणार आहेत. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलपती प्रा.डॉ. शिवाजीराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभास प्र-कुलगुरू डॉ. विश्वजीत कदम, कुलसचिव जी. जयकुमार, परीक्षा विभागाचे नियंत्रक डॉ. अँथनी रोज उपस्थित राहणार आहेत. या पदवी प्रदान समारंभात ५८५८ स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे. ५६ विद्यार्थ्यांना पीएच डी ही पदवी आणि ४५ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदके प्रदान करण्यात येणार आहेत. हा कार्यक्रम सकाळी ११.५५ वा. भारती विद्यापीठाच्या पुणे-सातारा रोड येथील शैक्षणिक संकुलात संपन्न होणार आहे. अशी माहिती भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. विवेक सावजी यांनी दिली.

डॉ. सावजी म्हणाले, भारती विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळीच या विद्यापीठाचे विश्वविद्यालयात रूपांतर करण्याचे स्वप्न डॉ. पतंगराव कदम यांनी पाहिले होते. ते १९९६ साली प्रत्यक्षात उतरले. भारती विद्यापीठाला भारत सरकारने अभिमत विश्वविद्यालयाचा दर्जा दिला. गेल्या २८ वर्षांत भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाने गुणवत्तेच्या बळावर देदीप्यमान कामगिरी करून नामांकित विश्वविद्यालय म्हणून लौकिक मिळवला.

### राज्यात लवकरच राबविण्यात येणार

# दिव्यांग व्यक्तींच्या सर्वेक्षणाची मोहीम

**EXTRA special story**
**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम**

**पुणे :** दिव्यांग व्यक्तींच्या दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार त्यांना शासकीय योजना व अन्य सोयीसुविधा देणे सुलभ व्हावे, यासाठी दिव्यांग व्यक्तींच्या सर्वेक्षणाची मोहीम राज्यात लवकरच राबविण्यात येणार आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात दिव्यांग व्यक्तीची संख्या २९.६३ लाख असून, एकूण लोकसंख्येच्या २.६ टक्के इतकी आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग व्यक्तींचे २१ प्रकार निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील दिव्यांग व्यक्तीच्या संख्येत लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. सर्वेक्षण होऊन जवळपास ३० वर्षांचा कालावधी लोटला आहे.

दिव्यांग व्यक्तींसाठी योजना, कार्यक्रम, प्रकल्प याची आखणी व प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता भासू लागली आहे. यासाठी राज्यातील दिव्यांग व्यक्तींचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्याची तयारी राज्य शासनाने केली आहे.



राज्यातील दिव्यांग व्यक्तीचे सर्वेक्षण सर्व शहरे, गावे, वाडी- वस्ती, तांडे व पाडे आदींमध्ये करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सर्वेक्षणासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे आणि महानगरपालिका क्षेत्रात संबंधित आयुक्त हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. निवड करण्यात आलेल्या स्वयंसेवी संस्थमार्फत प्रशिक्षणाचे साहित्य, कार्यपद्धती व वेळापत्रक निश्चित करण्यात येईल.

आशा गट प्रवर्तकांकडून गाव स्तरावरील आशा सेविका, अंगणवाडी सेविका यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. सर्वेक्षणाचे काम सुरू करण्यासाठी २५ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. दिव्यांग सर्वेक्षणाचा कालावधी सुरुवातीस २ महिन्यांसाठी राहील. त्यानंतर आवश्यकतेनुसार वाढविण्यात येईल, असे शासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.दिव्यांगांच्या एकूण लोकसंख्येची किंवा त्यांची सामाजिक- आर्थिक स्थितीची केंद्र सरकार अथवा राज्य शासनाकडे अचूक नोंद उपलब्ध नाही. दिव्यांग व्यक्तीच्या सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या तपशीलवार माहितीच्या आधारे दिव्यांग व्यक्तीच्या शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन, आर्थिक साह्य, सामाजिक सुरक्षा, सकारात्मक कृतिविषयक योजना या सर्वांगीण विकासाकरिता विविध उपक्रम व योजना यांचे नियोजन करून दिव्यांग व्यक्तीचे सक्षमीकरण करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा शासनाचा निर्धार आहे.

राज्यातील दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण करणे, २१ दिव्यांगत्व प्रकारानुसार व्यक्तीची राज्यातील आकडेवारी उपलब्ध करणे, दिव्यांग व्यक्तीकरिता योजना, कार्यक्रम, प्रकल्प याची आखणी व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी माहितीचे संकलन करणे, दिव्यांग व्यक्तीविषयक संशोधन करण्यासाठी दिव्यांग व्यक्तीच्या समस्या गरजा ओळखणे, दिव्यांग व्यक्तीचे सर्वांगीण पुनर्वसन करून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी माहिती संकलित करणे.

## अवतीभवती
CITY UPDATE



### कविता हा अंतर्मनातील भावनेचा आविष्कार असतो- वि. ग. सातपुते

**पुणे :** कविता लिहिता येणं ही साक्षात भगवंताची कृपा आहे आपल्या घरातील ज्येष्ठांनी घडवलेले संस्कार, आपल्याला लाभलेला सहवास कवितेतून व्यक्त होत असतो, असे मत ज्येष्ठ साहित्यीक वि. ग. सातपुते यांनी व्यक्त केले आहे. सावरकर सदन येथे काव्यानंद प्रतिष्ठान आयोजित स्व. चिंतामणराव पोटे काव्यमित्र पुरस्कार 2023 वितरण प्रसंगी अध्यक्ष म्हणून वि. ग. सातपुते बोलत होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून पिंपरी चिंचवड साहित्य मंचचे राजेंद्र घावटे हे लाभले होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून नवयुग साहित्य व शिक्षण मंडळाचे राज अहेरराव उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक काव्यानंद प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुनिल खंडेलवाल यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लेखिका सौ.वंदना ताम्हाणे यांनी केले. काव्यानंदचे सचिव विवेकानंद पोटे यांनी गणेश वंदना तर भाग्या खंडेलवाल हिने गुरुवंदना सादर केली. स्व. चिंतामराव पोटे काव्यमित्र पुरस्कार 2023 हा पुणे येथील कवयित्री सौ. आरुशी दाते यांना प्रदान करण्यात आला.काव्यानंद प्रतिष्ठान तर्फे प्रकाशित मराठी भाषा गौरव दिन विशेषांकाचे प्रकाशन ही यावेळी करण्यात आले. कविवर्य सुभाष धाराशिवकर यांच्या शब्द दिंडीतला वारकरी व अक्षर बंध या दोन्ही काव्यसंग्रहाचे आणि कवयित्री भाग्यश्री मोडक यांच्या भावशिल्प या काव्य संग्रहाचे प्रकाशन यावेळी संपन्न झाले. कार्यक्रमाची सांगता पसायदान गायनाने झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल शेळके, समीर मुल्ला व वंश खंडेलवाल आदींनी सहकार्य केले.

### आधार कार्ड यूपीआय डिजिटलायझेशन यावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**पुणे :** भारतात झपाट्याने झालेल्या डिजिटल क्रांतीमुळे भारतातील शहरांपासून खेड्यांपर्यंत विविध सरकारी व निम सरकारी योजना पोहोचवण्यात आल्या. त्यात यु.पी.आय आधार कार्ड मुळे पूर्ण देश व देशातील नागरिकांना एक संघ जोडण्यात यश आले. याचे सर्व श्रेय जाते ते माजी मुख्य आर्किटेक्ट आधार, युपीआय आणि इंडिया स्टॅक, सिटिओ एकस्टेप फाउंडेशनचे डॉ. प्रमोद वर्मा यांना व त्यांच्या सनबर्ड समूहाला. भारत नवीन स्केल आणि गतीसह डिजिटल पायाभूत सुविधांच्या उभारणीत धोरणात्मक बदल करत आहे. डिजिटल सार्वजनिक वस्तू (डीपीजी), डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (डीपीआय) नवीनता आणि सर्जनशीलतेची माहिती करून देण्यासाठी येत्या २२ व २३ मार्च रोजी पुण्यातील विमान नगर येथील सिम्बॉयसिस ईशान्य सभागृह येथे डिजिटलायझेशन वरती आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यात आली आहे. डीपीजी टेक फ्यूजन या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन सनबर्ड समूह आणि टेकडी टेक्नॉलॉजीजने केले आहे. भारत नवीन स्केल आणि गतीसह डिजिटल पायाभूत सुविधांच्या उभारणीत धोरणात्मक बदल करत आहे हे लक्षात घेऊन नवोदित हे परिवर्तनाची प्रेरक शक्ती आहेत. त्यांनी नवोन्मेषकांना आणि स्टार्ट-अप्सना मार्केट इनोव्हेशनचा अवलंब करण्याचे आणि डिजिटल पब्लिक गुड्स (डीपीजी) - ओपन स्टँडर्ड्स आणि डेटा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) मॉडेल्स, स्टँडर्ड्स आणि कंटेंटसह ओपन सोर्स सॉफ्टवेअर - आणि त्यांच्या प्लॅटफॉर्ममध्ये प्रोटोकॉल वापरण्याचे आवाहन केले.दोन दिवस चालणाऱ्या परिषदेमध्ये डॉ. प्रमोद वर्मा, सीईओ आयजिओटी कर्मयोगी भारतचे अभिषेक सिंह असे अनेक प्रख्यात वक्ते डीपिजीएस आणि डीपीआयएस तयार करण्यामधील त्यांचे अविश्वसनीय अंतर्दृष्टी, कौशल्य आणि यशोगाथा सांगणार आहे.

### शुभमंगल सामूहिक किंवा नोंदणीकृत

## विवाह योजनेत १० हजार ऐवजी मिळणार २५ हजार!

**पुणे :** महिला व बाल विकास विभागामार्फत शुभमंगल सामूहिक विवाह योजनेची व्याप्ती वाढवून, ती केवळ शेतकरी, शेतमजूर यांच्या मुलींसाठी मर्यादित ठेवलेली नाही. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग वगळता अन्य प्रवर्गातील एक लाख रुपयांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या निराधार, वपरित्यक्ता आणि विधवा महिलांच्या केवळ दोन मुलींच्या विवाहासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील शुभमंगल सामूहिक किंवा नोंदणीकृत विवाह योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. या योजनेंतर्गत मुलीच्या विवाहासाठी आवश्यक असलेल्या मंगळसूत्र व इतर वस्तूंची खरेदी करण्यासाठी प्रती जोडपे १० हजार रुपये एवढे अनुदान शासनातर्फे देण्यात येते. आता त्यात वाढ करून २५ हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे. महागाई दरात वाढ झाल्यामुळेच अनुदानात वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

अनुदान वधूच्या वडिलांच्या नावाने, वडील हयात नसल्यास आईच्या नावाने व आई-वडील दोन्हीही हयात नसल्यास वधूच्या नावाने धनादेशाद्वारे देण्यात येते. या योजनेच्या अंमलबजावणीस जवळपास १० वर्षांचा कालावधी उलटून गेला असून, आता महागाई दरामध्ये वाढ झालेली आहे. महाराष्ट्र राज्याचे ४ थे महिला धोरण-२०२४ जाहीर करण्यात आले



आहे. त्यामध्ये या योजनेंतर्गत प्रती जोडपे देण्यात येणाऱ्या रकमेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सामुहिक विवाह राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रत्येक जोडप्यामागे २ हजार रुपयांएवजी २ हजार ५०० एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येणार आहे. १ एप्रिल २०२४ पासूनच या वाढीव अनुदानाचा लाभ मिळणार आहे.

जिल्हा महिला व बाल अधिकारी कार्यालयामार्फत संबंधित बँकेच्या शाखेमध्ये रक्कम जमा करून व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात बँकिंगने किंवा इतर मार्गाने त्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात येत होती. आता त्यात बदल करून संबंधित जिल्हा महिला व बाल अधिकारी कार्यालयामार्फत अनुदानाची रक्कम थेट लाभार्थी हस्तांतरण पद्धतीने संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.

## दृकश्राव्य माध्यमाच्या वापराने शिक्षण अधिक रंजक होईल...

### दिग्दर्शक निर्माते मिलिंद लेले यांचे प्रतिपादन!

**पुणे :** शालेय शिक्षणात दृकश्राव्य माध्यमांचा वापर झाल्यास शिकण्याची प्रक्रीया अधिक रंजक होईल. याचा विचार करून नविन शैक्षणिक धोरण राबविताना नियोजन झाले पाहिजे, असे मत प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माते मिलिंद लेले यांनी व्यक्त केले.

विद्या भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वार्षिक आढावा बैठकीत ते प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते. यावेळी त्यांनी विद्या भारतीचे माहिती पत्रक आणि संकेतस्थळ यांचे प्रकाशन केले. विद्या भारतीचे क्षेत्र शिशुवाटिका प्रमुख भाई उपाले, प्रांताध्यक्ष डॉ. अरुणराव कुलकर्णी, प्रांत मंत्री रघुनाथ देवीकर आणि प्रचार विभाग प्रमुख राजन वडके



उपस्थित होते.

चित्रपट क्षेत्रात भारतीयत्वाचा विचार रुजवण्याची आणि वाढविण्याची गरज मिलिंद लेले यांनी व्यक्त केली. त्यानुसार भारतीय फिल्म आणि टेलिव्हिजन संस्थेच्या (FTII) अभ्यासक्रमाच्या बदलासाठी विद्या भारतीने प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले.

विद्या भारती - अखिल भारतीय शिक्षा संस्थान या संघटनेची वार्षिक आढावा बैठक पुण्याच्या व्हि आर रुईया मूक बधिर विद्यालयात पार पडली. पश्चिम महाराष्ट्रातील सात जिल्ह्यांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. गेल्यावर्षभरात जिल्हा स्तरावर झालेल्या विविध कामांचा आढावा या बैठकीत मांडण्यात आला.

यावेळी मिलिंद लेले यांच्या हस्ते विद्या भारतीचे संकेत स्थळ तयार करणारे यश भावसार यांचा सत्कार करण्यात आला. प्रांताचे सह मंत्री दादासाहेब काजळे यांनी बैठकीचे सूत्रसंचालन केले.

### स्वीप कार्यक्रमांतर्गत कोथरूड विधानसभा मतदारसंघात मतदान जनजागृती

**पुणे :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत कोथरूड विधानसभा मतदारसंघात पुणे महानगरपालिकेचे कोथरूड क्षेत्रीय कार्यालय, सूसगाव, पाषाण आणि जयभवानी नगर येथे मतदान जनजागृती करण्यात आली. यावेळी सहाय्यक समाज विकास अधिकारी राजेंद्र मोरे, समाजसेवक पांडुरंग महाडिक, समूह संघटिका उज्वला पाटील, पद्मा गुरव, समुपदेशीका गौरी कासार आदी उपस्थित होते. कोथरूड सूसगाव व पाषाण येथील कार्यक्रमात घरातील मुली व युवकांचे नाव मतदान यादीत नसेल तर त्यांनी नाव नोंदणी करावी असे आवाहन केले आहे.

## RS NEWS DIGEST

### होळीनिमित्त 'ऋत्विक फाउंडेशन फॉर परफॉर्मिंग आर्टस्' आयोजित

**‘होली के रंग स्वरों के संग' विशेष कार्यक्रम**

**पुणे :** पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्या वृंदावन गुरुकुलातील गुणवंत कलाकारांचे सुमधुर बासरीवादन, रेनी चौरसिया यांचे प्रभावी शास्त्रीय गायन तर ऋजुता सोमण कल्चरल अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या बहारदार कथक नृत्याद्वारे सप्तरंगांची उधळण करित कृष्ण लिलांचेही अनोखे दर्शन घडले. निमित्त होते ऋत्विक फाउंडेशन फॉर परफॉर्मिंग आर्टस्तर्फे होळीनिमित्त आयोजित केलेल्या ‘होली के रंग स्वरों के संग' या विशेष कार्यक्रमाचे. कोथरूडमधील ऋत्विक फाउंडेशन फॉर परफॉर्मिंग आर्टस् येथे शनिवारी सायंकाळी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ गायिका, विदुषी अनुराधा चौरसिया, चित्रपट दिग्दर्शक राजीव चौरसिया यांची प्रमुख उपस्थिती होती. ऋत्विक फाउंडेशन फॉर परफॉर्मिंग आर्टस्चे संस्थापक प्रविण कडले, चेतना कडले, सल्लागार कथक नृत्यांगना ऋजुता सोमण उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात वृंदावन गुरुकुलातील गुणवंत बासरीवादक किरण बिश्त, वैष्णवी जोशी, रेणुका लिखिते, घन:श्याम चांद यांच्या वादनाने झाली. कलाकारांनी राग बिहागमधील आलाप, जोड आणि बंदिश सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर काफी रागातील सुप्रसिद्ध ‘रंग बरसे भिगे चुनरवाली रंग बरसे' हे गीत बासरीवादनातून सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. सूर-लय-तालाचा अनोखा संगम साधत कवी नारायण त्रिपाठी लिखित आणि ज्येष्ठ गायिका, विदुषी अनुराधा चौरसिया व रेनी चौरसिया यांनी संगीतबद्ध केलेली ‘कृष्ण होली मे रंग जा' ही रचना गायिका रेनी चौरसिया व गायक-संवादिनी वादक सुभ्रदीप साहू यांनी सादर केली. ‘रंगी सारी गुलाबी चुनरिया मोहे मारे नजरिया सावरिया' ही रचना रसिकांना विशेषत्वाने भावली. या रचनांना बासरीवादकांनी समर्पक साथ केली. आशिष राघवानी यांची तबलासाथ होती. या गायन-वादन मैफलीने रसिकांनी होळीच्या उत्सवाचे रंग लुटले तसेच कृष्णाच्या खट्याळ लिलांचा आनंदही अनुभवला.

## गायन आणि नृत्याची मैफल ठरली अविस्मरणीय..!

**पुणे :** बहुमुखी गायिका, सूरमणी विदुषी सानिया पाटणकर यांचे बहारदार गायन तर कथक नृत्यांगना व रंगकर्मी आस्था गोडबोले-कार्लेकर यांच्या चैतन्यपूर्ण, भावपूर्ण नृत्य सादरीकरणाने रसिकांची सायंकाळ संस्मरणीय ठरली. केंद्रीय परराष्ट्र मंत्रालयाअंतर्गत असलेल्या भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे (आयसीसीआर) पुणे विभागीय कार्यालय आणि भारतीय विद्या भवन - इन्फोसिस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सरदार महादेव बळवंत नातू सभागृह या गायन आणि नृत्याविष्काराचे आयोजन करण्यात आले होते.आयसीसीआरचे विभागीय उपनिदेशक राज कुमार, भारतीय विद्या भवनचे प्रा. नंदकुमार काकिर्डे, गानवर्धन संस्थेचे सचिव रवींद्र दुर्वे यांची प्रमुख उपस्थिती होती.विदुषी सानिया पाटणकर यांनी आपल्या सादरीकरणाची सुरुवात राग दुर्गामधील मध्यलय झपतालातील ‘सखी मोरी रुमझुम बादल गरजे बरसे' या जयपूर-अत्रौली घराण्याच्या ज्येष्ठ गायिका गुरू अश्विनी भिडे-देशपांडे यांनी रचलेल्या बंदिशीने केली. स्वर-लयीशी असलेले नाते, आवाजाची सहज



फिरत, दमदार ताना असे वैशिष्ट्य दाखवत सानिया पाटणकर यांनी मैफल रंगविण्यास सुरुवात केली. दृत लयीत ‘जय जय जय भवानी दुर्गे' ही रचना अत्यंत ताकदीने सादर करून त्यांनी रसिकांनी मंत्रमुग्ध केले. या नंतर ‘ताना दे रे ना तन दे रे ना' हा तराणा सादर केला. ‘सकल ब्रिज धुम मची हा हा रे' ही होरी सादर करून गायन मैफलीची सांगता केली. किशोर कोरडे (तबला), माधव लिमये (संवादिनी), आदिती नगरकर, मयुरा मांगले-गांधी (सहगायन, तानपुरा), श्रेयसी सबनीस (तानपुरा) यांनी समर्पक साथ केली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात आस्था गोडबोले-कार्लेकर यांनी नृत्य सादरीकरणाची सुरुवात प्रतिभा तळेगावकर रचित ‘आदि देव महादेव' या शिववंदनेने केली. सर्पधारी, डमरूचा निनाद करणाऱ्या, रुद्र ताल धरणाऱ्या, गौरीसह प्रकटलेल्या महादेवांचे रूप रसिकांसमोर नृत्याद्वारे उभे केले.

त्यानंतर पारंपरिक तालपक्षामध्ये दुर्गा परण, आमद, गतनिकास सादर करून नृत्यातील कौशल्य दर्शविले. व्यक्तींच्या मनोभूमिका दर्शविणारी चाल (सिधी गत) प्रभावीपणे सादर केली. तसेच कथक नृत्यातील वैशिष्ट्य असणाऱ्या घुंघट या प्रकारातील नायिकांचे विलोभनीय दर्शन घडविले. त्यानंतर श्रीकृष्णाच्या बाल, किशोर आणि युवा अवस्थेतील मोहकता दाखवत गोवर्धन लिला सादर केली. नृत्यबोल म्हणजेच पुराणकथेतील प्रसंगांचे दर्शन घडविणे होय. आस्था गोडबोले-कार्लेकर यांनी नृत्याद्वारे ग्रहा आणि विष्णूभक्त गजेंद्र यांची द्वंद्व कथा सादर केली. तसेच पखवाज बोलांसह जुलबंदीही दर्शविली. कार्यक्रमाची सांगता करताना आनंदाची लयलूट, रंगांची उधळण करणाऱ्या होळी या सणाचे वैशिष्ट्य दाखवत आस्था यांनी पंडित केशव तळेगावकर रचित ‘होली आयी रे आयी रे' या रचनेवर नृत्य सादर करून श्रीकृष्ण आणि गोपिकांची छेडछाड, हास्यविनोद आणि उत्कट प्रेमाचे भावविभोर दर्शन घडवून रसिकांना अचंबित केले. पंडित संजय आगळे (पखावज), अक्षय शेवडे (तबला), पूर्वा कवठेकर (पढंत), डॉ. मेधा तळेगावकर-राव (गायन), सुधीर टेकाळे (संवादिनी) यांनी साथ केली.वसंत ऋतुतील रंगांची लयलूट, चैतन्य पालवीची लागलेली चाहूल या पार्श्वभूमीवर उत्साहाने साजऱ्या होणाऱ्या होळीच्या वातावरणाचा आनंद रसिकांनी गायन आणि नृत्याच्या मैफलीतून भरभरून लुटला.



## सोन्याच्या दरात घसरण कायम!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आठवड्याच्या पहिल्या दिवशी सोमवारी सोन्याच्या दरात घसरण झाली. आज २२ आणि २४ कॅरेट सोन्याचे दर ४०० रुपयांनी घसरले आहेत. दिल्लीत १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची किंमत ६६,०२० रुपये आहे. तर चेन्नईत सोन्याचा सर्वाधिक दर ६६,४४० रुपये आहे. सोन्याची सर्वाधिक किंमत चेन्नईमध्ये आहे. एक किलो चांदीची किंमत ७७,००० रुपये आहे.

दिल्लीत १८ मार्च रोजी २२ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत ६०,५३० रुपये तर २४ कॅरेट सोन्याच्या किंमत ६६,४४० रुपये आहे. मुंबईत २२ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत ६०,३८० रुपये आणि २४ कॅरेट सोन्याची किंमत ६५,८७० रुपयांवर आली आहे. अहमदाबादमध्ये २२ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत ६०,४३० रुपये आहे. तर २४ कॅरेट सोन्याची किंमत ६५,९२० रुपये आहे.


**मार्केट वॉच**

▲ बीएसई: ७२,७४८.४२ + १०४.९९ (०.१४%)
▲ निफ्टी : २२,०५५.७० +३२.३५ (०.१५%)
▲ पेट्रोल : ₹ +१०४.०८
▲ डिझेल : ₹ +९०.६१
▼ सोने : ₹ -६५,८७० per 10 gms
▼ चांदी : ₹ -७७,००० per kg

# अदानी करणार १४ अब्ज गुंतवणूक

## बंदरांपासून ऊर्जा, विमानतळ, वस्तू, सिमेंट आणि मीडिया!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अदानी समूहाने १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षात बंदरांपासून ऊर्जा, विमानतळ, वस्तू, सिमेंट आणि मीडियापर्यंतच्या पोर्टफोलिओ कंपन्यांमध्ये १.२ लाख कोटीपेक्षा जास्त गुंतवणूक करण्याची योजना आखली आहे. २०२४-२५ आर्थिक वर्षासाठी अंदाजित भांडवली खर्च किंवा कॅपेक्स पोर्टफोलिओने केलेल्या अंदाजापेक्षा ती ४० टक्के जास्त आहे.

विश्लेषकांच्या मते, ३१ मार्च रोजी संपणाऱ्या वर्षात पोर्टफोलिओचे कॅपेक्स सुमारे १० अब्ज डॉलर होईल, असा अंदाज आहे. यातील बहुतांश गुंतवणूक वेगाने वाढणाऱ्या व्यवसायांमध्ये जाणार आहे - अक्षय, ग्रीन हायड्रोजन आणि विमानतळ यांचा यात समावेश आहे. नियोजित कॅपेक्सपैकी ७० टक्के त्याच्या ग्रीन पोर्टफोलिओमध्ये जाईल - प्रामुख्याने अक्षय ऊर्जा, ग्रीन हायड्रोजन, ग्रीन इव्हॅक्युएशन या क्षेत्रात ती केली जाईल. उर्वरित ३० टक्क्यांपैकी बहुतांश विमानतळ आणि बंदरांच्या व्यवसायांवर खर्च केले जाणार आहेत.

कॅलेंडर वर्ष २०२३ मध्ये, कंपनीने ९.५ अब्ज डॉलर वितरित केले, तर त्याचे निव्वळ कर्ज मार्च २०२३ ते सप्टेंबर २०२३ पर्यंत ४ टक्क्यांनी कमी झाले आहे. डिसेंबर तिमाहीत, अदानीच्या पोर्टफोलिओने ६३.६ टक्क्यांची विक्रमी वाढ नोंदवली, तर २०२३ मध्ये त्यांचा १२ महिन्यांचा खर्च ९.५ अब्ज डॉलर इतका होता. तो सर्वकालीन उच्चांकी आहे.

फेब्रुवारीमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका निवेदनात, समूहाने म्हटले आहे की, मजबूत वाढ आणि मजबूत क्रेडिट प्रोफाइलमुळे वाढता रोख प्रवाह 'ग्रीन इन्व्हेस्टमेंट'साठी योग्य वातावरण निर्माण करत आहे. गौतम अदानी यांनी कमोडिटीज व्यापारी म्हणून सुरुवात केली आणि बंदरे, वीजनिर्मिती, विमानतळ, खाणकाम, नवीकरणीय ऊर्जा, गॅस, डेटा सेंटर्स, मीडिया आणि सिमेंटमध्ये त्यांचे साम्राज्य त्यांना सर्वात श्रीमंत व्यक्ती बनवते.

**नूतनीकरणीय उद्यान**

● अदानी समूह खवदा, गुजरात येथे जगातील सर्वात मोठे नूतनीकरणीय उद्यान तयार करत आहे, जे ५३० चौरस किलोमीटरमध्ये पसरले आहे - हे क्षेत्र पॅरिस शहराच्या पाचपट आहे.

**१०० अब्ज डॉलर**

● नवी मुंबई विमानतळ, गंगा एक्सप्रेसवे, गुजरातमधील जगातील सर्वात मोठे अक्षय पार्क आणि मुंद्रा बंदर यासारख्या प्रकल्पांसह भारतातील सर्वात मोठ्या पायाभूत सुविधांची समूह कंपनी म्हणून पुढील ७-१० वर्षांत १०० अब्ज डॉलर गुंतवणूक करण्याचे वचन दिले आहे.



# विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांचा खरेदीवर भर

**कर्ज बाजारांमध्ये ५०,४७१ कोटी रुपयांची केली गुंतवणूक**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी मार्चमध्ये आतापर्यंत भारतीय शेअर आणि कर्ज बाजारांमध्ये ५०,४७१ कोटी रुपयांची केलेली गुंतवणूक महत्त्वाची ठरली आहे.

एनएसडीएलच्या आकडेवारीनुसार, गुंतवणूकदारांनी महिन्याभरात ४०,७१० कोटी रुपयांचे समभाग खरेदी केले आणि डेट मार्केटमध्ये १०,३८३ कोटी रुपयांची गुंतवणूक केली.

संस्थांगत गुंतवणूकदार जानेवारीमध्ये मोठे विक्रेते आणि फेब्रुवारीमध्ये खरेदीदार ठरले. मार्चमध्ये ते मोठे खरेदीदार बनले आहेत. परंतु त्यात काही मोठ्या सौद्यांचा समावेश आहे आणि म्हणूनच, ते क्रियाकलापांचे खरे सूचक नाही. मात्र, गुंतवणुकीचा वाढता कल कायम आहे, असे विश्लेषकांनी स्पष्ट केले आहे.

अनेक महिन्यांपासून विदेशी संस्थांगत गुंतवणूकदारांच्या गुंतवणुकीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे अनियमित स्वरूप आहे. अमेरिकेमधील रोखे उत्पन्नातील बदलांना प्रतिसाद म्हणून त्यांच्या धोरणात बदल करत आहेत. यूएस रोखे उत्पन्नात पुन्हा वाढ झाली असल्याने, काही दिवसांत ते पुन्हा विक्रेते होऊ शकतात, असेही त्यांनी म्हटले आहे.

# सेन्सेक्स-निफ्टी हिरव्या रंगात बंद...

## गुंतवणूकदारांनी ३८,००० कोटी कमावले!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** अस्थिर व्यापारादरम्यान, सोमवारी भारतीय शेअर बाजार किंचित वाढीसह हिरव्या रंगात बंद झाले. निर्देशांक १०५ अंकांनी वाढला, तर निफ्टी २२,०५० वर बंद झाला. शेअर बाजारातील गुंतवणूकदारांच्या संपत्तीत आज सुमारे ३८,००० कोटी रुपयांची वाढ झाली.

मिडकॅप आणि स्मॉलकॅप समभागांमध्ये फार घडामोड झाली नाही, तर क्षेत्रीय निर्देशांकात मेटल, ऑटो, फार्मा आणि कमोडिटी समभाग तेजीत राहिले. आयटी आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या समभागात मोठी घसरण झालेली दिसून आली. निर्देशांक १०४.९९ अंकांनी वाढून ७२,७४८.३४ वर बंद झाला, तर निफ्टी २७.८० अंकांनी वाढून २२,०५१.१५ वर बंद झाला.

सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल वाढून ३७८.८७ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे त्याच्या आधीच्या ट्रेडिंग दिवशी म्हणजे शुक्रवारी ३७८.४९ लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप आज सुमारे ३८,००० कोटी रुपयांनी वाढले. दुसऱ्या शब्दांत, गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ३८,००० लाख कोटी रुपयांची वाढ झाली.

निर्देशांकापैकी ३० पैकी १५ समभाग आज वाढीसह बंद झाले. यामध्ये टाटा स्टीलच्या समभागामध्ये सर्वाधिक ५.१६% वाढ झाली. यानंतर, महिंद्रा अँड महिंद्रा, जेएसडब्ल्यू स्टील, टाटा मोटर्स आणि ॲक्सिस बँक यांचे समभाग सर्वाधिक वाढले. उर्वरित १५ समभाग घसरणीसह बंद झाले. यामध्ये इन्फोसिसचे समभाग १.८९ टक्क्यांच्या घसरणीसह सर्वाधिक घसरले. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टायटन, विप्रो आणि हिंदुस्तान युनिलिव्हर यांचे समभाग १.२१% ते १.६५% घसरून लाल रंगात बंद झाले.

## स्टार्टअप्स उभारणार ८-१२ अब्ज डॉलर!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय स्टार्टअप्सने यावर्षी ८-१२ अब्ज डॉलर इतका निधी उभारण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. देशातील स्टार्टअप इकोसिस्टम जगातील सर्वात वेगवान ठरली आहे. २०२१ आणि २०२२ पूर्वी भारतीय स्टार्टअप्समधील गुंतवणुकीचा दर सुमारे ८-१० अब्ज डॉलर होता, जो २०२१ आणि २०२२ मध्ये एकत्रितपणे ६० अब्ज डॉलर इतका झाला. भारतीय स्टार्टअप इकोसिस्टम तयार करण्यासाठी सुमारे ८०,००० कोटी रुपयांचा निधी पुरेसा आहे.

# शेअर बाजार 'या' दिवशी बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** देशातील शेअर बाजार मार्चच्या दुसऱ्या पंधरवड्यात दोन दिवस बंद राहणार आहे. एकूण ३ दिवस शेअर बाजार बंद असेल.

या आधी ८ मार्चला महाशिवरात्रीनिमित्त शेअर बाजार बंद होता. आता २५ मार्चला होळी आणि २९ मार्चला गुड फ्रायडे असल्याने शेअर बाजार बंद राहणार आहे. या दोन्ही दिवशी मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारामध्ये कोणतेही व्यवहार होणार नाहीत. दोन्ही तारखा एकाच आठवड्यात असल्याने २५ ते २९ मार्च या आठवड्यात फक्त ३ दिवस बाजार सुरू राहणार आहे. दोन्ही तारखांना चलन डेरिव्हेटिव्ह सेगमेंटमध्ये कोणतेही व्यवहार होणार नाहीत. शेअर बाजारासाठी २०२४ च्या सुट्ट्यांच्या यादीनुसार, होळीमुळे २५ मार्च रोजी कमॉडिटी आणि इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट विभागातील सकाळचा व्यापार (सकाळी ९ ते संध्याकाळी ५) बंद राहील. मात्र, एमसीएक्सवर व्यापार सत्र संध्याकाळच्या सत्रात खुले राहील. कमॉडिटी डेरिव्हेटिव्ह सेगमेंट आणि इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट्समध्ये संध्याकाळी ५ ते सकाळी ९ या वेळेत ट्रेडिंग सुरू राहील. गुड फ्रायडेमुळे २९ मार्च रोजी सकाळ आणि संध्याकाळच्या वेळेत व्यवहार बंद राहील.

**२०२४ मधील सुट्ट्या**

या वर्षाच्या उरलेल्या कालावधीत साप्ताहिक सुटी व्यतिरिक्त एकूण १० दिवस शेअर बाजार बंद राहणार आहे. एप्रिलमध्ये दोन दिवस बाजार बंद राहणार आहे. याशिवाय मे, जून, जुलै, ऑगस्ट आणि ऑक्टोबरमध्ये प्रत्येकी एक दिवस बंद राहणार आहे. याशिवाय नोव्हेंबरमध्ये दोन दिवस शेअर बाजार बंद राहणार आहे. मात्र, डिसेंबरमध्ये एक दिवस बंद राहणार आहे.

# ईपीसी प्रोजेक्ट्सची दमदार कामगिरी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गॅस पाइपलाइन प्रकल्पांवर कार्यरत असलेल्या प्रथम ईपीसी प्रोजेक्ट्सच्या समभागाने एनएसईच्या एसएमई प्लॅटफॉर्मवर दमदार प्रवेश केला. घसरत्या बाजारातही कंपनीचे शेअर्स लिस्टिंगनंतर तेजीसह वरच्या सर्किटवर पोहोचले.

या कंपनीच्या आयपीओला गुंतवणूकदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता आणि तो एकूण १७८ पेक्षा जास्त पट सबस्क्राइब झाला. या आयपीओ अंतर्गत शेअर्स ७५ रुपये किमतीने जारी करण्यात आले होते. ईपीसी प्रोजेक्ट्स कंपनीच्या समभागाने ११३.३० रुपयांवर प्रवेश केला. याचा अर्थ आयपीओ गुंतवणूकदारांना ५१ टक्के लिस्टिंग गेन मिळाला. लिस्टनंतर समभाग आणखी तेजीसह ११८.९५ रुपयांच्या वरच्या सर्किटवर पोहोचले. आयपीओ गुंतवणूकदार आता ५८.६० टक्के नफा कमवत आहेत.

# भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडला अच्छे दिन!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** बाजारातील चढउतारांदरम्यान एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्रातील दिग्गज भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडमध्ये खरेदी करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. भारतीय संरक्षण आणि अंतराळ इलेक्ट्रॉनिक्स प्रणाली/उप-प्रणाली किंवा कंपोनंट उद्योगाने आर्थिक वर्ष २०१२-२७ मध्ये १३-१४% ची वार्षिक चक्रवाढ गती प्राप्त करणे अपेक्षित आहे. आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत कंपनीचा हिस्सा (एकूण संरक्षण उत्पादनात) ४०-४२% पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

एका अहवालानुसार, कंपनीला स्ट्रॅटेजिक इलेक्ट्रॉनिक उत्पादने/प्रणालींची विस्तृत श्रेणी डिझाईन, विकसित आणि निर्मितीमध्ये मजबूत तांत्रिक कौशल्य आणि क्षमतांमुळे मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये कंपनीकडे एकूण ३२,७१६ कोटी रुपयांच्या ऑर्डर होत्या. ज्या आर्थिक वर्ष २०२२ आणि आर्थिक वर्ष २०२३ मध्ये १९०००-२०००० कोटींच्या होत्या. सलग मिळणाऱ्या ऑर्डरमुळे कंपनीचा व्यवसाय मजबूत होत आहे.

सध्याच्या ऑर्डरचा अनुशेष ७३५०० कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे, ज्यामुळे महसूलात चांगल्या वाढीची शक्यता दिसून येते. संरक्षण इलेक्ट्रॉनिक्स, गैर-संरक्षण आणि निर्यात ऑर्डर पाइपलाइन मजबूत आहेत.

कंपनीने आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी दुसरा लाभांश जाहीर केला आहे. कंपनी गुंतवणूकदारांना ७० पैसे प्रति शेअर दराने अंतरिम लाभांश देईल. अंतरिम लाभांशाची रेकॉर्ड तारीख २३ मार्च म्हणून निवडण्यात आली आहे. दुसरा अंतरिम लाभांश घोषित केल्यापासून ३० दिवसांच्या आत दिला जाईल.

# विमा क्षेत्रात ५४,००० कोटींची विदेशी गुंतवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सरकारने भांडवल प्रवाहाच्या नियमांचे उदारीकरण केल्यामुळे गेल्या ९ वर्षांत विमा क्षेत्राला ५४,००० कोटी रुपये थेट विदेशी गुंतवणूक म्हणून मिळाले आहेत, असे एका अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सरकारने अनुज्ञेय एफडीआय मर्यादा २०१४ मधील २६ टक्क्यांवरून २०१५ मध्ये ४९ टक्के आणि नंतर २०२१ मध्ये ७४ टक्क्यांपर्यंत वाढवली आहे. विमा मध्यस्थांसाठी अनुज्ञेय एफडीआय मर्यादा २०१९ मध्ये १०० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आली होती. परिणामी डिसेंबर २०१४ ते जानेवारी २०२४ दरम्यान विमा कंपन्यांमध्ये ५३,९०० कोटी रुपयांची एफडीआय प्राप्त झाली होती. जानेवारी २०२४ पर्यंत विमा खेळाडूंची संख्या ५३ वरून ७० पर्यंत वाढली आहे.

विमा प्रवेश २०१३-१४ मधील ३.९ टक्क्यांवरून २०२२-२३ मध्ये ४ टक्क्यांपर्यंत वाढला आहे,

# हैदराबाद ही भारताची बिर्याणीची राजधानी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हैदराबाद :** हैदराबादचे बिर्याणीबद्दलचे प्रेम अतुलनीय असून, गेल्या १२ महिन्यांत शहराने तब्बल १३ दशलक्ष बिर्याणी ऑर्डर केल्या आहेत. दर ५ पैकी १ जण बिर्याणी ऑर्डर करत असल्याने हैदराबादला बिर्याणी राजधानी म्हणून गौरवण्यात आले आहे.

स्विगीने सांगितले की, २०२३ च्या अहवालानुसार, प्रति सेकंद सरासरी २.५ बिर्याणी ऑर्डर केलेल्या बिर्याणी ही देशातील सर्वाधिक ऑर्डर केलेली डिश होती. हैदराबादमध्ये चैतन्य फूड कोर्ट, मेहफिल, शाह घाऊस हॉटेल आणि रेस्टॉरंट यांसारख्या प्रख्यात आस्थापनांसह संपूर्ण हैदराबादमध्ये १,७०० सहभागी रेस्टॉरंटना ऑर्डर मिळाल्याचे दिसले. १३ दशलक्ष बिर्याणींपैकी सर्वात जास्त ऑर्डर चिकन बिर्याणीसाठी देण्यात आल्या. व्हेज बिर्याणी, चिकन दम बिर्याणी आणि मटण बिर्याणी यांचीही मागणी नोंदवण्यात आली.

दक्षिणेतील डेटा सांगतो की, गेल्या १२ महिन्यांत १० दशलक्ष बिर्याणी ऑर्डर करून बंगळुरू दुसऱ्या स्थानावर आहे तर चेन्नई एसएस हैदराबाद ब्रियानी, अंबूर सारख्या प्रसिद्ध आस्थापनांसह चेन्नईमधील ९५० हून अधिक सहभागी रेस्टॉरंट्सच्या ऑर्डरवर डील आणि विनामूल्य ५ दशलक्ष बिर्याणीसह तिसऱ्या स्थानावर आहे.



# अदानी समुहाचा हा समभाग वाढणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अदानी समुहाच्या समभागांनी गेल्या वर्षभरात गुंतवणुकदारांना चांगला परतावा दिला आहे. त्यामुळे आजही गुंतवणुकदार अदानी समुहाच्या समभागामध्ये गुंतवणुकीची संधी शोधत असतात. तज्ज्ञांच्या मते, अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेडचे समभाग येत्या काही दिवसांत वाढू शकतात. अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेडचे समभाग ५० टक्क्यांपर्यंत तेजी नोंदवू शकतात. सध्या हा समभाग १,०४० रुपयांवर आहे.

अदानी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेडमध्ये दोन वर्षांत ५० टक्क्यांनी वाढ होऊ शकते. यासाठी १,६०० रुपये लक्ष्य किंमतीसह खरेदीचा सल्ला देण्यात येत आहे. भारतातील पॉवर ट्रान्समिशन आणि डिस्ट्रिब्युटर क्षेत्र विस्तारासाठी सज्ज आहे. याला अनुकूल धोरण वातावरण, भरीव क्षमता वाढ आणि दर-आधारित स्पर्धात्मक बोलीद्वारे खासगी क्षेत्राच्या सहभागासाठी वाढलेल्या संधींमुळे कंपनीचा व्यवसाय वाढणार आहे.

# किरकोळ विक्रीत ५ टक्क्यांची वाढ!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** किरकोळ विक्रेत्यांनी गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत फेब्रुवारीमध्ये सरासरी ५ टक्क्यांची वाढ नोंदवली असून, ही वाढ मागणीतील सातत्य दर्शवते. क्रीडासाहित्य, पादत्राणे आणि जलद सेवा रेस्टॉरंट्स यांसारख्या श्रेणींमध्ये वाढ झाली आहे, असे एका अहवालात नमूद करण्यात आले आहे.


रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या किरकोळ व्यवसाय सर्वेक्षणानुसार फेब्रुवारी २०२३ मधील विक्री पातळीच्या तुलनेत फेब्रुवारी २०२४ मध्ये विक्री ५ टक्क्यांनी वाढली असल्याचे दाखवते.

ग्राहक वर्ग आणि क्षेत्रांमध्ये चक्रीयपणे खर्च करतात असे दिसते. आर्थिक वर्षाच्या बहुतांश भागांमध्ये भारताच्या पूर्व भागात मजबूत वाढ दिसून येत होती, परंतु गेल्या काही महिन्यांत ती कमकुवत झाल्याचे दिसते. त्याचप्रमाणे, सीडीआयटी उत्पादनांच्या वाढीला शेवटच्या तिमाहीत हेडविंडचा सामना करावा लागेल असे दिसते आहे, तर पहिल्या तीन तिमाहीत ती चांगली वाढली आहे.

# ईव्ही दुचाकींची विक्री १० लाखांच्या पुढे जाणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** इलेक्ट्रिक टू-व्हीलर वाहनांची विक्री १० लाखांच्या जवळपास पोहोचली असून भारतात ८.५१ लाख नोंदणी झाली आहे. देशातील वाहन नोंदणीचा मागोवा घेणाऱ्या वाहन डेटानुसार, आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये, ७,२५,२९७ इलेक्ट्रिक दुचाकींची नोंदणी झाली होती, त्या तुलनेत २०२१-२२ मध्ये केवळ २,५०,२१९ युनिट्सची नोंदणी झाली होती. २०२३ मध्ये सबसिडी कमी होऊनही विक्रीत वाढ झाली आहे. सबसिडी कमी केल्यानंतर जूनमध्ये विक्रीत घट झाली, ऑगस्ट २०२३ पासून नोव्हेंबरमध्ये ९१,८५२ इलेक्ट्रिक दुचाकींची नोंदणी झाली. रेटिंग एजन्सी आयसीआरएची अपेक्षा आहे की, सध्याच्या अंदाजे ५ टक्क्यांच्या तुलनेत पुढील वर्षी इलेक्ट्रिक टू-व्हीलरच्या प्रवेशाची पातळी ६-८ टक्क्यांपर्यंत पोहोचेल.



## ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या 'स्काय वॉक'चे काम...

# अनिश्चित काळासाठी रखडले!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या विस्तीर्ण परिसरात हेरिटेज इमारत, इन्फोसिस फाउंडेशनची इमारत तसेच नवीन ११ मजली सुसज्ज इमारत, नवीन शवागार, आपत्कालीन विभाग अशा पाच-सहा इमारती आहेत. रुग्णांना एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीमध्ये नेण्यासाठी किंवा डॉक्टरांना, नातेवाइकांना ये-जा करण्यासाठी बराच वेळ जातो. वैद्यकीय तपासण्यांसाठी फेऱ्या माराव्या लागतात. त्यामुळे ससूनच्या परिसरातील सर्व इमारती 'स्काय वॉक'ने जोडण्याचा प्रस्ताव तीन वर्षांपूर्वी मान्य झाला. त्यानंतर मागील तीन वर्षांमध्ये पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. आधी कॉरिडॉरच्या कामासाठी तीनदा निविदा काढूनही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर ललित पाटील प्रकरणामुळे ससून चर्चेत आले. या सर्व घडामोडींमध्ये मागील तीन वर्षांपासून प्रस्तावित कामे मागे पडली. त्यातच 'स्काय वॉक'चे काम अनिश्चित काळासाठी रखडले आहे.




"'स्काय वॉक' प्रकल्पासाठी राज्य शासनाची मान्यता मिळाल्यावर निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली. सुरुवातीला निविदांना प्रतिसाद मिळाला नाही. सध्या 'स्काय वॉक'चा प्रस्ताव तूर्तास बाजूला ठेवण्यात आला आहे."

**— डॉ. विनायक काळे**
अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय

ससूनमधील जुन्या इमारतीपासून नवीन ११ मजली इमारतीला जोडणाऱ्या 'स्काय वॉक'च्या ड्रीम प्रोजेक्टला तूर्तास ब्रेक लागला आहे. निविदांचा न मिळणारा प्रतिसाद, निधीचा अभाव, इतर वैद्यकीय सुविधांची उभारणी, यामुळे सध्यातरी 'स्काय वॉक'चा प्रस्ताव बाजूला पडल्याचे ससून रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले.

ससूनमधील 'स्काय वॉक'च्या प्रकल्पाला राज्य सरकारने २०२१ मध्ये मान्यता दिली. त्यापूर्वी ससून रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी सर्व इमारतींची पाहणी केली होती. प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा आढावा घेऊन प्रस्ताव तयार करून राज्य सरकारला पाठविण्यात आला. शासनाने मान्यता देऊन ४ कोटी २३ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. काही महिन्यांपूर्वी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली. सुरुवातीला काहीच प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा प्रक्रिया राबविण्यात आली. प्रकल्पाच्या कामाचे दर कमी असल्याने निविदांना बरेचदा प्रतिसाद मिळाला नाही.

## हॅकएमआयटी-डब्ल्यूपीयू २०२४ चे आज उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यार्थ्यांमध्ये इनोव्हेशन, इन्क्युबेशन आणि इनव्हेंशनची संस्कृती वाढविण्यासाठी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित 'हॅकएमआयटी-डब्ल्यूपीयू' २०२४ चे उद्घाटन आज १९ मार्च रोजी सकाळी ११ वा युनिव्हर्सिटीच्या स्वामी विवेकानंद सभागृहात होणार आहे. याच्या उद्घाटन प्रसंगी गोदरेज अँड बॉयस एमएफजी कंपनी, लि.चे कार्यकारी उपाध्यक्ष आणि व्यावसायीक प्रमुख पुष्कर गोखले आणि महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (सिस्टम आणि ऑपरेशन्स) चे संचालक विनोद अग्रवाल हे प्रमुख पाहुणे यांच्या उपस्थित होणार आहे. तसेच एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड व उपस्थित राहणार आहेत. तसेच कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, डॉ. कृष्णा वरखडे व डॉ. कृष्णप्रसाद गुणाले यांची उपस्थिती राहणार आहे.एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेवर आधारित असणार आहे.

# संक्षिप्त बातम्या



श्री ध्यास प्रतिष्ठानच्या वर्धापन दिनानिमित्त प्रसिद्ध किंतनकार चारूदत्त आफळे बुवांचा सत्कार ब्राह्मण संघटनेकडून करण्यात आला. यावेळी संजय सुपेकर,सचिन टापरे,लक्ष्मीकांत धडफळे आदी उपस्थितीत होते.

## ॲनिमॅट्रोनिक हत्तीण लहानग्यांना देणार प्राणी संवर्धनाचे धडे


**पुणे :** ॲनिमॅट्रोनिक तंत्रज्ञानाच्या आधारे बनविण्यात आलेली एली ही हत्तीण आता शहरातील लहानग्यांना प्राणी संवर्धनाचे धडे देणार आहे. ॲनिमॅट्रोनिक तंत्रज्ञानाद्वारे या हत्तीणीची निर्मिती करण्यात आली असून आशियातील हा पहिलाच प्रयत्न आहे. प्राणी संवर्धनासंदर्भात नव्या पिढीमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने पीपल फॉर एथिकल ट्रीटमेंट ऑफ ॲनिमल्स अर्थात पेटा इंडिया आणि फ्रिडा आर्ट हाऊस यांच्या संयुक्त विद्यमाने हा अभिनव शैक्षणिक उपक्रम हाती घेण्यात आला असून दि. १९ मार्च ते रविवार दि २४ मार्च दरम्यान या ॲनिमॅट्रोनिक हत्तीणीचे मॉडेल अनुभविण्याची संधी मुलांना मिळणार आहे.

## चिरफाड न करता शस्त्रक्रिया यशस्वी...

# लॅप्रोस्कोपी तंत्रज्ञानाद्वारे मूत्रपिंड प्रत्यारोपण!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ओपन सर्जरी किंवा जास्त चिरफाड न करता लॅप्रोस्कोपिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून मूत्रपिंड दात्याकडून काढून त्याचे प्रत्यारोपण ओपन पद्धतीने करण्याची शस्त्रक्रिया पुण्यातील रुग्णालयात यशस्वीपणे करण्यात आली आहे. दोन रुग्णांवर ही मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. युरोकूल-कुलकर्णी युरो सर्जरी इन्स्टिट्यूटचे (युरोकूल रुग्णालय) संस्थापक डॉ. संजय कुलकर्णी व डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी यांनी ही शस्त्रक्रिया केली आहे. लॅप्रोस्कोपी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून ओपन सर्जरीविना मूत्रपिंड दात्याचे



मूत्रपिंड लॅप्रोस्कोपी पद्धतीने काढून ते ओपन पद्धतीने रुग्णावर बसवण्याची शस्त्रक्रिया या दांपत्याने २००० मध्ये पुण्यात सुरू केली. युरोकूल-कुलकर्णी युरो सर्जरी इन्स्टिट्यूटमध्येही याच प्रकाराने दोन यशस्वी शस्त्रक्रिया झाल्या आहेत. याबाबत डॉ. संजय कुलकर्णी म्हणाले की, डॉक्टर असलेल्या वडिलांचे मूत्रपिंड मुलाला व नणंदेचे मूत्रपिंड भावजयीला अशा या दोन मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया होत्या. कोणत्याही रक्तस्रावाशिवाय झालेल्या या शस्त्रक्रियेनंतर दोन्ही रुग्णांना तिसऱ्या दिवशी घरी पाठवण्यात आले. या चौघांचेही स्वास्थ्य उत्तम आहे. सततचे डायलिसिस टाळण्यासाठी मूत्रपिंड प्रत्यारोपण महत्त्वपूर्ण ठरते. ही शस्त्रक्रिया सहज झाल्याने रुग्णांना लवकर बरे होण्याचा विश्वास मिळाला आहे.

# पुण्यातून सुटणार होळी विशेष रेल्वे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशभरात होळी खूप मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरी केली जाते. त्यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे प्रशासनाने होळी विशेष रेल्वे सोडण्याचा निर्णय घेतला आहे. पुण्याहून दानापूर, गोरखपूर व मुजफ्फरपूरसाठी विशेष रेल्वे धावणार आहे.

### १. पुणे-दानापूर-पुणे

पुणे- दानापूर सुपरफास्ट विशेष रेल्वे २१ मार्चला पुण्याहून सकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी सुटेल. दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजून ४० मिनिटांनी दानापूरला पोहोचेल. तर दानापूर-पुणे स्पेशल एक्स्प्रेस २२ मार्चला दानापूर येथून दुपारी दीड वाजता सुटेल. दुसऱ्या दिवशी सायंकाळी ७ वाजून ४५ मिनिटांनी पुण्याला पोहोचेल. या गाडीला दौंड कार्ड लाइन, अहमदनगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खांडवा, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना,



माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाल उपाध्याय जंक्शन, बक्सर आणि आरा स्थानकावर थांबा देण्यात आला.

### २. पुणे- गोरखपूर- पुणे

पुणे- गोरखपूर विशेष रेल्वे २२ मार्चला पुण्याहून दुपारी ४ वाजून १५ मिनिटांनी सुटेल. दुसऱ्या दिवशी रात्री ९ वाजता गोरखपूरला पोहोचेल. तर गोरखपूर - पुणे विशेष रेल्वे २३ मार्चला गोरखपूरहून रात्री ११ वाजून २५ मिनिटांनी सुटेल. पुण्याला सोमवारी सकाळी ६ वाजून २५ मिनिटांनी पोहोचेल. गाडीला दौंड कार्ड लाइन, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खांडवा, इटारसी, भोपाळ, बिना, वीरांगना राणी लक्ष्मीबाई झाशी जंक्शन, ओरई, कानपूर, लखनौ, बाराबंकी, गोंडा, मानकापूर जंक्शन, बस्ती आणि खलीलाबाद आदी स्थानकावर थांबा देण्यात आला.

### ३. पुणे-मुझफ्फरपूर-पुणे

पुणे- मुझफ्फरपूर सुपरफास्ट एसी एक्स्प्रेस २५ मार्च ते ८ एप्रिल दरम्यान दर सोमवारी पुण्याहून सकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी सुटेल. मुझफ्फरपूरला दुसऱ्या दिवशी दुपारी ३ वाजून १५ मिनिटांनी पोहोचेल. तर मुझफ्फरपूर - पुणे सुपरफास्ट एसी एक्स्प्रेस २३ मार्च ते ६ एप्रिल दरम्यान दर शनिवारी मुझफ्फरपूरहुन रात्री ९ वाजून १५ मिनिटांनी सुटेल. पुण्याला सोमवारी पहाटे ५ वाजून ३५ मिनिटांनी पोहोचेल. गाडीला हडपसर, दौंड कार्ड लाइन, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खांडवा, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापूर, पिरपैंती आणि हाजीपूर आदी स्थानकावर थांबा देण्यात आला.

# निवडणुकीनंतरच शिक्षकांच्या बदल्यांना मुहूर्त!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पवित्र पोर्टलमार्फत निवड झालेल्या शिक्षकांना पदस्थापना देण्याआधी सध्या कार्यरत शिक्षकांना त्यांच्या विकल्पानुसार बदलीची संधी द्यावी, या शालेय शिक्षण विभाग व ग्रामविकास विभागाच्या आदेशाला बगल देत प्राथमिक शिक्षण विभागाने पवित्र पोर्टलच्या शिक्षकांना पदस्थापना दिली.

त्यानंतर आता बदलीची प्रक्रिया सुरू करण्याबाबतचे आदेश शिक्षणाधिकाऱ्यांनी तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहेत. मात्र, या बदल्यांत आचारसंहितेचा अडसर येणार असून, आता लोकसभा निवडणुकीनंतरच शिक्षकांच्या बदल्यांना मुहूर्त लागणार आहे.

नगर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने १२ मार्च रोजी पवित्र पोर्टलद्वारे अर्ज भरलेल्या १४३ शिक्षकांना नियुक्त्या दिल्या. मात्र, शासननिर्णयानुसार आधी जिल्ह्यांतर्गत बदलीची प्रक्रिया होणे गरजेचे होते, अशी शिक्षक संघटनांची मागणी होती.

शालेय शिक्षण विभागाने ६ मार्चला व नंतर ग्रामविकास विभागाने ११ मार्च २०२४ला तसे पत्र काढून शिक्षकांना जिल्ह्यांतर्गत बदलीची संधी देण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना कळवले होते. मात्र, या पत्राला बगल देत शिक्षण विभागाने पवित्र पोर्टलच्या १४३ शिक्षकांना नियुक्त्या दिल्या. या



प्रक्रियेमुळे जिल्ह्यातील शिक्षकांच्या रिक्त जागा काहिशा भरल्या असल्या तरी कार्यरत शिक्षकांना नियमाप्रमाणे बदलीची संधी देणे गरजेचे होते, असे शिक्षकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, आता तीन दिवसांनंतर शिक्षण विभागाने शालेय शिक्षण व ग्रामविकास अशा दोन्ही विभागांच्या पत्राची दखल घेत बदल्यांची प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी १४ मार्च रोजी गटशिक्षणाधिकाऱयांना कळवून विनंती बदल्यांच्या अनुषंगाने शिक्षकांचे अर्ज व आवश्यक माहिती संकलित करण्यास सांगितले आहे. परंतु आता लोकसभेची आचारसंहिता लागल्याने या बदल्या निवडणुकीनंतरच होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

# मुलीच्या आजारपणामुळे सहा वर्षांनी ते पुन्हा आले एकत्र...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुलीचे आजारपण दोघांच्या संसारासाठी वरदान ठरले आहे. सहा वर्षे वेगळे राहणारे दोघे मुलीला डेंग्यू झाल्याने महिनाभर एकत्र राहिले. तिच्या भवितव्याचा विचार करत दोघांनी पुन्हा एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. यामध्ये वकिलांनी केलेले समुपदेशनही महत्त्वाचे ठरले आणि त्यांच्या नात्यातील सहा वर्षांचा दुरावा संपुष्टात आला.

माधव आणि माधवी (दोघांची नावे बदलली आहेत) दोघेही उच्चशिक्षित. आयटी क्षेत्रात कार्यरत. तो उत्तर प्रदेशचा, तर ती पश्चिम बंगाल येथील. बेंगलोर येथे एका कंपनीत कामाला होते. सुरुवातीला मैत्री आणि नंतर त्याचे रुपांतर प्रेमात झाले. दोघांनी २००९ मध्ये विवाहही केला. संसार सुरळीत सुरू असताना दोघे हिंजवडी येथे स्थलांतरित झाले.

दोघांना २०१८ मध्ये एक मुलगी झाली. त्यानंतर माधवची परदेश वारी झाली. दोघांत चारित्र्याच्या संशयावरून वाद होऊ लागले. वाद इतके विकोपाला गेले की, दोघे विभक्त राहू लागले. तिने २०२० मध्ये प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार दावा दाखल केला.

तर त्यानेही वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश यांच्याकडे ॲड. प्रणयकुमार लंजिले, ॲड. अनिकेत डांगे आणि ॲड. लक्ष्मण सावंत यांच्यामार्फत घटस्फोटासाठी अर्ज केला. दोघातील वाद सुरूच होते. दरम्यान, सहा वर्षीय मुलगी आजारी पडली. तिला डेंग्यू झाला.

तिला काही दिवस रुग्णालयात उपचारासाठी ठेवण्यात आले. त्या कालावधीत माधवही रुग्णालयात राहिला. दरम्यान, मुलीच्या हट्टानुसार आणखी काही दिवस दोघे घरी एकत्र राहिले. मुलीने 'मम्मी-पप्पा' दोघेही हवे असल्याचे म्हटले. तिच्या या म्हणण्यानंतर दोघेही आपापसांतील वाद विसरले आणि नव्याने संसार सुरू केला.

"प्रत्येक दांपत्याच्या आयुष्यात मुलाचे अन्यसाधारण महत्त्व आहे. हे पटवून् दिल्यास आपापसांतील वाद विसरून दोघे एकत्र येऊ शकतात. इथेही तेच घडले. समुपदेशन केल्यानंतर मुलीच्या भवितव्याचा विचार करून दोघे एकत्र आले."


**— ॲड. प्रणयकुमार लंजिले**
पतीचे वकील

# पुणे विमानतळावर 'चेक इन काउंटर'ची संख्या ४९ होणार...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विमानतळावर दाखल होताच प्रवाशांना आपल्या बोर्डिंग पाससाठी 'चेक इन काउंटर'वर जावे लागते. त्यामुळे प्रवाशांची येथे सतत गर्दी असते. नवीन टर्मिनलवर प्रशासनाने ३४ 'चेक इन काउंटर' उपलब्ध केले आहेत. प्रवासी संख्येच्या तुलनेत ही संख्या कमी ठरत असल्याने प्रवाशांसाठी हे गैरसोयीचे ठरले असते.

मात्र विमानतळ प्रशासनाने प्रवाशांच्या सोईसाठी 'चेक इन काउंटर'ची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला. जुन्या टर्मिनलच्या 'आगमन' गेटच्या जागेत १५ 'चेक इन काउंटर' बांधण्यात येणार आहे. त्यामुळे पुणे विमानतळावरील 'चेक इन काउंटर'ची संख्या तब्बल ४९ इतकी होणार आहे.



यामुळे प्रवाशांचा रांगेतला वेळ कमी होण्यास मदत मिळेल.

प्रवाशांच्या सोयीसाठी पुणे विमानतळाच्या जुन्या टर्मिनलचे 'आगमन' गेट बंद करून त्या जागेत १५ 'चेक इन काउंटर' सुरू करण्यात येणार आहे. नवीन टर्मिनल सुरू होताच जुने टर्मिनल प्रवाशांसाठी बंद होईल.त्यानंतर 'चेक इन काउंटर'चे काम सुरू होणार आहे. तसेच याच इमारतीत प्रवाशांसाठी वरच्या बाजूस 'सेक्युरिटी होल्डींग एरिया' देखील तयार केला जाणार असल्याची माहिती विमानतळावरील विश्वसनीय सूत्रांनी दिली.

पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलवरून काही दिवसांतच विमानांची वाहतूक सुरू होणार आहे. नवीन टर्मिनल प्रवासी सेवेत दाखल झाल्यावर जुने टर्मिनल प्रवाशांसाठी बंद केले जाणार आहे. जुने टर्मिनल बंद होताच विविध कामांना सुरुवात होणार आहे. काही दिवसांतच समर शेड्यूल सुरू होणार असल्याने नवीन कामांचा प्रवाशांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.विमानतळाच्या 'निर्गमन' गेटसमोर विविध कंपन्यांचे तिकीट केंद्र आहेत. तसेच पास विभाग, 'सीआयएसएफ'चे कार्यालय आहे. ही सर्व कार्यालये लवकरच दुसऱ्या जागेत स्थलांतरीत होत आहे. हे स्थलांतर झाल्यावर 'निर्गमन' गेट समोरचे बांधकाम पाडण्यात येणार आहे.

## श्वान शर्यतीची चांगलीच वाढली क्रेझ...

# आता अर्थकारणाला मिळणार गती!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रात बैलगाडा शर्यतींना पारंपारिक वासरा लाभलाय. या बैलगाडा शर्यती आणि खिल्लारचे जसे वेगळे अर्थकारण आहे तसंच आता श्वान शर्यतीमुळे महाराष्ट्रात आता वेगळं अर्थकारण आकाराला येऊ लागलंय. यामध्ये अनेक श्वानपालक सहभागी होत असून दिवसेंदिवस श्वान पालकांची संख्या वाढत आहे.

सध्या महाराष्ट्रात बैलगाडा शर्यतीप्रमाणे श्वान शर्यतीची चांगलीच क्रेझ वाढली असून अनेकजण श्वान पाळून त्यांना शर्यतीसाठी तयार करत आहेत. महाराष्ट्रातील विविध ठिकाणचे श्वान शर्यतीमध्ये सहभागी होत असून त्यांना भरघोस बक्षिसांचेही वितरण करण्यात येतंय. सध्या पश्चिम महाराष्ट्राच्या साताऱ्यात जास्त शर्यती सुरू असल्याने अनेकांनी जातीवंत श्वान पाळायला सुरूवात केल्याचं चित्र आहे.



दरम्यान, महाराष्ट्रात साधारणपणे २००५ सालाच्या आसपास श्वान शर्यती सुरू झाल्याची माहिती आहे. परदेशात श्वान शर्यतीची परंपरा आहे पण आपल्याकडे बैलगाडा शर्यतीप्रमाणे श्वान शर्यतीला परंपरा नाही. पण आता हळूहळू श्वान शर्यतीकडे अनेकजण वळू लागल्याने श्वान शर्यतीला चांगले दिवस आले आहेत.

शर्यतीसाठी जातीवंत श्वान आणल्यानंतर त्याला पहिल्या वर्षी खर्च करावा लागतो. त्यामध्ये त्याचे लसीकरण, खाद्य, संगोपन आणि शिकवण्याकडे लक्ष द्यावे लागते. तरीही तो खर्च खूप जास्त नसतो. खाद्यामध्ये त्यांना भाकरी, चिकनचा आणि मिनरल, व्हिटामिन्सचा सामावेश असणे गरजेचे असते.

"सध्या महाराष्ट्रात साधारणपणे ५०० ते ५५० शर्यतीची कुत्रे आहेत. स्पर्धाही चांगल्या होत असून ५१ हजार रूपये, बाईक, बुलेट, ट्रॅक्टरपासून ते थार गाडीपर्यंत बक्षीसे असतात. साताऱ्यात जास्त श्वान शर्यती होत असून इतर परिसरातही बैलगाडा शर्यतीप्रमाणे दररोज कुठे ना कुठे श्वान शर्यती सुरू आहेत. श्वान शर्यतीमुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होत आहे."

**— सुरज जाधव**
श्वानपालक शेतकरी

#रा

पान १ वरून

## मविआचं ठरतंय

अशी सुद्धा राजकीय वर्तुळामध्ये चर्चा आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडी निर्णय घेऊन आम्हाला कळवावे, त्यानंतरच आम्ही सकारात्मक चर्चा करू, अशी भूमिका राष्ट्रवादी शरद पवार गटाने घेतली आहे. त्यामुळे आता वंचित काय निर्णय घेणार यावर महाविकास आघाडीचे जागावाटप अवलंबून असेल.

## भाजपच्या रुळावर मनसेचे इंजिन!

भाजपकडून राज ठाकरे यांच्या पक्षासाठी दक्षिण मुंबईचा मतदारसंघ सोडला जाईल, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरु आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांच्या दिल्लीवारीला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे आता दिल्लीत काय घडणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## शिरूर तालुक्यात सशस्त्र दरोडा!

तर आनंदा सावळेराम ठोंबरे असे जखमी वृद्धाचे नाव आहे. या प्रकरणी आनंदा यांचा मुलगा बाबा ठोंबरे याने पोलिसांत तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शिरूर तालुक्यातील ठोंबरेवस्ती येथे आनंदा सावळेराम ठोंबरे हे त्यांची पत्नी फुलाबाई आनंदा ठोंबरे यांच्या बरोबर राहतात. रविवारी रात्री ते त्यांची कामे आटोपून झोपले होते. मध्यरात्री ३ च्या सुमारास काही दरोडेखोर हे ठोंबरे यांच्या घरात घुसले. दरम्यान, आवाज झाल्याने ठोंबरे दाम्पत्य जागे झाले. यावेळी दरोडे खोरांनी त्यांना जबर मारहाण केली. तसेच घरातील दागिने आणि रोख रक्कम घेऊन ते पसार झाले, दरोडेखोरांच्या मारहाणीत फुलांबई या गंभीर जखमी झाल्या. यात त्यांच्या जागीच मृत्यू झाला. तर आनंदा ठोंबरे हे गंभीर जखमी झाले आहे. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांचावर उपचार सुरू आहे.

## २१ मार्च पर्यंत सगळे तपशील द्यावेत!

तुम्ही आत्तापर्यंत माहिती का उघड केली नाही? असाही सवाल सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी एसबीआयला केला आहे. एसबीआयची बाजू मांडताना वकील हरीश साळवे म्हणाले, आम्हाला निकाल समजला तसे त्याचे पालन आम्ही केलं आहे. सगळी माहिती उघड करण्यासाठी काही कालावधी मागितला होता. मात्र यावर सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी नाराजी व्यक्त केली. स्टेट बँक ऑफ इंडियाने रोखे क्रमांक जाहीर केलेले नाहीत, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करा आणि रोख्यांचा युनिक क्रमांक म्हणजेच अल्फा न्यूमेरिक नंबर सादर करा असंही न्यायालयाने म्हटले आहे.

## बिहारमध्ये भाजपला १७ जागा...

दरम्यान, पशुपती पारस यांच्या लोक जन शक्ती पार्टीला एकही जागा दिलेली नाही. पारस यांना आधीच अंदाज आलेला की, त्यांना रालोआत जागा दिली जाणार नाही. त्यामुळे त्यानी बाहेर पडण्याबाबत वक्तव्य केले होते.

## निवडणूक रोखे हा एक प्रयोग: होसबाळे!

सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर स्टेट बँकेने विकलेल्या निवडणूक रोख्यांचा तपशील निवडणूक आयोगाला दिला आहे. त्यानंतर निवडणूक आयोगाने तो त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला आहे. या तपशीलातून निवडणूक रोख्यांबद्दल महत्त्वाची माहिती समोर येत आहे. यावेळी सहकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे बोलत होते. ते म्हणाले की, समान नागरी कायद्याचे संघाने कायमच स्वागत केले असून, उत्तराखंड राज्यामध्ये तो लागू झालेला आहे. प्रयोग म्हणून त्याकडे पाहायला हवे. त्यानंतर देशभरात हा कायदा कसा लागू करता येईल, यावर विचार करायला हवा, असेही होसबाळे म्हणाले. काशी आणि मथुरा येथील मंदिराचा विषय संघाच्या प्रस्तावात कधीही नव्हता. ही मागणी धर्मसंस्थांची आहे. यासाठी संघाचे काही स्वयंसेवकही काम करत असतील तर आम्हाला आक्षेप नाही. मात्र, प्रत्येकदा रत्यावर उतरून आंदोलन करणेच आवश्यक नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**जनतेचा कौल ४ जूनला स्पष्ट होईल:**

मागील दहा वर्षांत देशाचा जगामध्ये सन्मान वाढला आहे. जगातील २५ अर्थतज्ज्ञ आणि विचारवंतांनी भारत हा भविष्यातील सर्वात शक्तिशाली देश बनेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. त्यामुळे सरकारच्या दहा वर्षांच्या कामगिरीबद्दल बोलण्यापेक्षा देशातील जनता काय विचार करते, हे ४ जूनच्या निकालातून दिसून येईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

## विरोधकांच्या उमेदवाराने विचार करून उभे राहावे!

मागील वेळी आम्हाला सहा लाख ३१ हजार मते मिळाली होती. विरोधक इलेक्ट्रोल बाँडमध्ये भ्रष्टाचाराचा आरोप करत असले तरी प्रत्यक्षात इलेक्ट्रोल बाँडचा कोणताही घोटाळा झालेला नाही. सगळेच पैसे चेकने आलेत. त्यामुळे विरोधकांनी किती आरोप केले तरी महाराष्ट्रातील जनतेला मूळ वास्तव माहिती असल्याचं पाटील यांनी स्पष्ट केलं.

भाजपकडून सोलापूर लोकसभेसाठी उमेदवारीची चाचपणी सुरू असून, आत्तापर्यंत तीन उमेदवारांबाबत भाजपकडून विचार करण्यात आला आहे. सोलापूरमध्ये सारं काही आलबेल नसल्याने वेगवेगळ्या उमेदवारांची चाचणी फडणवीस स्वतः करत आहेत का? याबाबत प्रश्न विचारला असता पाटील म्हणाले, महाराष्ट्रामध्ये देवेंद्र फडणवीस हे असे नेते जन्माला आले आहेत, ज्यांनी भल्या भल्या नेत्यांची झोप उडवली आहे. फडणवीस प्रत्येक गोष्ट तावूनसुलाखून घेतात. त्यामुळे अनेकांची झोप उडाली आहे. सोलापूरच्या निवडणुकीला अद्याप खूप अवधी असून, फडणवीस तावूनसुलाखून उमेदवार देतील. बारामतीमधील सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीबाबत बोलताना पाटील म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांना राजकारणात जेवढं लांबचं दिसतं तेवढं कोणालाच दिसत नाही. ते कधीच चुकीचा पत्ता काढत नाहीत, असे सूचक विधान पाटील यांनी केले.

## 'माझ्या तमाम हिंदू बांधवांनो... हे शब्द कुठे गेले?

महाराष्ट्र सदन उभारण्यास विरोध करत आहेत. त्यांच्यासोबत उद्धव ठाकरे मांडीला मांडी लाऊन बसतात, हे दुर्दैव आहे. भाजप हरवणं सोपं नाही. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत ‘एनडीए’ला देशात मोठे यश मिळेल, असा विश्वासही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. गेल्या दोन वर्षात महायुती सरकारने राज्यात अनेक भरीव कामे केली. अनेक क्षेत्रात महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. अनेक रखडलेले विकास प्रकल्प आमच्या सरकारच्या कार्यकाळात राबविले गेले. आमच्या आदीच्या सरकारने ज्या कामांना ब्रेक लावला होता, त्याला आमच्या सरकारने वेग दिला. आगामी लोकसभा निवडणुकात आम्हाला याचा नक्कीच फायदा होईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.

## दादांनी घेतलेली भूमिका महागात पडेल : रोहीत पवार

अजित पवार यांनी भूमिका घेतल्यावर कुटुंब म्हणून आम्हाला वाईट वाटलं होतं. कुटुंब म्हणून आम्ही एक आहोत. पण दादांसह त्यांच्या जवळच्या पवारांनी म्हणजेच काकींनी आणि त्यांच्या दोन मुलांनी वेगळी भूमिका घेतली आहे. मात्र, पवार कुटुंबात 100 पेक्षा जास्त पवार आहेत, असे रोहित पवार म्हणाले.

**'दादां'चे कुटुंब एकटे पडले:**

मला एकटे पाडले जात असल्याच्या अजित पवारांच्या वक्तव्यावर बोलतांना रोहित पवार म्हणाले की,"अजित पवारांना एकटे पाडण्यात आले नसून, त्यांनी घेतलेल्या भुमिकेमुळे त्यांचे कुटुंब एकटे पडले आहे. श्रीनिवास पवार हे अजित पवार यांचे सख्खे भाऊ आहेत. त्यांनी जी भूमिका घेतली ती साहेबांच्या सोबत राहण्याची भूमिका आहे. स्वाभिमानी नागरिकाला विचारल्यास तोही तेच बोलेल. दादांनी घेतलेली भूमिका महागात पडेल, असेही रोहित पवार म्हणाले.



## गांधींचे विधान चूकीचे आणि हास्यास्पद

अशोक चव्हाण म्हणाले, मी कॉंग्रेस सोडणार हे शेवटपर्यंत मी कुणाला सांगितलं नव्हते. कॉंग्रेसच्या कार्यालयातून काम करत होतो. माझी सोनिया गांधींशी भेटही झालेली नाही त्यामुळे राहुल गांधींचं विधान चूकीचं आणि हास्यास्पद आहे.

# आंबेगावच्या पूर्वभागात पाणी टंचाई व चाराटंचाई

## ओढे ,नाल्यांचे, बंधाऱ्यांचे पाणी आटल्यामूळे दुष्काळ हटणार की नाही?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगावच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, मांदळेवाडी, धामणी, पदाडधरा या परिसरातील ओढे, नाल्यांचे, बंधार्यांचे पाणी आटल्यामूळे विहिरी व विंधन विहिरींची पाणी पातळी अतिखोलवर गेली तर काही विहिरी व विंधन विहिरी कोरड्या ठणठणीत पडल्याने पिण्याच्या पाण्याबरोबच जनावरांच्या चाऱ्यांचा प्रश्न निर्माण झाल्याने या परिसरातील शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. पाचवीला पूजलेला हा दुष्काळ कधी हटणार की नाही असा उद्विग्न सवाल येथील शेतकरी ग्रामस्थ करतात. यंदा या भागात खरीपात पावसाने मोठा दगा दिल्याने बाजरी आणि दोन पैसे मिळवून देणारे मूगाचे पिक हाताला आलेच नाही. त्यामुळे धान्याबरोबर पैशांची चणचण सुद्धा जाणवू लागल्याचे शेतकरी सांगतात. तर रब्बी मध्ये या भागात पावसाने चांगली हजेरी लावल्याने ज्वारी, कांदा व इतर पिके जोमात आली पण नोव्हेंबर २०२३ च्या महिन्यात अवकाळी वादळी वाऱ्यासह पावसाने लावलेल्या जोरदार हजेरीमूळे हातातोंडाशी आलेल्या कांदा पिकाचे होत्याचे नव्हते झाले. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असतानाच आता चारा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिल्याने शेतकऱ्यांना कपळावर हात मारण्याची वेळ आली आहे. या भागात शेतीला जोड व्यवसाय म्हणून मोठ्या प्रमाणात दुग्धव्यवसाय केला जातो. पण सध्या मोठ्या प्रमाणात चारा टंचाई निर्माण झाली. त्याचबरोबर जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही निर्माण झाल्याने शेतकरी हताश झाल्याचे दिसते.

**मांदळेवाडी (ता.आंबेगाव ) येथील कोरडा ठणठणीत पडलेला बंधारा.**



# शालेय प्रश्न मंजुषा स्पर्धेत मुलींचा संघ प्रथम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी:** खडकी-पिंपळगाव (ता. आंबेगाव) येथील काळ भैरवनाथ सौ. लक्ष्मीबाई बाबुराव बांगर विद्यालयात आयोजित शालेय प्रश्न मंजुषा स्पर्धेत मुलींचा संघ प्रथम आल्याची माहिती मुख्याध्यापक सुनिल वळसे यांनी दिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मंचर (ता. आंबेगाव) येथील डॉ.मुमताज अहमद खान शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड. प्रशिक्षणार्थिंचा छात्र सेवाकाल गट यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचेही सुनिल वळसे यांनी सांगितले. या प्रश्न मंजुषा स्पर्धेत शाळेतील एकूण सहा संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी वैज्ञानिक,गणितीय,ऐतिहासिक, भौगोलिक,सामान्य ज्ञान तसेच व्याकरणावर आधारित प्रश्न विचारण्यात आले.या स्पर्धेत सहभागी संघांनी विचारल्या गेलेल्या प्रश्नांना उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन उपस्थितांची मने जिंकली.या स्पर्धेसाठी विशिष्ट नियमावली तयार करण्यात आली.या नियमावली नुसार प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात येऊन सहभागी संघांना प्रश्न विचारण्यात आले. त्यानुसार विजेत्या गटाची निवड करण्यात आली. प्रश्न मंजुषा स्पर्धेतील विजयी संघात समिक्षा भगत, कशिश ईनामदार,युक्ती वाबळे,गौरी भोर व तेजल शेंगाळ या विद्यार्थिनी सहभागी होत्या.प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन व नियोजन श्वेता धुमाळ, निकिता काळे, सोनाली ढोबळे, प्रतिक्षा सोनवणे, रेश्मा बिबवे, सरिता शिंदे, कनिज ईनामदार, गीतांजली पिंगळे, निलम लोहकरे, मनिषा लामखडे व अमित फलके या बी. एड. प्रशिक्षणार्थिंनी केले. या प्रशिक्षणार्थिंना मुख्याध्यापक सुनिल वळसे आणि गट प्रमुख प्रा.अनंत बोरकर यांनी मार्गदर्शन केले. शाळेत प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल खडकी (पिंपळगाव) येथील ग्रामस्थांनी बी. एड. प्रशिक्षणार्थिंचे कौतुक केले आहे.




**जिनिअस : खडकी-पिंपळगाव (ता.आंबेगाव ) येथील विद्यालयात प्रश्न मंजूषा स्पर्धेत मुलींचा संघ प्रथम आला.**

# करंदीत शेतातील पाण्याच्या वादातून महिलेला मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर:** करंदी ता. शिरुर येथे कैलास साकोरे व सुनील साकोरे या भावांची एकत्रित शेती व विहीर असून कैलास हे त्यांची पत्नी सुरेखासह शेतातील पिकांना पाणी देत असताना सुनील हे त्यांच्या पत्नीसह व मुलासह शेतात आले, दरम्यान सुनील यांची पत्नी जयश्री यांनी विहिरीवरील मोटार बंद केली. त्यामुळे सुरेखा यांनी जाब विचारला असता आम्ही पाईपलाईन केली असल्याचे म्हटल्याने त्यांच्यात किरकोळ वाद झाले. यावेळी जयश्री हिने विहिरीजवळ पडलेला लोखंडी पहार घेऊन सुरेखाला मारहाण केली, सुरेखा यांचे पती मध्ये आले असता सुनील साकोरे व ऋतिक साकोरे यांनी त्यांना दमदाटी केली. याबाबत सुरेखा कैलास साकोरे वय ४५ ववर्षे रा. साकोरेवस्ती करंदी ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी जयश्री सुनील साकोरे, सुनील नाथू साकोरे, ऋतिक सुनील साकोरे सर्व रा. करंदी ता. शिरुर जि. पुणे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, पोलीस हवालदार प्रशांत गायकवाड हे करत आहे.

## युवतीचा विनयभंग

**शिक्रापूर :** शिरुर शहरातील महाविद्यालयीन युवतीची ओळख सोशल मिडीयाच्या माध्यमातून अक्षय राऊत या युवकासोबत झालेली असताना अक्षयने युवतीशी ओळख वाढवून युवतीला वारंवार भेटण्याबाबत आग्रह करुन युवतीला शहरातील बाबुरावनगर येथील हेकसाकॉन कॅफे मध्ये भेटायला बोलावून युवतीचा हात पकडून युवतीचा विनयभंग केला. घडलेल्या प्रकाराबाबत युवतीने शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

## शेजारील घरांना कुलूप लावून दरोडा, महिलेचा पती गंभीर जखमी

# आरणगावात दरोडेखोरांच्या हल्ल्यात महिला जागीच ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर:** (शिक्रापूर प्रतिनिधी) आरणगाव ता. शिरुर येथील ठोंबरेवस्ती येथे पहाटेच्या सुमारास अज्ञात दरोडेखोरांनी शेजारील घराला कुलूप लावून दांपत्य झोपलेल्या घरात जाऊन दोघांना गंभीर मारहाण करत साडेसात तोळे सोन्याचे दागिने लांबवले असून सदर दरोडेखोरांच्या हल्ल्यात फुलाबाई आनंदा ठोंबरे हि महिला जागीच महिला ठार होईन आनंदा सावळेराम ठोंबरे हे गंभीर जखमी झाले आहे.

आरणगाव ता. शिरुर येथील ठोंबरेवस्ती येथे राहणारे बाबा ठोंबरे यांचे कुटुंब रात्रीच्या सुमारास जेवण करुन झोपलेले असताना पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास बाबा यांचे आई वडील झोपलेल्या खोलीत काहीतरी हालचाल सुरु असल्याची बाबा यांना जाणवल्याने त्यांनी शेजारील गोविंद माने यांना फोन करुन घरी बोलावले. काही वेळात माने सदर ठिकाणी आले असता बाबा ठोंबरे यांच्या खोलीला बाहेरुन कुलूप लावल्याचे दिसले तर बाबा यांची मुले झोपलेल्या खोलीला देखील बाहेरुन कड्या होत्या. यावेळी बाबा यांच्या मुलांनी बाबा यांच्या खोलीला लावलेले कुलूप तोडले त्यांनतर बाबा यांचे आई वडील झोपलेल्या खोलीची पाहणी केली असता त्यांच्या खोलीचा दरवाजा उघडा होता. त्यामुळे आतमध्ये जाऊन पाहणी केली असता फुलाबाई ठोंबरे व आनंदा ठोंबरे हे दोघे रक्ताच्या थारोळ्यात पडल्याने दिसून आले. त्यामुळे बाबा ठोंबरे यांनी याबाबतची माहिती पोलीस पाटील संतोष लेंडे यांना दिल्यानंतर काही वेळात शिक्रापूरचे पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आजिनाथ शिंदे, पोलीस हवालदार किशोर तेलंग, अमोल दांडगे, संदीप कारंडे, लहानू बांगर, आत्माराम तळोले, रोहिदास पारखे, विकास पाटील, पोलीस शिपाई लखन शिरसकर, जयराज देवकर, पोलीस पाटील संतोष लेंडे यांसह आदींनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता फुलाबाई आनंदा ठोंबरे वय ६५ वर्षे रा. ठोंबरेवस्ती आरणगाव ता. शिरुर जि. पुणे या महिलेचा जागीच मृत्यू झाल्याचे तर आनंदा सावळेराम ठोंबरे वय ७० वर्षे रा. ठोंबरेवस्ती आरणगाव ता. शिरुर जि. पुणे हे गंभीर जखमी झाल्याचे दिसून आले, दरम्यान पाहणी केली असता घरातील सर्व साहित्य अस्ताव्यस्त पडल्याचे तसेच दरोडेखोरांनी दाम्पत्याला जबर मारहाण करुन घरातील तब्बल साडेसात तोळे वजनाचे सोन्याचे दागिने लांबवल्याचे समोर आले. घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांनी देखील घटनास्थळी भेट दिली. श्वान पथकाला देखील येथे पाचारण करण्यात आले मात्र दरोडेखोरांचा काही थांगपत्ता लागला नाही, याबाबत बाबा आनंदा ठोंबरे वय ४७ वर्षे रा. ठोंबरेवस्ती आरणगाव ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात दरोडेखोरांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश पवार व पोलीस नाईक अमोल नलगे हे करत आहे.

पान १ वरून

## रशियात पुन्हा पुतिनराज!

त्यानंतर लागलेल्या निकालात पुतिन यांनी ८८ टक्के मतं मिळवत विजय मिळवला. पुतिन यांचे कट्टर विरोधक अॅलेक्सी नवलनी यांचा गेल्या महिन्यात आर्क्टिक तुरुंगात मृत्यू झाला. त्यांचे इतर टीकाकार तुरुंगात आहेत. ७१ वर्षीय पुतिन यांच्या विरोधात तीन प्रतिस्पर्ध्यांनी निवडणूक लढवली, ज्यांना क्रेमलिनचे जवळचे मानले जाते. तिघांनीही त्यांच्या २४ वर्षांच्या राजवटीवर किंवा दोन वर्षांपूर्वी युक्रेनविरुद्ध विशेष लष्करी कारवाई सुरू करण्याच्या निर्णयावर टीका करणं टाळलं होतं. आता पुतिन पुन्हा एकदा रशियाचे राष्ट्राध्यक्ष म्हणून विराजमान होणार आहेत.

## ...तर मोबाइल नंबर पोर्ट होणार नाहीत!

यानंतर, वापरकर्त्याकडे असलेले सिम बंद होते आणि ठग दुसरे सिम काढून घेतात आणि येथून गेम सुरू होतो. फसवणूक करणारे ते डुप्लिकेट सिम त्यांच्या उपकरणांमध्ये वापरतात. फसवणूक करणारे वापरकर्त्याच्या नंबरवर येणारे कॉल, मेसेज आणि ओटीपी मिळवतात. येथून, बँकिंग फसवणूक करण्याबरोबरच, फसवणूक करणारे अनेक प्रकारची वैयक्तिक माहिती मिळवतात.

**Public Notice**

By this Public Notice, I, the undersigned give the following information to public at large,

That on 11/03/2024 at about 18.30 hrs. my client, Mrs. Sagunabai Baburao Murkute, the owner of Flat in Building No. C-5, Unit 205 and the Parking for Cluster 1, CP-625 (Project: Skyi Star City Dhayari, Pune) has lost the documents like, original Letter of Possession and Letter of Parking Allotment, duly issued to her by M/s Skyi Property Ventures LLP, formerly known as Life Maxima, on December 22nd, 2022 in respect of her said property, in the area of Baner, Pune and she has filed Lost Report No. 37584-2024 in Sinhgad Police Station, Pune in respect of said loss. In the above circumstances, the public at large is requested with information to hand over the above said original documents to my client, if found.


**Adv. Chaitali Mahadev Pardeshi**
**Notary Govt. of India**
170 old bazar, Khadki, Pune -411003,
Mobile. : 9890099759

**इंदुमती देशमुख यांचे निधन** ( शिक्रापूर प्रतिनिधी ) इंदुमती काशिनाथ देशमुख वय ९० वर्षे यांचे नुकतेच वृध्दोपकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, चार मुली, सुना नातवंडे असा परिवार असून निमगाव म्हाळुंगी येथिल विद्या विकास मंदिरचे प्रा. संजय देशमुख कोतुळ ता. अकोले येथील प्रगतशील शेतकरी बाळासाहेब देशमुख व यांच्या त्या आई होत.

## मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांचे प्रतिपादन...

# मराठी भाषा संवर्धनाचे काम लेखकांमुळेच!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



बापूसाहेब काळभोर लिखित 'बापु'ज डायरी ... आठवणीतील चार गोष्टी' या पुस्तकाचे प्रकाशन

**उरुळी कांचन :** मराठी भाषा संवर्धनाचे काम बापू काळभोर यांच्यासारख्या संवेदनशील लेखकांमुळेच होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता कक्ष प्रमुख तथा मुख्यमंत्री कार्यालय विशेष कार्याधिकारी मंगेश चिवटे यांनी केले. 'बापु'ज डायरी' आठवणीतील चार गोष्टी या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते.

चिवटे म्हणाले की, प्रत्येक जण मनाने कधी ना कधी तुटलेला असतो. कुठलाही रंगीत खडू जेव्हा तुटलेला असतो, तेव्हा त्या खडूचा रंग देखील तसाच असतो. 'बापु'ज डायरी' या पुस्तकातील आत्महत्यांच्या विषयीचा लेख वाचला, तर ज्याच्या कुणाच्या मनात आत्महत्येचा विचार आलेला आहे. तो नक्कीच आत्महत्येपासून परावृत्त होईल. एवढ्या ताकदीचा हा लेख बापू यांनी लिहिला आहे.

तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढले आहे. त्याची सुरुवात शाळकरी वयामध्ये होते. मुले एनर्जी ड्रिंक पितात आणि मग हळूहळू व्यसनाधीनतेकडे जातात. एका जागतिक अहवालानुसार सन २०५० पर्यंत जगातल्या एकूण लोकसंख्येपैकी ५०% म्हणजे निम्म्या लोकांना कॅन्सर होईल. त्यामुळे तरुणांनी व्यसनांपासून दूर रहावे, असे आवाहन चिवटे यांनी केले. प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघाचे पुणे जिल्हाध्यक्ष राजेंद्र (बापु) काळभोर यांनी लिहिलेल्या 'बापु'ज डायरी-आठवणीतल्या चार गोष्टी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा थेऊर फाटा येथील हॉटेल एस फोर जी या ठिकाणी नुकताच पार पडला. पुणे शहर पोलीस दलातील अपर पोलीस आयुक्त प्रवीण पाटील, बी. एल. स्वामी, प्रिंट व डिजीटल मीडिया पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जगताप, जनार्दन दांडगे, तालुकाध्यक्ष संदीप बोडके, सातार्‍याचे जिल्हाध्यक्ष सचिन मोरे, आरोग्यदूत युवराज काकडे, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार आदी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना बी. एल. स्वामी म्हणाले की, राजकारणाच्या आखाड्यात सर्वसामान्यांचे प्रश्न कुठेतरी हरवले आहेत. त्याचा विचार करून 'बापू'ज डायरीमध्ये प्रत्येक गोष्ट बारकाईने मांडली आहे. पुस्तक वाचल्यानंतर हे विचार हे बापू काळभोर यांचे आहेत की मोठ्या बापूंचे आहेत, असा प्रश्न पडतो. 'बापु'ज डायरी'तील बरेच विषय शालेय पाठ्यपुस्तकात येण्यासारखे आहेत.

अपर पोलीस आयुक्त प्रवीण पाटील म्हणाले की, पत्रकारितेच्या पलीकडे सुद्धा दुसरे जग आहे, याची जाणीव झाल्यानंतर बापूंनी अनेक विषयांवर लिहायला सुरुवात केली. त्यांच्या लेखणीतून त्यांची संवेदनशीलता व तळमळ दिसून येते. 'बापु'ज डायरी' या पुस्तकामध्ये बापू यांनी केवळ समाजातील गंभीर विषय मांडले नाहीत, तर त्यावर उपाय सुद्धा सांगितले आहेत. त्यामुळे त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

दरम्यान, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील जगताप यांनी व सूत्रसंचालन शाहीर महेश खुळपे यांनी केले. उपस्थितांचे आभार अमोल अडागळे यांनी मानले.

## » Selected



**तारे जमीन पे!** खोर , चौधरीवाडी (ता. दौंड) येथील जि. प. प्राथमिक शाळेत बालआनंद मेळावा साजरा करताना.

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बालआनंद मेळावा उत्साहात साजरा

**दौंड :** दौंड तालुक्यातील खोर गावच्या हद्दीतील चौधरीवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बालआनंद मेळावा नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या व्यवहारिक ज्ञानात भर पडावी , खरेदी विक्री याविषयी माहिती मिळावी यासाठी शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन यांनी या मेळाव्याचे आयोजन केले होते.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली . यावेळी भाजीबाजार, खाऊगल्ली, फनीगेम्स, किराणा व स्टेशनरी दुकान असे विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद व पालकांनी परिश्रम घेतले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र चौधरी, ज्ञानदेव चौधरी, सुनंदा चौधरी, रामदास चौधरी, बाळकृष्ण चौधरी यांच्यासह आदी ग्रामस्थ आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कुत्र्याला वाचवताना झालेल्या अपघातात कारचालकाचा मृत्यू

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील पुणे नगर महामार्गालगत साई सहारा पेट्रोलपंप समोर कारला कुत्रे आडवे आल्याने कुत्र्याला वाचवताना कार रस्त्याच्या कडेला जाऊन झाडावर आदळून झालेल्या अपघातात प्रितेश प्रेमचंद संचेती या कार चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील पुणे नगर महामार्गावरून प्रितेश संचेती व बीडचे नगर सेवक अमोल नाईकवाडे हे दोघे त्यांच्या ताब्यातील दोन वेगवेगळ्या कार मधून पुणे बाजूने अहमदनगरच्या दिशेने चाललेले असताना शिक्रापूर नजीक साई सहारा पेट्रोलपंप समोर प्रितेश संचेती यांच्या कारला अचानक कुत्रा आडवा आल्याने संचेती कुत्र्याला वाचवण्यासाठी कार बाजूला घेत असताना संचेती यांची एम एच २३ ए डी ४५६४ हि कार रस्त्याचे कडेला असेलल्या झाडावर जोरात आदळली यावेळी कारचालक प्रितेश संचेतीसह कार मधील अन्य इसम जखमी झाले असून या अपघातात प्रितेश प्रेमचंद संचेती वय ३७ वर्षे रा. विप्रनगर ता. बीड जि. बीड याचा जागीच मृत्यू झाला, तर नीरज मदनलाल अग्रवाल वय ३६ वर्षे रा. विप्रनगर ता. बीड जि. बीड व मयूर प्रशांत लांडे वय १६ वर्षे रा. राजीव गांधी चौक ता. बीड जि. बीड हे दोघे जखमी झाले असून याबाबत बीडचे नगरसेवक अमोल मारुतीराव नाईकवाडे वय ४३ वर्षे रा. विप्रनगर ता. बीड जि. बीड यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक बापू हाडगळे हे करत आहे.

## महापालिका गठीत समितीत वाघोलीतून शांताराम कटके,संदीप सातव...

# कटके यांचा प्रदीप कंद यांच्या हस्ते सत्कार!



शांताराम कटके व संदीप सातव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



शांताराम कटके यांचा सत्कार करताना प्रदीप कंद,सह मान्यवर.

**वाघोली :** पुणे महानगरपालिका हद्दीतील नव्याने समाविष्ट ३४ गावांच्या मूलभूत सोयी सुविधासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून समितीमध्ये यापूर्वी वाघोलीचे भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष संदीप सातव यांचा समावेश करण्यात असतानाच वाघोलीचे माजी उपसरपंच तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे शांताराम कटके यांचाही समावेश करण्यात आला आहे.३४ गावांमध्ये सर्वाधिक नागरीकरण झालेल्या वाघोलीतून समितीत दोघांची निवड झाली असल्याने समितीच्या माध्यमातून वाघोलीला सर्वाधिक मुलभूत सोयीसुविधा मिळण्यासाठी मदत होणार आहे.

वाघोली येथून समितीत निवड झाल्याबद्दल शांताराम कटके व संदीप सातव यांचे अभिनंदन जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा पडीसीसी बँकेचे संचालक प्रदीप कंद यांनी केले.तर भाजपच्या वतीने कंद यांच्या हस्ते शांताराम कटके यांचा सत्कार पार पडला. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस(अजित पवार गट) चे हवेली तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ आव्हाळे,आदी पदाधिकारी,मान्यवर उपस्थित होते.

# कासारीत कोयत्याच्या धाकाने महिलेचा विनयभंग

## तत्परतेने महिलेच्या कुटुंबाला आधार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कासारी ता. शिरूर येथील महिला रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घरासमोर भांडी घासत असताना संतोष लष्कर हातात कोयता घेऊन महिलेच्या समोर आला. त्याने महिलेला कोयत्याचा धाक दाखवत महिलेचा हात पकडून महिलेच्या मनास लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले. दरम्यान त्याने शिवीगाळ करत महिलेचे पती व मुले कोठे आहे, त्यांना जिवंत सोडत नाही अशी धमकी दिली. त्यामुळे भयभीत झाल्याने महिलेने घरात जाऊन पती व मुलांसह घरात थांबून कडी लावून घेतली. त्यावेळी संतोष याने पुन्हा शिवीगाळ करत दरवाजावर मारहाण केली. त्यामुळे महिलेने पोलीस मदत साठी ११२ क्रमांकावर फोन केल्याने पोलीस शिपाई अविनाश पठारे यांनी तातडीने सदर ठिकाणी धाव घेत महिलेच्या कुटुंबाला संरक्षण दिले, दरम्यान संतोष लष्करे तेथून पळून गेलेला होता. याबाबत पिडीत महिलेने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने शिक्रापूर पोलिसांनी संतोष महादू लष्कर रा. कासारी ता. शिरुर जि. पुणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहे.

# होमगार्ड क्रिकेट संघ विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड तालुका पत्रकार संघ आयोजित क्रिकेट**

**महाळुंगे :** खेड तालुका पत्रकार संघाने आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेतील अंतिमचा सामना होमगार्ड क्रिकेट संघ व राजगुरूनगर पोलीस यांच्यात झाला. चूरशीने झालेल्या सामन्यात होमगार्ड संघ विजेता ठरला. तर पोलीस क्रिकेट संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेशी चांगला सलोखा निर्माण व्हावा या हेतूने पत्रकार संघाने तिन्हेवाडी येथील शहीद हुतात्मा राजगुरू क्रीडा संकुल मैदानावर आयोजित क्रिकेट स्पर्धत आठ संघांनी भाग घेतला होता. यामध्ये महसूल विभाग, राजगुरूनगर पोलीस, पत्रकार संघ, पंचायत समिती, नगरपरिषद, ठेकेदार संघ, होमगार्ड संघ, शिक्षक विभाग अशा आठ संघांनी स्पर्धेत सहभाग होता. चुरशीच्या अंतिम सामन्यात होमगार्ड संघाने पोलीस संघावर अवघ्या सात धावांनी मात केली. विजेत्या चार संघाना चषक देऊन गौरविण्यात आले. क्रिकेटचे सामने पाहण्यासाठी क्रिकेट शौकीनांनी गर्दी केली होती.

क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन तहसीलदार प्रशांत बेडसे,नायब तहसीलदार मदन जोगदंड,गटविकास अधिकारी विशाल शिंदे, गटशिक्षण अधिकारी अमोल जंगले, बांधकाम विभाग अभियंता संजय मुरकुटे व पत्रकार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. सामने सुरु असताना आमदार दिलीप मोहिते, जिल्हा दूध संघाचे संचालक अरुण चांभारे आदींनी उपस्थिती दर्शविली. प्रांताधिकारी जोगेंद्र कट्यारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी शुभेच्छा दिल्या. क्रिकेट स्पर्धेत बेस्ट फलंदाज सुनील घनवट तर बेस्ट गोलंदाज म्हणून राहुल गारगोटे यांना गौरविण्यात आले. क्रिकेटचे आयोजन पत्रकार संघाने केले. अध्यक्ष सुनील थिगळे, माजी अध्यक्ष दत्ता भालेराव, राजेंद्र लोथे, महेंद्र शिंदे, संदीप मिरजे, बाळासाहेब सांडभोर, संजय शेटे, नाजीम इनामदार, विद्याधर साळवे, रोहिदास होले, रामचंद्र सोनवणे, निलेश आंधळे, किरण खुडे, इसाक मुलाणी आदींनी स्पर्धा यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.



# म्हाळगी विद्यालयातील विद्यार्थ्यांना सायकल वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** कॅनरा रोबेको मॅच्युअल फंड संस्थेच्या वतीने कडूस (ता. खेड ) येथील रामभाऊ म्हाळगी माध्यमिक विद्यालयातील ५० गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप करण्यात आले. या विद्यालयात आजूबाजूच्या सुमारे पाच किलोमीटर परिसरातील वाड्या व त्यातील विद्यार्थी शिक्षणासाठी येत असतात. यातील बहुतांश विद्यार्थी आदिवासी ठाकर समाजातील आहेत दूर अंतरावरून पायी येणाऱ्या गरीब गरजू विद्यार्थ्यांची ही अडचण ओळखून कॅनरा रोबेको म्युचल फंड कंपनीने या विद्यार्थ्यांना मोफत सायकलचे वाटप केले. याप्रसंगी आमदार दिलीप मोहिते, संस्थेचे अध्यक्ष अशोक गारगोटे, सचिव किसन गारगोटे, संचालक प्रकाश कालेकर व संजय जाधव पालक संघाचे अध्यक्ष चांगदेव ढमाले, उपाध्यक्ष विजय बोंबले, आभा उद्योग समूहाचे अभिनाथ शेंडे, ग्रामपंचायत सदस्य गणेश मंडलिक, कंट्री हेड कॅनरा बँक म्युच्युअल गौरव वीरमणी, सहाय्यक क्षेत्रीय विपण अधिकारी सचिन मथुरे, ऑल्विन फायनान्स डायरेक्टर अंकुर गांधी, हनुमंत मुसळे, प्राचार्य अनिल पोटे व विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

प्रास्ताविक मुख्याध्यापक अनिल पोटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण काळे यांनी केले तर आभार रामदास रेटवडे यांनी मानले.




## खेडच्या सतारकावस्ती शाळेत आर्थिक व्यवहार ज्ञानातून

# विद्यार्थ्यांकडून एक लाखाची उलाढाल!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील आदर्श शाळा रेटवडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सतारकावस्ती येथे मुलांचे आर्थिक साक्षरता व व्यावहारिक ज्ञान कौशल्य वाढण्यासाठी शाळेत खाऊ गल्ली, भाजी बाजार व फनी गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २५० स्टॉल लावले होते व त्यातून एक लाखापर्यंत उलाढाल झाली, अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक सोपान मांजरे यांनी दिली.

दैनंदिन बाजार व शालेय मुले यांचा संबंध दूरच. परंतु या उपक्रमामुळे मुलांना प्रत्यक्षात बाजार भरून हा अनुभव आला. मुलांना आर्थिक व्यवहार ज्ञान प्रत्यक्षात अनुभवायला मिळाले. यावेळी ५२५ मुला-मुलींनी विविध प्रकारचा भाजीपाला, फळे, भेळ, वडापाव, इडली, डोसा, मिसळपाव, पाणीपुरी, आईस्क्रीम, पावभाजी आदी स्टॉल दुकाने शाळेच्या आवारात थाटली होती. पंचक्रोशीतील ग्रामस्थ व पालकांनी भरघोस खरेदी करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय हिंगे, उपाध्यक्ष योगेश्वरी पवार, सुनील वाबळे, विलास पवार, निलेश पवार, विशाल टिजगे, गणेश पाटोळे, राजू हिंगे, साहेबराव पवळे, दीपाली पवार, आरती टिजगे, स्वप्ना पवार उपस्थित होते. शिक्षक मुगुटराव मोरे, पांडुरंग देवडे, बाळासाहेब जाधव, स्मिता भालेराव, नंदकुमार वाघमारे, प्रणोती गावडे, अनिता वाळुंज, सुवर्णा गाडीलकर गणेश चक्कर, प्राजक्ता नेटके, शिल्पा शेलार, छाया पवार, अस्मिता वाकचौरे, सुप्रिया गायकवाड, नेहा पवळे या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

#रा

# पाण्याचा गैरवापर टाळा, महापालिकेचे आवाहन!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पिंपरी :** उन्हाळा सुरु झालेला आहे. येणारा पावसाळा जून मध्ये सुरु होईल यांची शाश्वती नाही. पावसाळा हा विलंबाने सुरु झाल्यास पाण्याची टंचाई शहरात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे पाणी आतापासून सर्व नागरिकांनी काटकसरीने व जपून वापरणे अत्यावश्यक आहे. यासाठी पिण्याचे पाण्याचा गैरवापर टाळणे, पाण्याची उधळपट्टी थांबविण्याचे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

पिण्याचे पाणी हे घरगुती वापरासाठी योग्यरित्या व काटकसरीने वापरावे. पाणी हे शिळे होत नसल्याने शिल्लक असलेले पाणी फेकून देऊ नये, त्याचा वापर करावा तसेच, पिण्याचे पाणी हे वाहने स्वच्छ करणे, बागकाम व कुंड्यासाठी, घर / इमारत व परिसर स्वच्छ करणेसाठी, धुण्यासाठी वापर करु नये. तसेच, सर्व सोसायटी धारकांनी एस.टी.पी. व बोअरवेल सुस्थितीत ठेवून त्याचे पाणी सदनिकांनामध्ये स्वच्छतागृह, सोसायटी अंतर्गत उद्यान परिसराची स्वच्छता इत्यादीसाठी वापरावे. जेणेकरुन पिण्याचे पाण्याची बचत होईल.

पिण्याचे पाण्याचा गैरवापर आढळल्यास म्हणजे गाड्या धुणे, रस्ते धुणे, घर, सोसायटी परिसर पुणे यासाठी करत असल्याचे निदर्शनास आलेस सदर ग्राहकांना गैरवापर होत असलेबाबत प्रथमतः नोटीस बजाविणेत येईल. पुन्हा दुस-यांदा असा पिण्याचे पाण्याचा गैरवापर करताना आढळल्यास कोणतीही सबब, ऐकूण घेतली जाणार नाही व तात्काळ नळजोड तोडण्यात येईल.

पाणी हे जीवन आहे. पाण्याचा वापर काटकसरीने करावा. ते जपून वापरावे म्हणजे पाण्याची बचत होईल.

येणा-या पावसाळ्यापर्यंत म्हणजे जून व जुलै पर्यंत पाणी सर्वांना पुरेसे उपलब्ध होऊ शकेल व पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही व यंदाचा उन्हाळा सर्वांना सुसह्य जाईल.

**पाण्याची बचत याप्रमाणे करा**

- पिण्याचे पाणी वाहने स्वच्छतेकरिता वापरु नका. अंगण / जिने / फरशी धुणे टाळा स्वच्छते करिता
- कमीत कमी पाण्याचा वापर करा.
- घरातील गळणारे नळ तत्काळ दुरुस्त करुन घ्या.
- घरासमोरील रस्त्यावर पाणी मारु नका / रस्ते धुवू नका.
- कुंड्यातील झाडे / बागकामासाठी पिण्याचे पाण्याचा वापर करु नका.

## अष्टविनायक दर्शन सेवेतून पिंपरी चिंचवड आगाराला पाच लाखाहून अधिक उत्पन्न!

पिंपरी - अष्टविनायक दर्शन सेवा एसटी महामंडळाकडून सुरू करण्यात आली आहे. या सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षभरात पिंपरी चिंचवड आगाराला अष्टविनायक दर्शन सेवेतून पाच लाख 34 हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. तर पुणे विभागाला 42 लाख 22 हजारांचे उत्पन्न मिळाले आहे.अष्टविनायकांमधील सहा मंदिरे पुणे जिल्ह्यात आहेत तर दोन मंदिरे रायगड जिल्ह्यात आहेत. दोन दिवसांमध्ये अष्टविनायक यात्रा संपन्न होते. त्यामुळे पर्यटन, देवदर्शन, नवस अशा विविध कारणांसाठी भाविक अष्टविनायकाची यात्रा करतात. दररोज अष्टविनायक मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी असते. भाविकांची मागणी लक्षात घेत एसटी महामंडळाकडून अष्टविनायक यात्रा बसचे नियोजन करण्यात आले आहे.मागील वर्षभरात सुमारे 436 अष्टविनायक दर्शन यात्रा विशेष बस सोडण्यात आल्या आहेत. राजगुरुनगर, नारायणगाव, शिरूर, पिंपरी चिंचवड, सासवड, बारामती शहर व एमआयडीसी आगारातून अष्टविनायक दर्शन यात्रा विशेष बस सोडण्यात येतात. राजगुरूनगर आगारातून सर्वाधिक 9 लाख 62 हजार रुपये उत्पन्न मिळाले आहे.सासवड आगाराला 8 लाख 34 हजार 265, बारामती एमआयडीसी आगाराला 8 लाख 14 हजार 59 रुपये, बारामती शहर आगाराला 6 लाख 79 हजार 388 रुपये, पिंपरी चिंचवड आगाराला 5 लाख 34 हजार 186 रुपये, नारायणगाव आगाराला 3 लाख 73 हजार 370 रुपये आणि शिरूर आगाराला 24 हजार 420 रुपये उत्पन्न मिळाले आहे.पिंपरी चिंचवड आगार प्रमुख संजय वाळवे म्हणाले, "प्रत्येक महिन्यातील चतुर्थीच्या आदल्या दिवशी वल्लभनगर आगारातून अष्टविनायक यात्रा जादा बस सोडली जाते.

## थेरगावात ६० खाटांचे कर्करोग रुग्णालय!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिका सार्वजनिक-खासगी भागीदारीतून थेरगावात ६० खाटांचे कर्करोग रुग्णालय उभारणार आहे. रुग्णालयाच्या बांधकामाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. शहरातील वाढत्या लोकसंख्येनुसार आरोग्यसेवेच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी भविष्यात १०० खाटांपर्यंत कर्करोग रुग्णालयाचा विस्तार करण्यात येणार आहे. ३४ हजार ८४८ चौरस फुटांमध्ये रुग्णालय उभारण्यात येणार आहे. केमोथेरपी, रेडिएशन थेरपी आणि शस्त्रक्रिया यांसारख्या सामान्य कर्करोगाच्या उपचारांव्यतिरिक्त रुग्णालय समुपदेशन आणि पुनर्वसन यांसारख्या सहायक सेवाही या रुग्णालयात पुरविण्यात येणार आहेत. रुग्णालयात फुफ्फुस, कोलोरेक्टल, प्रोस्टेट आणि गर्भाशय मुखाच्या कर्करोगासह विविध प्रकारच्या उपचाराच्या सुविधा असणार आहेत. महात्मा जोतिबा जन आरोग्य योजना, केंद्र सरकारची आरोग्य योजना लागू असणार आहे.

## » Selected

## शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्यास अटक



**सांगवी :** शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पडून आर्थिक परताव्याचे आमिष दाखवत फसवणूक करणाऱ्या दोघांना पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या सायबर सेलने अटक केली. विकास नेमीनाथ चव्हाण (वय ४३, रा. गणेश नगर, नवी सांगवी), प्रदीप कृष्णा लाड (वय ३२, रा. पिंपळे गुरव, सांगवी) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाकड येथील एक महिला फेसबुकवर पोस्ट बघत असताना तिला आयबीकेआर क्रेसेट अकादमी गोल्डमन सच हा व्हाटसअप ग्रुप दिसला. महिला त्या ग्रुपला जॉईन झाली. तिथे असलेल्या लोकांना रोजच्या रोज गुंतवणुकीवर नफा होत असल्याचे दिसले. त्यामुळे महिलेने आयबीकेआर सेक्युरिटीज या कंपनीत पैसे गुंतवण्यास तयारी दर्शवली. त्यांनतर आरोपींनी महिलेला एक लिंक पाठवून ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. त्यावर महिलेने केलेली गुंतवणूक आणि त्यावर झालेला नफा दिसत होता. मात्र ते पैसे काढता येत नव्हते. आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आल्याने महिलेने याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला. महिलेची १० लाख ६९ हजार ५७५ रुपयांची फसवणूक झाली होती. हा गुन्हा सायबर सेलकडे वर्ग करण्यात आला. सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण करून आरोपींची ओळखत पटवली. त्यांना सांगवी परिसरातून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून दोन मोबाईल फोन जप्त केले आहेत.

## बस थांब्यावर प्रवाशांचे दागिने चोरणाऱ्या दोघांना अटक



**भोसरी :** बस थांब्यावर असलेल्या गर्दीत बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांचे दागिने चोरणाऱ्या दोघांना भोसरी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून चार लाख २२ हजार रुपये किमतीचे ७२ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.मोहन गणेश जाधव (वय ३२, रा. मुंढवा, पुणे. मूळ रा. अंबरनाथ, मुंबई), शिवराज अर्जुन वाडेकर (वय २५, रा. मुंढवा, पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बस प्रवासात तसेच बसमध्ये चढताना प्रवाशांचे दागिने चोरीला जात असल्याच्या काही घटना उघडकीस आल्या आहेत. त्यानुसार त्याबाबत कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. भोसरी पोलीस ठाण्यातील एक पथक पीएमटी चौक, भोसरी येथे गस्त घालत असताना त्यांना दोन संशयित व्यक्ती दिसले.

त्यामुळे पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली. त्यात त्या दोघांनी नाशिक फाटा बस थांबा, पीएमटी बस थांबा भोसरी येथून प्रवाशांचे दागिने चोरल्याचे सांगितले. त्यांच्याकडून चार लाख २२ हजार रुपये किमतीचे ७२ ग्रॅम वजनाचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे भोसरी पोलीस ठाण्यातील चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

## हुक्का पार्लरवर पोलिसांचा छापा...

**लोणावळा :** लोणावळा शहर, तसेच ग्रामीण भागात बेकायदा हुक्का पार्लरवर पोलिसांनी छापा टाकला. पोलिसांच्या पथकाने छापा दरम्यान ९३ हजार ५३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई शनिवारी (दि.१७) मध्यरात्री केली. याप्रकरणी रुस्तम वकील अहमद (वय २०), रोशन मनोज यादव (वय ३०), कृष्णा नाथ राठोड (वय ३१, तिघे रा. लोणावळा), प्रताप कृष्णा डिंबळे (वय ४२ ,रा. कार्ला), बिपीन परमेश्वर महातो (वय ३०, रा. उल्हासनगर, ठाणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणावळा शहरातील हॉटेल युटोपिया, हॉटेल कुमार रिसॉर्ट, तसेच ग्रामीण भागातील हॉटेल बैठक येथे बेकायदा हुक्का पार्लर चालविण्यात येत असल्याची माहिती लोणावळा विभागाचे उपविभागीय अधिकारी सत्यसाई कार्तिक यांना मिळाली. राज्य शासनाने हुक्का पार्लरवर बंदी घातली असून, बंदी आदेश झुगारून बेकायदा हुक्का पार्लर चालविण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर मध्यरात्री पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. त्यावेळी हॉटेलमधील ग्राहकांना हुक्का उपलब्ध करून देत असल्याचे आढळून आले. ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी सत्यसाई कार्तिक यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक शुभम चव्हाण, रोहन पाटील, अंकुश नायकुडे, सचिन गायकवाड, सुभाष शिंदे, अंकुश पवार, गणेश येळवंडे यांनी ही कारवाई केली.

राष्ट्रसंचार | सक्षम ईआरपी

## महापालिकेचे कामकाज पेपरलेस

**पिंपरी :** महापालिकेचा कारभार आता कागदविरहित (पेपरलेस) होणार असून, प्रशासनाने त्या दिशेने पाऊल टाकले आहे. 'जीएसआय सक्षम ईआरपी' प्रणालीचे अनावरण आयुक्त शेखर सिंह यांनी केले. या कार्यप्रणालीनुसार पालिकेच्या विविध ३५ विभागांचे कामकाज ऑनलाइन चालणार आहे. सर्व विभाग ऑनलाइन जोडण्यात येत आहेत. त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांचे श्रम वाचून कामकाजात पारदर्शकता येणार आहे. महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयातील विवाहनोंदणी प्रमाणपत्र, सर्व नाट्यगृहांचे बुकिंग, ग्रंथालये, पशुवैद्यकीय विभागाकडील श्वान परवाने, माहिती अधिकार अर्ज (आरटीआय) आदी विभागांचे कागदविरहित ऑनलाइन कामकाज करण्यात येत आहे. आतापर्यंत नऊ विभागांचे कामकाज ऑनलाइन केले आहे. यापुढे उर्वरित विभागांचे कामकाजदेखील ऑनलाइन करण्यात येणार आहे.'जीएसआय सक्षम ईआरपी' प्रणालीद्वारे नागरी सुविधा, सुरक्षा, ग्रंथालय, क्षेत्रीय कार्यालये, वैद्यकीय विभाग, भांडार विभाग यासह अन्य विभागांचे कामकाज ऑनलाइन होत आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांना विभागातील सर्व माहिती ऑनलाइन उपलब्ध होणार आहे. कामकाज संपूर्णपणे कागदविरहित होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे. सर्व कार्यालये ऑनलाइन झाल्यास कामकाजाच्या नस्ती, कागदपत्रे ऑनलाइन पाहता येतील. त्यामुळे कागदविरहित सर्व नस्तीला देखील मान्यता देता येणार आहे.



## गुणगौरव...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



## महिला दिनानिमित्त "जल्लोष तारकांचा"

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**निगडी :** निगडी येथे महिला दिना निमित्त खास महिलांसाठी "जल्लोष तारकांचा" हा कार्यक्रम सादर झाला. यामध्ये दर्जेदार लावण्या सादर करण्यात आल्या. शिवसेना महिला शहर संघटिका सरिता अरुण साने यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महिलांना मोकळेपणाने आपल्या लोककलेचा आस्वाद घेता यावा म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महिलांनी त्याला प्रचंड प्रतिसाद दिला आणि कार्यक्रमाचा पुरेपूर आस्वाद घेतला. या प्रसंगी खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते महिलांचा सत्कार झाला.

वयाच्या ७५ व्या वर्षी सुरुवात करून ८० व्या वर्षा पर्यंत तब्बल सात वेळा वरिष्ठ गटात मॅरेथॉन जिंकणाऱ्या जयश्री टेमकर मेस चालवून आपल्या घराचा चरितार्थ चालववणार्या आश्विनी बागुल,तोरणा गड ते भक्ती शक्ती अशी दौड समूहाने करून आम्ही जिजाऊ च्या लेकी असे अभिमानाने सांगणाऱ्या माधुरी आव्हाड, आपल्या दोन्ही मुलांना साथीदाराशिवाय समर्थपणे वाढवण्यासाठी काबाडकष्ट करणारी रुक्मिणी, कोणतेही प्रशिक्षण न घेता केवळ चिकाटी आणि मेहनत याच्या बळावर संगणक शिकल्या आणि वाहन चालवणे सुद्धा आशा ताई रेंगे. या सर्व महिलांचा सत्कार खासदार बारणे यांच्या हस्ते झाला. "महिलांनी ठरवले तर त्या कोणतेही आव्हान सहजपणे पार करू शकतात आणि त्यांनी हे अनेकवेळा सिद्ध केले आहे" असे गौरव उद्गार खासगार बारणे यांनी या प्रसंगी काढले. सत्कार समारंभाचे सूत्रसंचालन ज्योती कानेटकर यांनी केले.

## चाकणला कांद्याच्या आवकेत वाढ; दरात घसरण...

# ७ कोटी, ६० लाख रुपयांची उलाढाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये बटाटा, हिरवी मिरची व कोबीचे भाव कडाडले आहेत. कांद्याची आवक वाढल्याने भाव गडगडले. बटाट्याची आवक वाढूनही भावात वाढ झाली. लसणाची आवक घटूनही भावात घट झाली. फळभाज्यांच्या बाजारात कोबी, वाटाणा व गाजराची किरकोळ आवक झाली. पालेभाज्यांच्या बाजारात मेथी, कोथिंबीर, शेपू व पालक भाजीची आवक घटल्याने भाव तेजीत राहिले. जनावरांच्या बाजारात जर्शी गाईची संख्या घटूनही भाव स्थिर राहिले. बैल, म्हैस व शेळ्या - मेंढ्या यांच्या संख्येत वाढ होऊनही भाव स्थिर राहिले. एकूण उलाढाल ७ कोटी, ६० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक २० हजार ५०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ५०० क्विंटलने वाढल्याने भावात १०० रुपयांची घट झाली. कांद्याचा कमाल भाव १,८०० रुपयांवरून १,७०० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक १,७५० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ७५० क्विंटलने वाढून भावात २०० रुपयांची वाढ झाली. बटाट्याचा कमाल भाव २,००० रुपयांवरून २,२०० रुपयांवर पोहोचला. जळगाव भुईमुग शेंगा व बंदूक भूईमुग शेंगांची काहीच आवक झाली नाही. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ३ क्विंटलने घटून भावात १ हजार रुपयांची घसरण झाली. लसणाचा कमाल भाव १७ हजार रुपयांवरून १६ हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३२५ क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ६५ क्विंटलने घटल्याने भावात वाढ झाली. हिरव्या मिरचीला ५ हजार रुपयांपासून ते ७ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

**शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढील प्रमाणे –**

कांदा - एकूण आवक - २०,५०० क्विंटल. भाव क्रमांक १. १,७०० रुपये, भाव क्रमांक २. १,५०० रुपये, भाव क्रमांक ३. १,००० रुपये.

बटाटा - एकूण आवक - १,७५० क्विंटल. भाव क्रमांक १. २,२०० रुपये, भाव क्रमांक २. १,६०० रुपये, भाव क्रमांक ३. १,४०० रुपये., फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -टोमॅटो - २९० क्विंटल ( १,००० ते १,५०० रू. ), कोबी - १८० क्विंटल ( १,४०० ते १,६०० रू.), फ्लॉवर - २१० क्विंटल ( ९०० ते १,२०० रु.) असा भाव मिळाला.

## शैक्षणिक वर्ष संपले, विद्यार्थ्यांना डीबीटी नाहीच!

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका शाळेतील विद्यार्थी शैक्षणिक साहित्यापासून वंचित राहिले आहेत. शैक्षणिक वर्ष संपत आले तरी विद्यार्थ्यांना थेट डीबीटीचा लाभ मिळालेला नाही. खात्यावर रक्कम कधी जमा होणार असा सवाल पालक उपस्थित करत आहेत. शिक्षण विभागाच्या धीम्या कार्यवाहीचा विद्यार्थ्यांना फटका बसत आहे.

ज्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे पैसे जमा झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांनी साहित्य खरेदी करून त्यांची बिले जमा करणे अनिवार्य आहे. महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक मिळून ५० हजार ८६० एकूण विद्यार्थी संख्या आहे. यापैकी २०२३-२४ हे शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत ४५ हजार ९१९ (डीबीटी) विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

पण प्रत्यक्षात फक्त २० हजार ४८८ साहित्य खरेदीची बिले प्राप्त झाली आहेत. म्हणजेच कित्येक विद्यार्थी पैसे मिळूनही अद्याप शैक्षणिक साहित्यापासून वंचित असण्याची शक्यता अधिक आहे. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

## पिंपरी -चिंचवड महापालिकेची कारवाई...

# अनधिकृत बांधकामावर हातोडा!


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील चिखली रिव्हर रेसिडन्सी मागील इंद्रायणी नदीपात्र क्षेत्रात चालू असलेल्या अनधिकृत विनापरवाना बांधकामावर निष्कासनाची कारवाई करून सुमारे ३६०० चौ.फुट क्षेत्रातील चालु असलेले अनाधिकृत बांधकामाचे निष्कासन करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे - पाटील, यांचे निर्देशानुसार कारवाई करणेत आली.



शनिवार दि १६ मार्च रोजी क क्षेत्रीय कार्यालयाचे पथकामार्फत उपआयुक्त अण्णा बोदडे तसेच उपअभियंता सुर्यकांत मोहिते यांच्या नेतृत्वाखाली कनिष्ठ अभियंता किरण सगर, रचना दळवी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक निकिता फ़डतरे,स्मिता गव्हाणे व मनपा कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बल, महाराष्ट्र पोलिस, यांच्या नियंत्रणाखाली सदर कारवाई करण्यात आली. आज अखेर प्रभाग क्र.०२ चिखली /जाधववाडी परिसरातील सुमारे ३६००.००चौ.फुट आरसीसी बांधकामावर अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली.करण्यात आलेल्या या कारवाईत क क्षेत्रीय कार्यालयाकडील अतिक्रमण पथक, महाराष्ट्र सुरक्षा बल व महाराष्ट्र पोलीस पथक सहभागी झाले होते. दररोज शहराच्या विविध भागात अतिक्रमण कारवाई केली जात आहे. नागरिकांनी रस्त्यांवर बेवारस वाहने उभी करुन नये, तसेच अनधिकृत टप-या व पत्राशेड व बॅनर्स उभारु नये. तसेच फ़ुटपाथ स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे, महानगरपालिका आयुक्त यांच्या निर्देशनानुसार सदर कारवाई केलेल्या ठिकाणी मनपा परवानगी घेतल्याशिवाय अनधिकृत पत्राशेड / बांधकाम करु नये, अशा सुचना देण्यात आल्या.

#रा



**'ई साला कप नमदे'**
हे कन्नड भाषेतील एक वाक्य आहे, ज्याचा अर्थ 'यंदा कप आमचा आहे'. तर 'ई साला कप नामदू' म्हणजे 'यंदा कप आमचा झाला आहे'. आरसीबीने चषक जिंकताच बेंगळुरू शहरात विजयाचा जल्लोष सुरू झाला. चाहत्यांनी रात्रभर 'आरसीबी-आरसीबी'च्या घोषणा दिल्या.

**“ भारतीय कर्णधारांनी जेतेपद पटकावणे आपल्या क्रिकेटमधील सखोलता दर्शवते – स्मृती.**



# ‘आरसीबी’ने रचला इतिहास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (RCB) फ्रँचायझीने रविवारी पहिले लीग जेतेपद जिंकून इतिहास रचला. २००८ मध्ये लीग क्रिकेट खेळण्यास सुरुवात करणाऱ्या आरसीबीला महिला संघासोबत तब्बल 16 वर्षांनंतर यश मिळाले. महिला प्रीमियर लीग (WPL) च्या अंतिम फेरीत दिल्ली कॅपिटल्सचा (DC) पराभव करून संघाने विजेतेपद पटकावले.

पुरुष संघाचा माजी कर्णधार विराट कोहलीने महिला संघाची कर्णधार स्मृती मंधानानाचे आरसीबीच्या विजयाबद्दल अभिनंदन केले. फायनल संपल्यानंतर त्याने व्हिडिओ कॉल केला आणि मंधानासह संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. मंधानाही सामना संपल्यानंतर म्हणाली, 'इस बार ई साला कप नामदे नहीं ई साला कप नामदू'

मंधाना म्हणाली- कोहलीला आनंदी पाहून आनंद झाला सामना संपल्यानंतर पत्रकार परिषदेत मंधाना म्हणाली, 'व्हिडिओ कॉलदरम्यान मला विराटचे शब्द नीट ऐकू आले नाहीत. स्टेडियममध्ये खूप गोंगाट झाला पण त्याच्या चेहऱ्यावर आनंद होता. हे पाहून मला बरे वाटले. शेवटचा हंगाम खराब गेल्यानंतर त्याने संपूर्ण संघाशी बोलून आम्हाला आत्मविश्वास दिला. मी बंगळुरूला पोहोचल्यावर त्याच्याशी नक्की बोलेन.



आयपीएल भारतात अत्यंत चर्चेत असते आणि प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेते. क्रिकेट प्रेमी या लीगची उत्सुकतेने वाट पाहत असतात पण यंदा डब्ल्यूपीएलसाठी ही प्रेक्षकांनी भरपूर प्रतिसाद दिला आहे. १७ मार्चला झालेल्या डब्ल्यूपीएलच्या अंतिम सामन्यात आरसीबी संघाने दिल्ली कॅपिटल्सचा पराभव करून डब्ल्यूपीएल २०२४ चे विजेतेपद पटकावले



## लक्ष्य त्रिपाठी, अधिराज दुधाने आदिराज ब्रम्हनाथकर, लव परदेशी यांचा मुख्य फेरीत प्रवेश...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शेपींग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या तर्फे आयोजित शेपींग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे एमएसएलटीए पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन (१४वर्षाखालील) चॅम्पियनशिप सिरीज टेनिस स्पर्धेत नमिश हुड, यशवंतराजे पवार, लक्ष्य त्रिपाठी, अधिराज दुधाने आदिराज ब्रम्हनाथकर, लव परदेशी यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून मुख्य फेरीत प्रवेश केला.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत अंतिम पात्रता फेरीत अव्वल मानांकित नमिश हुडने सोळाव्या मानांकित शौर्य गडदेचा ६-१, ६-२ असा सहज पराभव केला. बिगरमानांकित शौर्य बोराडेने चौथ्या मानांकित शुभ नाहाटाचा ५-७, ६-३, १०-७ असा तर, लक्ष्य त्रिपाठीने पाचव्या मानांकित रुद्र पटवर्धनचा ६-३, ६-० असा पराभव करून मुख्य फेरी गाठली. अधिराज दुधानेने नवव्या मानांकित अभिनव शर्माचा ६-१, ६-० असा सहज पराभव केला.

सोलापूरच्या यशवंतराजे पवारने आदित्य वाडकर वर ५-७, ६-३, १०-७ असा विजय मिळवला. आदिराज ब्रम्हनाथकर याने अभिर सिद्धूला ६-४, ६-१ असा पराभव करून आगेकूच केली.

**निकाल: अंतिम पात्रता फेरी: मुले:**

- नमिश हुड(१)वि.वि.शौर्य गडदे(१६) ६-१, ६-२;
- यशवंतराजे पवार वि.वि.आदित्य वाडकर ५-७, ६-३, १०-७;
- आदिराज ब्रम्हनाथकर वि.वि.अभिर सिद्धू ६-४, ६-१;
- शौर्य बोराडे वि.वि. शुभ नाहाटा(४) ५-७, ६-३, १०-७;
- लक्ष्य त्रिपाठी वि.वि.रुद्र पटवर्धन(५) ६-३, ६-०;
- अधिराज दुधानेवि.वि.अभिनव शर्मा (९)६-१, ६-०.

# भारती विद्यापीठ-ब्रिक स्कूलमध्ये अंतिम लढत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन स्पोर्ट्स लीग शिअरफोर्स स्पर्धेत भारती विद्यापीठ डीम्ड युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि ब्रिक स्कूल ऑफ आर्किटेक्चर यांच्यात मुलांच्या गटाची फुटबॉल स्पर्धेची अंतिम लढत रंगणार आहे.

वानवडी येथील ‘एस.आर.पी.एफ.’च्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेतील मुलांच्या गटाच्या फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारती विद्यापीठने कोल्हापूरच्या ‘डी.वाय.पी.सी.ई.टी.’ संघावर २-१ने मात केली. यात आर्यासेन काळेने दहाव्या मिनिटाला गोल करून कोल्हापूरच्या संघाला आघाडी मिळवून दिली होती. मात्र, दीपक कश्यप (१२ मि.) आणि स्वराज माने (१७ मि.) यांनी प्रत्येकी एक गोल करून भारती विद्यापीठला विजयी केले. दुसऱ्या उपांत्य लढतीत अंश अग्रवालच्या (३, १५ मि.) दोन गोलच्या जोरावर ब्रिक स्कूल ऑफ आर्किटेक्चर संघाने आकुर्डीच्या डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चर संघावर २-०ने मात केली.

मुलींच्या गटाची फुटबॉल स्पर्धेची अंतिम लढत भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि पिंपरी-चिंचवडचा एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघ यांच्यात रंगणार आहे. पहिल्या उपांत्य लढतीत नानावटी कॉलेजने आकुर्डीच्या डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चर संघावर १-०ने मात केली. यात सेजल सारडाने (११ मि.) केलेला गोल निर्णायक ठरला. दुसऱ्या उपांत्य लढतीत सानिका पाटणेने (३ मि.) केलेल्या एकमेव गोलच्या जोरावर पाटील कॉलेजने सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघावर १-०ने मात केली.

## आर्यन्स क्रिकेट अकादमी व पीवायसी हिंदू जिमखाना यांच्यात अंतिम लढत!

**पुणे :** थर्ड आय स्पोर्टस अँड इव्हेंटस एलएलपी यांच्या वतीने आयोजित पहिल्या थर्ड आय १६ वर्षाखालील क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत उपांत्य फेरीत आर्यन्स क्रिकेट अकादमी व पीवायसी हिंदु जिमखाना या संघानी अनुक्रमे सहारा क्रिकेट अकादमी व स्पोर्टिव्ह क्रिकेट अकादमी संघाचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.



सनराईज क्रिकेट स्कुल येथील मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत अथर्व वैद्य(नाबाद ५९ धावा व २-११)याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर पीवायसी हिंदू जिमखाना संघाने स्पोर्टिव्ह क्रिकेट अकादमीचा ९ गडी राखून पराभव केला. पीवायसीच्या अर्जुन सोनार ४-३५, अथर्व वैद्य २-११ यांनी केलेल्या भेदक गोलंदाजीपुढे स्पोर्टिव्ह क्रिकेट अकादमीचा ३९षटकात सर्वबाद १५६धावावर कोसळला. यात अभिराज राऊत ३२, हेमांग सिंगल २७, आदेश सोलंकी २५ यांनी थोडासा प्रतिकार केला. हे आव्हान पीवायसी हिंदू जिमखाना संघाने २५.२षटकात २बाद १५७धावा करून पूर्ण केले. यात अथर्व वैद्य नाबाद ५९, ओम सानप नाबाद ४६, श्लोक जोशी २८ यांनी धावा करून संघाला विजय मिळवून दिला. दुसऱ्या सामन्यात आदर्श रावळ(५० धावा व ३-२४)याने केलेल्या सुरेख खेळीच्या जोरावर आर्यन्स क्रिकेट अकादमी संघाने सहारा क्रिकेट अकादमीचा १३५ धावांनी पराभव करून अंतिम फेरी गाठली.

**निकाल: उपांत्य फेरी:** आर्यन्स क्रिकेट अकादमी: ४०षटकात ४बाद २८४धावा (तनय रेड्डी नाबाद ११७(१२३,१३x४,१x६), आदर्श रावळ ५०(३२,७x४), एकनाथ देवडे ३९(२८,७x४), प्रधुमन कोळी ३८(२६,७x४), विहान केंजळे २-३९) वि.वि.सहारा क्रिकेट अकादमी: ४० षटकात ७बाद १४९धावा(विहान केंजळे ४३(४७,६x४), साई दहिवाल ४२(६८,७x४), अथर्व फेगडे नाबाद १४, आदर्श रावळ ३-२४, स्वराज गायकवाड १-१४); सामनावीर - आदर्श रावळ; आर्यन्स क्रिकेट अकादमी संघ १३५ धावांनी विजयी; स्पोर्टिव्ह क्रिकेट अकादमी: ३९षटकात सर्वबाद १५६धावा(अभिराज राऊत ३२(५३,५x४), हेमांग सिंगल २७, आदेश सोलंकी २५, अर्जुन सोनार ४-३५, अथर्व वैद्य २-११) पराभुत वि.पीवायसी हिंदू जिमखाना: २५.२षटकात २बाद १५७धावा(अथर्व वैद्य नाबाद ५९(५९,१०x४), ओम सानप नाबाद ४६(३४,७x४,१x६), श्लोक जोशी २८, वीर चोरडिया १-२१); सामनावीर - अथर्व वैद्य;पीवायसी हिंदू जिमखाना संघ ९ गडी राखून विजयी;

# हॉकी हरियाणा, असोसिएशन ऑफ ओडिशा विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विजेतेपदासाठी दावेदार असलेल्या हॉकी हरियाणाने गोलांचा पाऊस पाडताना १४व्या हॉकी इंडिया सीनियर महिला राष्ट्रीय स्पर्धेत पूल डी सामन्यात ली पुडुचेरी हॉकीचा २२-० असा धुव्वा उडवत दिमाखात उपांत्यपूर्व फेरी गाठली. हॉकी असोसिएशन ऑफ ओडिशानेही सातत्य राखताना आगेकूच केली.

मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम नेहरूनगर, पिंपरी येथे सुरू असलेल्या स्पर्धेत रविवारी ड्रॅगफ्लिकर दीपिकाने (चौथ्या, ११व्या, १४व्या, १५व्या, ४२व्या आणि ४९व्या मिनिटाला) हॅट्ट्रिकसह सहा गोल केले, याशिवाय भारताची आंतरराष्ट्रीय नवनीत कौर (२वी, ३३वी, ४५वी), नीलम (१५वी, २५वी, ३०वी), मोनिका (१७वी, १९वी, ५३वी), ज्योती (३२वी, ३३वी), शर्मिला देवी (३५वी, ४१वी, ४५वी), नेहा गोयल (४०वी) आणि उदिता (४२वी) यांनीही गोल करत हॉकी हरयाणाचा विक्रमी विजय नोंदवण्यात मोलाचे योगदान दिले.

हॉकी हरियाणाने दोन सामन्यांतून तितक्याच विजयांसह पूल डीमध्ये अव्वल स्थान पटकावले.

ओडिशाच्या हॉकी असोसिएशननेही त्यांच्या दुसर्या आणि अंतिम पूल ई सामन्यात हॉकी चंडिगडवर ६-१ असा सहज विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

दीप्ती लाक्राने (१९वे, २३वे) दोन तर अजमिना कुजूर (१५वे), जीवन किशोरी टोप्पो (३०वे), मारियाना कुजूर (५०वे), लिलिमा मिन्झ यांनी (५१वे) ओडिशाच्या हॉकी असोसिएशनसाठी गोल केले.

हॉकी चंडिगडचा एकमेव गोल प्रियांका हिने २६व्या मिनिटाला आला.

ओडिशाच्या हॉकी असोसिएशनने पूल ई मध्ये दोन सामन्यांमधून दोन विजयांसह मिळवून गटात अव्वल स्थान पटकावले. तसेच हॉकी चंडिगड आणि गोवन्स हॉकी यांच्या पुढे बाद फेरीसाठी पात्र ठरले. पूल एफ सामन्यात, हॉकी मिझोरामने हॉकी राजस्थानचा २०-२ असा एकतर्फी पराभव करून सलग दुसरा विजय नोंदवला.

भारताची स्ट्रायकर लालरेमसियामी हिने(६वा, २९वा, ३४वा, ३६वा, ५६वा, ६०वा) सहा गोल केले. लालरिनपुई (१३वे, १५वे, २६वे, ५१वे, ५७वे), लालनेइहपुई (१४वे, २२वे, ४९वे, ३९वे, ३९वे), लालरीनपुई एच लालरुआतफेली (११व्या), लालथंटलुआंगी (१७व्या), एफ लालबियाक्सियामी (१८व्या) आणि मरीना लालरामनघाकी (३३व्या) अप्रतिम खेळ करताना हॉकी मिझोरामच्या विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले

हॉकी राजस्थानचे दोन गोल उषा कुमारी (३३वे) आणि मनिषा शर्माने (४६वे) केले.

हॉकी मिझोराम अजूनही अंतिम आठ संघांत स्थान मिळवण्याच्या रेसमध्ये आहे.

अशाप्रकारे सातत्य राखताना हॉकी हरियाणा आणि हॉकी असोसिएशन ऑफ ओडिशा संघांनी, हॉकी मध्य प्रदेश (पूल ए), हॉकी महाराष्ट्र (पूल बी), हॉकी झारखंड (पूल सी) आणि हॉकी बंगालसह (पूल एच) अंतिम आठ संघांतील स्थान निश्चित केले.उपांत्यपूर्व फेरीतील अद्या दोन संघ निश्चित झालेले नाहीत. शनिवारी उशिरा संध्याकाळी तामिळनाडूच्या हॉकी युनिटने पूल एच सामन्यात हॉकी गुजरातला ३-० तसेच हॉकी उत्तराखंडने दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीवला ५-० असे पराभूत केले.

**अटीतटीच्या सामन्यात दोन्ही संघांच्या बचावपटूंनी जोरदार खेळ करत चढाईपटूंना रोखून ठेवले**

# सहाव्या विजयासह नंदुरबार संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानावर!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आजचा दुसरा सामना नंदुरबार विरुद्ध पालघर यांच्यात झाला. आज झालेल्या पहिल्या सामन्यात नाशिक संघाचा पराभव झाल्याने नंदुरबार व पालघर दोन्ही संघ प्रमोशन फेरीत पोहचले होते. त्यामुळे हा सामना एक औपचारिकता होती. दोन्ही संघांच्या बचावपटूंनी जोरदार खेळ करत चढाईपटूंना रोखून ठेवले होते. पहिल्या पाच मिनिटाच्या खेळ नंतर नंदुरबार संघाकडे ५-२ अशी आघाडी होती. पण यात फक्त १ च गुण अयशस्वी चढाईत मिळेल बोनस गुण होता तर बाकी दोन्ही संघांनी मिळवले हे गुण पकडीतील होते.

मध्यांतराला तीन मिनिटं शिल्लक असताना नंदुरबार संघाने पालघर संघाला ऑल आऊट करत १८-१० अशी आघाडी मिळवली. त्यानंतर पालघरच्या प्रतिक जाधव मे सलग तीन चढाया करत गुण मिळवत संघांची आघाडी कमी करत मध्यांतराला सामना १४-१८ असा आणला. मध्यंतरा नंतर सलग तीन चढाया करत प्रतिक जाधव ने पालघर संघाला २१-२० अशी आघाडी मिळवून दिली. यादरम्यान नंदुरबार संघ ऑल आऊट झाला.

नंदुरबारच्या वरून खडले ने सुपर रेड करत पुन्हा एकदा नंदुरबार संघाला आघाडी वर आणले. ही आघाडी कायम ठेवत पुढे नंदुरबार संघाने सामन्यावर पकड मजबूत केली. नंदुरबार संघाने ४०-३२ असा विजय मिळवला. चढाईत वरून खडले ने १३ गुण मिळवत महत्वपूर्ण खेळी केली. तर जयेश महाजन ने पुन्हा एकदा अष्टपैलू खेळ करत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. जयेश ने पकडीत ६ तर चढाईत ४ गुण मिळवले. ओमकार शिंदे सुद्धा हाय फाय पूर्ण केला. तर पालघरच्या प्रतिक जाधवने केलेली १४ गुणांची खेळी व्यर्थ ठरली.

- बेस्ट रेडर- प्रतिक जाधव, पालघर
- बेस्ट डिफेंडर- जयेश महाजन, नंदुरबार
- कबड्डी का कमाल - अभिनय सिंग व दिपनशू तांडेल, पालघर

#रा